प्राचीन काळीं, इंग्लिश लोक विद्याचारहीन असून, त्यांमध्यें मंक्स (जोगी) ह्यांनी किती कल्याणकारक गोष्टी केल्या होत्या हें पाहण्यांत आलेंच आहे. परंतु जोग्यांचे मठ उत्तरोत्तर संपत्तिमान होत चालले, आणि खरें काम करावयाचें कमी कमी होत गेलें, तसतसा आळस, आणि स्वासंयम किंवा यथेच्छ उपभोगप्रवृत्ति, त्या मठांतून शिरली. मंक्स (जोगी) आणि नन्स (जोगिणी) ह्यांपैकी पुष्कळ फार अज्ञान, आणि अनीतिमान, होत्या, आणि वूल्सीनें, पोपाच्या मंजुरीनें, ह्यापूर्वीच, कांहीं मठ नाहींसे करून, त्यांच्या जागीं पाठशाळा बांधल्या होत्या. क्राम्वेल्लाला राजाकरितां द्रव्य पाहिजे होतें, तो तर वूल्सीहूनही पुढें गेला; आणि क्रान्मरच्या साहाय्यानें त्यानें, हीं पडतपोशीचीं किंवा एकांतवासाचीं स्थानें, म्हणजे मठ, चटसारे लयास नेले. त्यांपैकी लहान लहान १५३६ त, आणि मोठे मोठे १५३९ त मोडले. त्या मठांतले जोगी आणि जोगिणी ह्यांना, कांहींस लहान लहान बैठी वेतनें देऊन, आणि कांहींस त्यांवांचूनही, अशी वाटेस लावलीं. मठ मोडल्यापासून उत्पन्न झालेल्या द्रव्यापैकीं बाकी राहिलेल्या द्रव्याचा कांहीं भाग, जहाजें बांधणें, कथीड्रलांतील (बिशपांच्या गाद्या असलेल्या देवळांतील) चाप्टर्स (धर्मोपदेशकांच्या मंडळ्या), आणि नवे बिशप्रिक्स (बिशपांच्या जागा), ह्यांना स्वास्थ्यें करून देणें, आणि केंब्रिज एथें ट्रिनिटी नांवाचें कालेज (पाठशाला) स्थापणें, ह्या कामांकडे खर्च झाला. परंतु त्या द्रव्याचा बहुतेक अंश राजाकडे गेला, आणि त्या मठांची जमीन बडे लोकांना दिली, किंवा त्यांनीं फारच थोड्या किंमतीनें विकत घेतली. क्राम्वेल फार कडक रीतीनें अमल करीत होता, आणि मंकांनीं कांहीं प्रतिकार केला नाहीं

मानस्टरिझचा (मठांचा) नाश, १५३६, १५३९.

तरी, हा सांगितलेला सारा कारभार दंगेधोपे झाल्यावांचून तडीस गेला नाहीं.

मधल्या काळांत हेन्री एक नवी बायको करून चुकला होता.

आन बुलिनचा शिरच्छेद आणि जेन सीमरशीं लग्न, १५३६.

१५३६ त (राणी काथरिन आपल्या भयाण निर्जन राजमंदिरांत मरण पावल्यावर थोड्या महिन्यांनीं) त्यानें, आपल्याशीं बेइमान झालीस, आणि तुझे दुसरे कित्येक प्राणप्रिय आहेत असा, आन बुलिनवर दोषारोप केला. तिची चौकशी करून, त्याच सालांतील मेच्या १९ व्या तारिखेस, तिचा शिरच्छेद केला. दुसऱ्याच दिवशी, आन बुलिनच्या मानाच्या दासीपैकीं एका जेन सीमर नांवाच्या स्त्रीशीं त्याने लग्न केलें, आणि आन बुलिनची मुलगी, राजपुत्री एलिझाबेथ, हिला, तिची सावत्र बहीण मेरी हिला पूर्वीं ठरविलें होतें त्याप्रमाणें, अपत्नीभव ठरविलें.

असला हा अन्याय, आणि करुणेचा घोर अभाव, ह्यांनीं सर्व राष्ट्रांतील लोकांच्या मनाला धक्का बसण्याला चुकला नाहीं. इंग्लंडच्या उत्तरेकडील लोक तर, काम मिळत नसल्यामुळें, व मानस्टरिझचा एकाएकीं नाश केल्यामुळें, अगोदरच तडफडत होते.

उत्तरेकडे आणि पश्चिमेकडे बंडे होतात.

शिवाय, ते नव्या धर्माचा द्वेष करीत होते; आणि आतां एक जबरदस्त बंड उठलें, त्यांत बडे लोक आणि शेतकरी ह्या दोन्ही प्रतींचे लोक सामील झाले. मेरीला गादीची वारस ठरवावी, जुना धर्म पुनः प्रवृत्तींत आणावा, आणि क्राम्वेलाला कामावरून काढून टाकावें, हें त्या बंडवाल्यांचें मागणें होतें. परंतु तो प्रधान क्रामवेल त्यांना पुरून उरण्यासारखा भारी खंबीर होता. त्यानें आपल्या हेरांच्या द्वारें त्यांचे सारे बातबेत समजून घेतले, त्यांना

पुष्कळ वचनें दिलीं, आणि शेवटीं त्या दंगेखोरांना वाटेस लावलें. ह्या बंडाला "**पिल्ग्रिमेज आफ् ग्रेस,**" म्हणजे **ईश्वरप्रेरणेची यात्रा** असें म्हणत; त्या यात्रेच्या पुढाईतांना पुढें कांहीं महिन्यांनीं पकडलें, आणि त्या उत्तरेकडील बडे लोकांपैकीं पुष्कळांना देहांतशासनें केलीं. ह्याच वेळेच्या सुमारास **क्राम्वेल्लानें इंग्लंडच्या** पश्चिम भागांत दुसरें एक बंड झालें होतें तें मोडलें. त्या बंडांत त्यानें **चौथ्या एड्वर्डाचा** नातू, **एक्झीटरचा मार्किस,** आणि **साल्झबरीची** वृद्ध **कौंटेस्स, मार्गरेट प्लान्टाजनेट,** ह्या दोघांना धरून कैदकेलें, आणि पुढें त्या उभयतांचा शिरच्छेद केला.

राजपुत्र एड्वर्ड ह्याचें जन्म, तारीख १२ आक्टोबर १५३७.

इतक्यांत, शेवटीं, एक राजपुत्र जन्मास आला. १५३७ त आक्टोबरच्या १२ व्या तारिखेस, **जेन सीमरला** पुत्र झाला, आणि नंतर दोन तासांनीं ती वारली. त्या पुत्राचें नांव **एड्वर्ड** ठेवलें. आतां राज्यांत दोन पक्ष झालेले होते. एक **प्राटेस्टंट** अथवा नवा धर्म ह्याचा पक्ष; ह्या पक्षाचा मुख्य **जेन सीमरचा** भाऊ आणि **एड्वर्डाचा** मामा, **हर्टफर्डचा अर्ल,** हा होता, ह्या पक्षाकडे **क्राम्वेल्लचें** मन ओढ घेत होतें. दुसरा पक्ष **क्याथलिक** किंवा प्राचीन धर्म धरून राहिला होता, आणि त्या पक्षाचे मुख्य, **नार्फकचा ड्यूक** आणि त्याचा पुत्र **सरीचा अर्ल,** हे होते. ते प्राचीन बडे लोकांपैकीं होते. **क्राम्वेल्ल** हा, **जर्मनींतील प्राटेस्टंटधर्मी** राजांशीं कट करण्याविषयीं चिंतातुर होता, त्यानें **हेन्रीला** नव्या बायकोकरितां **प्राटेस्टंटधर्मी, क्लीव्हझची आन,** नांवाची राजपुत्री, हिला पसंत केलें. दुर्दैवानें ती साधी आणि अडाणी बायको होती, आणि **हेन्रीला** ती इतकी अ-

प्रिय झाली कीं त्यानें सहा महिन्यांनंतर तिला दूर केलें. ह्या एका गोष्टीनें क्राम्वेल्लाचा नाश झाला. आपल्याला अशा खोटसाळ स्थितींत घातल्याबद्दल हेन्रीला क्राम्वेल्लाचा इतका राग आला कीं, कौन्सिलाच्या दिवाणखान्यांत (तेथील सारे लार्ड्स त्या क्राम्वेल्लाचा द्वेष करीत होते) १५४० त जूनच्या १० व्या तारिखेस, त्यानें त्याला कैदकरविलें. तेव्हां क्राम्वेल्लानें आपली टोपी जमिनीवर फेंकली; आणि तो ओरडून म्हणाला, "मीं केलेल्या चाकऱ्यांचें हें प्रतिफल ना! तुमच्या इमानावर मी तुम्हांस पुसतों, मी विश्वासघातकी किंवा राजद्रोही आहें ना!"

क्लीव्ह्ज्ञची आन हिच्याशीं विवाह आणि तुटातूट, १५४०.

ह्याचें त्याला कांहींच उत्तर मिळालें नाहीं, तेव्हां तो म्हणाला, "माझा जलदी निकाल करा, आणि मला बंदिखान्यांत कुजत पडून राहूं देऊं नका." पुढें थोड्या दिवसांनीं पार्लमेंटांत, आपल्या बचावाकरितां त्याला कांहीं बोलूं न देतां, गुन्हेगार ठरविलें, आणि टौअर हिल्ल (टेंकडी)वर १५४० त जूलईच्या २८ व्या तारिखेस त्याला देहांतशासन केलें.

क्राम्वेल्लाला देहांतशासन होतें, तारीख २८ जूलई १५४०.

ज्या दिवशीं हेन्रीच्या विश्वासू प्रधानाला देहांतदंड झाला त्याच दिवशीं हेन्रीनें आपली पांचवी बायको काथरिन हाउअर्ड हिच्याशीं लग्न केलें. ती नार्फकच्या ड्यूकाची पुतणी किंवा भाची होती. आपलें वर्तन, रेफर्मेशनकडे, म्हणजे धर्मसुधारणेकडे, फारच जवळ जाऊन पोहोंचलें, अशी हेन्रीला ह्यापूर्वीच भीति वाटूं लागली होती. म्हणून तो. आतां प्राचीन धर्माचें पालन करणारे होते त्यांकडे वळला. त्यानें पार्लमेंटाकडून

काथरिन हाउअर्ड हिच्याशीं लग्न, १५४०.

**प्राटेस्टंट**धर्मी लोकांविरुद्ध एका कायद्याचा मसुदा पसार करविला; आणि **क्राम्वेल्लाच्या** मृत्यूनंतर दोन दिवसांनीं, देहांतशासन करण्यासाठीं एका गाड्यावर सहा पुरुष घालून नेत आहेत, असा तमाशा दृष्टीस पडला. त्यांपैकीं तीन **क्याथलिक**पंथी होते, त्यांनीं राजाचा धर्मसंबंधाने **सर्वश्रेष्ठ अधिकार** अमान्य केला होता; आणि तीन **प्राटेस्टंट**पंथी होते, त्यांवर पाखंडी म्हणून दोषारोप होता. **दुसऱ्या हेन्रीच्या** काळापासून ह्या कारकीर्दीपर्यंत **इंग्लिश** राजाचा **"लार्ड आफ् आयर्लंड"** (आयर्लंडचा अमीर) असा किताब होता, त्याच्या बदली, **हेन्रीनें** १५४१ ह्या सालीं **"किंग आफ् आयर्लंड"** (आयर्लंडचा राजा) हा किताब पहिल्यानेंच घेतला. त्याचें **काथरिन हाउअर्ड** हिच्याशीं झालेलें लग्न फार दिवस टिकलें नाहीं, कारण तिजकडून पूर्वीं गैरसाळ आचरण घडलेलें होतें असा शोध लागला. तिजविषयीं पुष्कळ काकळूत यावी खरी, परंतु त्या गोष्टीनें ती राजाची पत्नी होण्याला नालायक झालेली होती. तिचा १५४२ त फेब्रुअरीच्या १२ व्या तारिखेस, शिरच्छेद केला, आणि पुढल्या सालीं **हेन्रीनें काथरिन पार** हिच्याशीं विवाह केला. ती त्याच्या पाठीमागें वांचली.

काथरिन हाउअर्डचा शिरच्छेद, १५४२.

आतां आपल्या अल्पवयस्क **एड्वर्ड** नांवाच्या पुत्राचें पुढें **कसें होईल** म्हणून राजाला चिंता उत्पन्न होऊं लागली. **स्काटांची राणी मेरी** ही, १५४२ त तिचा बाप वारल्यावर, तान्हें मूल होती ( २८२ वें पृष्ठ पहा ), तिच्याशीं **एड्वर्डाचें** लग्न करण्यासाठीं मागणी घालून वाङ्निश्चय करून ठेवण्याविषयीं त्यानें प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न सफल झाला नाहीं, आणि **स्काट्लंड**

आणि **फ्रान्स** ह्या देशांशीं युद्धें रडतखडत चाललीं होतीं. **फ्रान्साशीं** चाललेल्या युद्धांत **हेन्रीनें** **बूलोन** शहर घेतलें. **एड्वर्ड** व्यवहारक्षम वयांत येई तोंपर्यंत, आपल्या पश्चात् राज्यकारभार चालविण्यासाठीं, त्यानें आतां उभय मतांच्या (धर्मांच्या) लोकांचें निवडून एक कौन्सिल नेमलें. ह्या निवडलेल्या लोकांमध्यें **एड्वर्डाचा** मामा, **हर्टफर्डचा अर्ल**, हा एक होता, त्याचें ह्या वेळेच्या सुमारास राजावर (हेन्रीवर) भारी वजन बसत चाललें होतें. **प्राटेस्टंटपंथी** पक्षानें, **क्रान्मराच्या** साहाय्यानें, **लिटनी** (प्रार्थनेची पद्धति), **क्रीड** (विश्वासनीय धर्मसूत्रसंग्रह), **कमांड्मेन्ट्स** (ईश्वराच्या आज्ञा), आणि **लार्ड्स प्रेअर** (ईश्वराची प्रार्थना), एतद्विध **लिटर्जी** (सामाजिक उपासनापद्धति) **इंग्लिश** भाषेंत तयार करवून, पूर्वीं चालत असलेल्या **लाटिन** भाषेंतील उपासनापद्धतीच्या बदली, ती दररोज सकाळीं व संध्याकाळीं वाचण्याकरितां प्रवृत्तींत आणविण्याचा प्रयत्न केला, तो सुफल झाला.

इंग्लिश भाषेत लिटर्जि (सामाजिक उपासनापद्धति) चालू केली.

**हर्टफर्डाला, नार्फकच्या ड्यूकाच्या** वजनदारीविषयीं फार भीति वाटूं लागली. म्हणून, राजप्रतिनिधित्व बळकावयाचा त्या ड्यूकाचा इरादा आहे असें त्या **हर्टफर्डानें** राजाच्या मनांत भरविलें, आणि ह्या शिकवणीनें त्यानें **हेन्रीला** आपलें शेवटचें क्रूरकर्म करावयास लावलें. **हेन्रीनें** त्या **ड्यूकाला** पकडवून **टौअरमध्यें** टाकलें, आणि त्याचा पुत्र, **सरीचा अर्ल**, ह्याचा वध करविला. असें म्हणतात कीं, त्या **ड्यूकाचा** वध करण्याचा दिवस देखील **हेन्रीनें** ठरविला होता, इतक्यांत खुद्द **हेन्रीलाच** मृत्यूनें गांठून,

त्याच्या हाताची शक्ति खुंटविली. तो फार दिवसांपासून, औजड आणि अशक्त होत चालला होता, आणि १५४७ त जान्युअरीच्या २८ व्या तारिखेस तो मृत्यु पावला.

सक्सेशनचा आक्ट म्हणजे गादीवर कोणीं कसकसें बसावें ह्याविषयीं कायदा.

**हेन्री**च्या कारकीर्दीचें **इंग्लंड** किती ऋणी आहे ह्या गोष्टीचें स्मरण झालें म्हणजे, मनुष्य ह्या नात्यानें **हेन्री**ला किती थोडा मान देववतो ही गोष्ट मनांत येऊन खेद वाटतो. **एड्वर्डा**नें आपल्या मागून गादीवर बसावें, आणि त्याला संतति न होईल तर त्याच्या मागून **मेरी**नें, आणि तिच्या मागून **एलिझाबेथ** हिनें गादीवर बसावें; जर तीं तिघेंही संतति न होतां मरण पावलीं तर गादी आपली धाकटी बहीण **मेरी** हिच्या मुलांना मिळावी असें **हेन्री**च्या मृत्युपत्रांत ठरविलेलें होतें. ती त्याची बहीण **मेरी, बाराव्या लूई**ची विधवा, होती, तिनें **सफकच्या ड्यूका**शीं पुनः विवाह केला होता. **हेन्री**नें केलेल्या व्यवस्थेवरून दिसून येईल कीं, त्याची वडील बहीण **मार्गरेट** हिची नात, जी **स्काटांची राणी मेरी,** हिला त्यानें एका बाजूस ठेविलें होतें. पुढें एक “ **सक्सेशन**चा **आक्ट** ” म्हणजे गादीवर कोणीं कसकसें बसावें ह्याविषयीं कायदा केला, त्यांत राजानें आपल्या मृत्युपत्रांत व्यवस्था केल्याप्रमाणें त्या त्या इसमांस गादी मिळावी असें ठरविलें होतें. त्या कायद्यावरून, प्राचीनकालीं लोक राजा निवडून नेमीत होते, तेव्हांपासून काय उलटापालट होत आली, हें दिसून येतें.

# प्रकरण १४.

## दोहों धर्मांच्या दरम्यानचा झगडा.

सहावा एड्वर्ड, १५४७–१५५३. । मेरी, १५५३–१५५८.

पुढल्या दोन कारकीर्दी मिळून फक्त अकरा वर्षेपर्यंत टिकल्या. त्या दोन्ही कारकीर्दी, म्हटल्या म्हणजे, तो एक दोहों धर्मांच्या दरम्यान सतत चाललेला झगडा होता. **सहावा एड्वर्ड** हा राजा झाला तेव्हां वयानें फक्त दहा वर्षांचा होता. त्याचें अध्यापन, आणि शिक्षण, दृढ **प्राटेस्टंट**मती पुरुषांकडून झालेलें होतें, आणि तो विचारी आणि बुद्धिमान् होता त्यामुळें, धर्मसंबंधी गोष्टींविषयी त्याच्या वयापलीकडे त्याला कळकळ वाटे. त्याचा मामा, **हर्टफर्डचा अर्ल**, हा **हेन्री**च्या मृत्युपत्राप्रमाणें **समर्सेटचा ड्यूक** झालेला होता. तो राजप्रतिनिधित्वाचा अधिकार दिलेल्या **कौन्सिला**चा युक्तिप्रयुक्तींनी **अध्यक्ष** झाला, आणि त्यानें लवकरच त्या पोरवयाच्या राजाची समजूत करून त्याकडून आपणाला **प्रोटेक्टर**, म्हणजे राज्यसंरक्षक, करवून घेतलें. त्यामुळें त्याच्या हातीं बहुतकरून सर्वश्रेष्ठ अधिकार आला. तो आस्थेवाईक पुरुष होता, आणि त्याचा इरादा चांगला होता, परंतु तो, दुराग्रही धर्मसुधारक, आणि संपत्तीचा लोभी, असून, शाहणा मुतसद्दी नव्हता.

सहावा एड्वर्ड हा निक्षीचा प्राटेस्टंट होता.

समर्सेटचा ड्यूक प्रोटेक्टर (राज्यसंरक्षक) होतो.

त्यानें आरंभालाच **स्काटूलंडांतील प्राटेस्टंट** लोकांशीं तह केला, आणि **स्काटांकडून**, त्यांची राणी **राजपुत्र एड्वर्ड** याला लग्ना-

साठीं जबरीनें देववावी म्हणून, यत्न करण्यासाठीं त्यानें फौज जमविली. **एडिंबरोनजीक पिंकीक्लो** एथें १५४७ च्या सेप्टेंबर महिन्यांत लढाई झाली, तींत त्यानें त्यांचा खरोखर पराभवही केला. परंतु त्याला **इंग्लंडास** माघारें येणें भाग आलें, आणि त्या मोहिमेपासून कांहीं फायदा झाला नाहीं. **स्काटांना** त्या पराभवानें तैष येऊन, त्यांनीं त्या अल्पवयस्क राणी **मेरीला फ्रान्स** देशीं पाठविण्याची त्वरा केली. तेथें तिनें पुढें दहा वर्षांनीं तेथल्या **डाफिनाशीं** ( फ्रान्स देशच्या राजाच्या वडीलपुत्राशीं ) विवाह केला.

स्काटूंडावर निरर्थक हल्ला, १५४७.

**इंग्लंडांत समर्सेट** आणि **आर्चबिशप क्रान्मर** ह्यांनीं **प्राटेस्टंट** धर्मसंबंधी सुधारणा मोठ्या झपाट्यानें एकदम पुढें रेटीत नेण्याला आरंभ केला. **लॉळर्ड्सांच्या** विरुद्ध असलेले सर्व कायदे, आणि **आठव्या हेन्रीचे प्राटेस्टंट** लोकांविरुद्ध केलेले सहा कानू, हे रद्द करण्यासाठीं एक कायदा पसार केला. धर्मोपाध्यायांना लग्नें करण्याची परवानगी दिली. देवळांतून **क्याथलिक मास्स** ( क्याथलिकपंथांतील प्रभुभोजन नामक संस्कारपूर्वक उपासना ) करण्याची मनाई केली, आणि सर्व मूर्ति, किंवा प्रतिमा ह्यांचा नाश केला. १५४८ त **कामन प्रेअरचें** ( सामान्य प्रार्थनेचें ) **इंग्लिश** भाषेंत रचलेलें पहिलें पुस्तक उपयोगांत आणलें, आणि **"आक्ट ऑफ् युनिफॉर्मिटि"** ( प्रार्थना, उपासना, इत्यादिकांची एकरूपता हीविषयीं कायदा ) नांवाचा कायदा केला; त्यानें देवळांत धर्मोपदेशकांनीं त्या पुस्तकाहून दुसरें कोणतेंही उपासनेचें पुस्तक वाचूं नये अशी बंदी केली, आणि लोकांनीं नवीन

प्राटेस्टंटधर्मसंबंधी सुधारणा.

धर्मास अनुसरलेंच पाहिजे असा निर्बंध केला. ह्याशिवाय **क्रान्मरानें**, जे जे परदेशीय **प्राटेस्टंट**धर्मी **इंग्लंडां**त येत, त्यांचें आगतस्वागत करण्याचा उद्योग मांडला. हे **प्राटेस्टंट स्पेन** आणि **नेदर्लंड्स** ह्या देशांतून पळ पळून येत होते. त्या देशांत **पांचव्या चार्लसा**च्या अमलांत **इन्क्विझिशन** (धर्मसमीक्षणसभा) नांवाच्या एका न्यायाच्या गुप्त कोडतापुढें, **क्याथलिक**-पंथाच्या संबंधानें सर्व पाखंड्यांचा, नानाप्रकारच्या शरीरांना पीडा करून, छळ होत होता.

शहरवजा गांवांतून, नवीन धर्मापासून आपणांला किती स्वातंत्र्य मिळतें हें लोक समजत होते, म्हणून त्या गांवांना हे फेरफार आनंदप्रद झाले. परंतु आडवळणी खेड्यापाड्यांच्या प्रदेशांतून लोकांना "**मास्स**चा" (प्रभुभोजनपूर्वक उपासनेचा) अभ्यास पडलेला होता, म्हणून ते त्या प्रकारच्या उपासनेकरितां मोठ्यानें ओरड करूं लागले; आणि १५४९ तल्या **व्हिटमन्डे** (ईस्टर नांवाच्या सणापासून सातवा सोमवार) ह्या दिवशीं **सांफर्ड कोर्ट्नी** नांवाच्या खेड्यांत एक बंड उठलें. तें **डेव्हन्शायर** आणि **कार्नवाल** ह्या दोन्ही कौंटींभर पसरलें. बंडवाल्यांनीं **एक्झीटर**ला वेढा दिला, आणि **लार्ड ग्रे** ह्यानें **जर्मन** आणि **इटालियन** फौजेच्या मदतीनें मोठ्या प्रयासानें त्यांचा पराभव केला.

पश्चिमेकडे बंड होतें.

त्याच वेळीं **नार्फक** नांवाच्या कौंटींत शेतकरी लोकांमध्यें दुसरें एक बंड उद्भवलें. चहूंकडें फार असंतोष उत्पन्न झालेला होता. समाईक गायरानें आवारें घालून कुडल्यामुळें, आणि काम मिळेनासें झाल्यामुळें, सर्व देश, रिकामटवळे, उनाड, भणंगभि-

नार्फकांतील बंड, १५४९.

कारी, आणि चोर ह्या लोकांनीं भरून गेला; आणि तशांत धान्याचा पुरोठा थोडा, आणि नाणें हीणकस केलें, ह्या दोहों गोष्टींनीं, हालअपेष्टा फार वाढली. **आठव्या हेन्री**च्या कारकीर्दीच्या अखेरीच्या भागांत, रुप्याचीं नाणीं पाडतांना रुप्यांत पुष्कळ हीण मिसळून, त्या राजानें ५०००० पौंड उत्पन्न केलेले होते. त्यामुळें, प्रत्येक नाणें जितक्या मोलाचें म्हणवी त्याहून त्याचें खरें मोल फार कमी झालें; आणि आतां **अमेरिकें**तून सोनें, आणि रुपें, ह्यांचे ढिगावर ढीग येऊं लागले, त्यामुळें नाण्याचें मोल फारच उतरलें. हळू हळू शिलिंगाचें खरें मोल फक्त सहा पेन्सांइतकें झालें; तशांत प्रत्येक माणसाला कामाबद्दल मजूरी, किंवा नाण्यांची संख्या, मिळे, ती पहिल्याइतकीच राहिली. अशी स्थिति असतां, **पार्लमेंटा**नें, १५४८ त, व्हेग्रन्सी, म्हणजे उनाडकी, किंवा भटकेपणा, ह्याच्या विरुद्ध सख्त कायदा केला, जणू कीं, कामधंदा किंवा पैसा मुळींच मिळत नसतांही, माणसें काम करून आपल्या श्रमाचें प्रतिफळ मिळवूं शकलीं असतीं. शेवटीं १५४९ त, **नारिच**जवळ एका **राबर्ट केट** नांवाच्या कातडीं कमावणाराच्या हुकमतीखालीं वीस हजार लोक जमले, आणि राजाच्या फौजेचा पराभव करून, त्यांनीं हक्कानें मागणीं केलीं तीं येणेंप्रमाणें; गरिबांना होणाऱ्या जाचांची दाद घेऊन त्यांचा परिहार करावा, आवारें घालून गायरानें कुडण्याची मनाई व्हावी, आणि राजाच्या प्रधानांना फांटा द्यावा.

नाणीं हीणकस केलीं जातात.

**लार्ड वारिक** ह्यानें तें बंड **जर्मन** फौजेच्या मदतीनें मोडलें; परंतु इतके पुष्कळ बखेडे झाल्यामुळें **लार्ड समर्सेट** हा लोकांना फार अप्रिय झाला. तो श्रीमंत होऊन उद्दाम झाला होता, आणि त्यानें **स्ट्रांड** नांवच्या **लंडन**च्या भागांत आपणाकरितां

**समर्सेट हौस** ( समर्सेटचा वाडा ) ह्या नांवाची भव्य टोलेजंग हवेली बांधविली. शिवाय, ह्याच वेळीं, त्यानें प्रत्यक्ष आपला भाऊ, **आड्मिरल** ( अरमाराचा अध्यक्ष किंवा मुख्य ) **सीमर,** ह्याला धरून कैदकरवून ठार मारविलें. त्या **सीमरानें काथरिन पार** हिच्याशीं विवाह केलेला होता, आणि ती वारल्यानंतर, तो, **राजपुत्री एलिझाबेथ** हिच्याशीं विवाह करण्याच्या, आणि तरुण राजाजवळून आपल्या भावाचें उच्चाटन करून आपण त्याच्या जागीं संरक्षक होण्याच्या, प्रयत्नांत होता. हा भावाचा खून जरूर होता असें मानलें तरी देखील, त्या गोष्टीनें राष्ट्रांतील लोकांच्या अंतःकरणाला धक्का दिला, आणि कौन्सिलानें **समर्सेटा**ला राज्यसंरक्षक हा अधिकार जबरीनें सोडून देण्याला लावलें. पुढें तो तीन वर्षेंपर्यंत कौन्सिलांत राहिला होता, आणि नंतर **वारिकच्या अर्लानें**, त्याच्या भारदस्तीला भिऊन, **पार्लमेंटा**कडून त्याला दोषी ठरववून, १५५२ त जान्युअरीच्या २२ व्या तारिखेस त्याला देहांतशासन करविलें.

समर्सेटाला ठार मारविलें, १५५२.

हा **वारिकचा अर्ल, जान डड्ले,** आतां राज्यसंरक्षक झाला. **सातव्या हेन्री**करितां पैसा जबरदस्तीनें उकळणारा जो **डड्ले** त्याचा तो पुत्र होता. तो आपलेंच हित पाहणारा पुरुष होता. परंतु जरी तो **समर्सेटाहून** चांगला प्रजापालक असता, तरी देखील, नाण्याचें मोल कमी झाल्यामुळें, आणि कामधंदा मिळेनासा झाल्यामुळें उत्पन्न झालेली दैना त्याच्यानें निवारवली नसती. तोही **प्राटेस्टंटां**नाच अनुकूल होता. **वुइन्चेस्टरचा बिशप, गार्डिनर,** आणि **लंडनचा बिशप, बान्नर,** ह्यांना प्राचीन धर्ममतांचा अभिमान धरल्याबद्दल **टौअरमध्यें**

वारिकचा अर्ल राज्यसंरक्षक होतो.

कैदेंत टाकलें, आणि त्यांच्या जाग्यांवर **लाटिमर** आणि **रिड्ले** हे दोघे **प्राटेस्टंट** बिशप नेमले. **१५५२** त दुसरें एक प्रार्थना-पुस्तक, आणि दुसरा **युनिफार्मिटीचा आक्ट** (एकरूपतेचा कायदा) करवून प्रसिद्ध केला, आणि **एड्वर्डा**ची बहीण **मेरी** ही **क्याथलिक** होती, तिनें आपल्या खासगी भजनमंदिरांत "मास्स" (प्रभुभोजनपूर्वक उपासना) श्रवण करूं नये असा त्या तरुण राजपुत्रानें आग्रह धरला. ह्या त्याच्या धर्मसंबंधी कळकळीनें **स्पेन** देशाशीं युद्ध उद्भवण्याच्या लागांत आलें होतें.

युनिफार्मिटीचा दुसरा आक्ट होतो, १५५२.

ह्या धर्मसंबंधी कलागतींपासून वळून, विद्वान लोक गरिबांच्या मुलांना विद्या शिकविण्याच्या कामीं किती झटून प्रयत्न करीत होते, हें पाहून आनंद वाटतो. ह्यापूर्वीच **आठव्या हेन्रीच्या** कारकीर्दीत, **डीन** (बिशपाच्या हाताखालचा एक धर्माधिकारी) **कालेट** ह्यानें **सेन्ट पॉल्स स्कूल**, म्हणजे **सेन्टपाल** नांवाची शाळा, स्थापली होती, आणि आतां पुष्कळ सुखवस्तु लोक काईम संस्था करून शाळा स्थापूं लागले. नानाप्रकारच्या **मानस्टरिझ** (मठ) मोडून उत्पन्न झालेल्या द्रव्यांतून देणग्या मिळवून, **सहाव्या एड्वर्डानें** अठरांहून कमी नाहींत इतकीं **ग्रामर स्कूल्स,** म्हणजे **लाटिन** आणि **ग्रीक** ह्या भाषा शिकविण्यासाठीं शाळा, ह्यांना स्वास्थ्यें करून दिलीं. **बिशप रिड्ले** ह्यानें एका वेळीं **लंडनां**तील गरीब लोकांची दुःखद स्थिति वर्णन करून राजापुढें धर्मोपदेश केला, त्याचा परिणाम असा झाला कीं, गवशीं आणि पोरकीं मुलें ह्यांकरितां **ब्लू कोट स्कूल** (ह्या शाळेंतील मुलांनीं एकसारखे निळे आंगरखे घालावे

सहाव्या एड्वर्डाचीं ग्रामर स्कूल्स म्हणजे लाटिन आणि ग्रीक ह्या भाषा शिकविण्याच्या शाळा.

असा नियम होता, त्यामुळें निळे डगलेवाल्या मुलांची शाळा असें तिला म्हणत) किंवा **क्राइस्ट चर्च हॉस्पिटल** (ख्रिस्ती धर्मसंबंधी रोगीशाला) ह्या नांवाची शाळा १५५३ त स्थापली.

असा प्रकार असतां, ह्यापूर्वींच त्या तरुण राजाची कारकीर्द समाप्तीस येऊं लागली होती. त्याला क्षयरोगानें गांठलें होतें, आणि तो फार दिवस वांचणार नाहीं हें त्याच्या कौन्सिलदारांच्या लक्ष्यांत येऊन चुकलें. **वारिक** ह्याला १५५१ त **नार्थबर्लंडचा ड्यूक** हा किताब किंवा अधिकार दिलेला होता. **पर्सीझ** ह्या उपनांवाचे पूर्वींचे **ड्यूक**, ह्यांनीं, दूषित ठरल्यामुळें, त्या **कौन्टीची अर्लडम** (अर्ल हा अधिकार) गमावली होती. जर **मेरी** गादीवर बसली तर, ती **क्याथलिक** धर्म पुनः स्थापन करील, आणि आपला नाश होईल, हें आतां **वारिका**च्या लक्ष्यांत येऊन, चुकलें. म्हणून त्यानें **एड्वर्डा**ची समजूत करून त्याला एका कागदावर सही करण्यास प्रवृत्त केलें. त्या कागदांत, **एड्वर्डा**च्या दोघी बहिणी **मेरी** आणि **एलिझाबेथ** ह्यांना एकीकडे ठेवून, **आठव्या हेन्रीची** बहीण **मेरी** हिची नात, **लेडी जेन ग्रे** (२६६ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा), हिनें **एड्वर्डा**च्या मागून गादीवर बसावें असें ठरविलें होतें.

लेडी जेन ग्रे हिला एड्वर्डाच्या मागून गादीवर बसविण्याचें ठरविलें.

ह्या गोष्टीच्या थोडे दिवस अगोदर, **लेडी जेन ग्रे** हिनें **नार्थबर्लंडच्या ड्यूकाचा** पुत्र, **लार्ड गिल्फर्ड डड्ले**, ह्याच्याशीं लग्न केलेलें होतें, त्यामुळें, त्या **ड्यूका**ला, आपली सत्ता काईम राहील, अशी आशा होती. वर सांगितलेल्या कागदावर, **एड्वर्डा**च्या भोंवतीं मोठे मोठे पुरुष होते, त्या सर्वांनीं सह्या केल्या. परंतु **पार्लमेंटा**च्या संमतीवांचून तो कागद खरोखर निरुपयोगी

होता. शेवटीं १५५३ त जूलईच्या ६ व्या तारिखेस, तो तरुण राजा आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी मरण पावला. त्यानें फक्त सहावर्षें राज्य केलें.

## मेरी, १५५३–१५५८.

**एड्वर्ड** राजा मृत्यु पावतांच, **नार्थंबर्लंडानें**, **मेरी**ला कैद-करून तिचें गादीवर दावा सांगावयास येणेंच बंद करावें ह्या इराद्यानें, **हर्टफर्डशायरां**त **हन्स्डन** एथें एक शिपायांची टोळी पाठविली. नंतर दुसरे चार लार्ड्स बरोबर घेऊन तो त्वरेनें **सायन हौस** (सायन एथील वाडा) एथें गेला, आणि **लेडी जेन ग्रे** हिच्यापुढें गुडघे टेंकून तिला राणीसाहेब म्हणून मोठ्यानें हाक मारून त्यानें मुजरा केला. त्या सोळा वर्षांच्या उमरीच्या, सकलगुणसंपन्न, सुंदरीच्या, राज्याच्या गादीविषयीं इच्छा किंवा कल्पना, कधींही ध्यानींमनीं देखील आली नव्हती, म्हणून तो मुजरा ऐकून ती भीतीनें गांगरून गेली. ती **प्राटेस्टंट** होती म्हणून, फक्त त्या नात्यानें तिच्या मनोवृत्तींना स्फुरण आणून, **मेरी**ला आड येण्याची गोष्ट तिच्याकडून मान्य करविली. नंतर **नार्थंबर्लंडानें लंडनां**त जूलईच्या १० व्या तारिखेस, ती राणी झाली असा डांगोरा पिटविला. परंतु लोकांनीं रुष्ट मुद्रेनेंच तो ऐकला, कारण ते **नार्थंबर्लंड**चा द्वेष करीत होते, आणि **मेरी** हीच यथान्याय आपली राणी असें मानीत होते.

लेडी जेन ग्रे राणी झाली म्हणून लंडनांत डांगोरा पिटला, तारीख १० जूलई १५५३.

मध्यावसरांत **मेरी** आळसांत राहिली नव्हती. तिच्या गुप्त

मित्रांनीं तिला इशारा केल्यामुळें, **नार्थंबर्लंडाचे** शिपाई येऊन पोहोंचण्यापूर्वींच पळून जाऊन, तिनें **हाउअर्ड** उपनांवाचें जें **नार्फकच्या ड्यूकाचें** कुटुंब होतें, त्याचा आश्रय केला. तेथें असतां लवकरच तिनें आपल्याभोंवतीं हजारों लोक जमविले, आणि ती **लंडनास** कूचकरून गेली. तेथें आनंदानें जयघोष करून तिचा आदर सत्कार केला. **नार्थंबर्लंड** हा त्या समयीं **केंब्रिज** एथें निघून गेलेला होता. त्या शहरांत जेव्हां तिच्या नांवानें डांगोरा पिटला, तेव्हां त्याला आपली टोपी वर उडवून इतरांबरोबर जयघोष करावा लागला. त्याला, त्याचा पुत्र व **लेडी जेन ग्रे** ह्यांसहित, पकडून कैदकरून **टौअरांत** पाठविलें, आणि पुढें एका महिन्यानें, म्हणजे १५५३ त आगस्टच्या २२ व्या तारिखेस, त्याला ठार मारलें, तेव्हां त्याच्याकरितां कोणीही हळहळलें नाहीं.

मेरी राणी झाली असा लंडनांत डांगोरा पिटला, ता० १९ जुलई १५५३.

**नार्फकचा ड्यूक**, आणि **बान्नर** आणि **गार्डिनर** हे दोघे **बिशप**, ह्यांना **टौअरां**तील बंदिखान्यांतून मुक्त केलें, आणि त्यांच्या जागीं **लाटिमर** व **क्रान्मर** ह्या दोहों **प्राटेस्टंट बिशपांना** तेथें कैदेंत टाकलें. जेव्हां **पार्लमेंट** भरलें तेव्हां, **मेरीला** असील किंवा धर्मपत्नीभव ठरविलें, आणि **एड्वर्डाच्या** कारकीर्दींत जे धर्मसंबंधी कायदे पसार झालेले होते ते सारे रद्द केले. लग्नें केलेल्या धर्माधिकाऱ्यांना त्यांच्या देवळांतून हाकवून दिलें, **प्रार्थना-पुस्तक** मना केलें, आणि 'मास्स' म्हणजे प्रभुभोजनपूर्वक उपासना, पुनः पूर्ववत् चालू केली. परंतु ह्या शेवटच्या फेरफाराबद्दल **पार्लमेंट** पुष्कळ दिवस वाद करीत होतें. **बान्नर**

क्याथलिक धर्म पुनः पूर्ववत् चालू होतो.

ह्याला **लंडनचा बिशप** केलें, आणि **गार्डिनराला** चान्सेलर (पंडितराव) नेमलें. राणी जें जें करी त्या सर्वांत ती **स्पेन** देशचा वकील **साइमन रेनर्ड** ह्याच्या सांगणीप्रमाणें फार वागे.

**लंडन**, आणि इतर मोठमोठ्या शहरवजा गांवांपैकीं कांहीं, ह्यांखेरीज, बाकीचा सारा देश, प्राचीन धर्म परत मिळाल्यामुळें फार संतुष्ट झालेला होता. परंतु **मेरीची** इच्छा ह्याहून पुढें जाण्याची होती. तिच्या अंत:करणाची स्थिति समजून घेण्याला, आणि तिच्या कारकीर्दींत झालेल्या क्रूर कर्मांबद्दल तिच्याविषयीं कींव वाटण्याला, आपण आपणांला तिच्याजागीं ठेवलें पाहिजे. ती नेकीची, किंवा न्यायनिष्ठ अंत:करणाची, परंतु संकुचित मनाची बायको होती. तिचें वय सदतीस वर्षांचें होतें, आणि तिनें बालपणापासून क्लेश भोगिलेले होते. ती जन्मानें अर्धी **स्पानियर्ड** होती, आणि आपल्या आईवर व आईच्या जातीच्या लोकांवर तिची निष्ठा होती. तिच्या आईच्या पदरीं कांहीं दोष नसतां तिचा विवाह-संबंध तोडला, तिची फटफजिती केली, आणि तिच्याजागीं **एलिझाबेथची** आई **आन बुलिन** हिला राणी केलें, ह्या गोष्टी तिनें (मेरीनें) पाहिलेल्या होत्या. **पोपाच्या** विरुद्ध केलेले ठराव, आणि प्रवृत्तींत आणलेला नवीन धर्म, ह्यांपासून, आपल्या साऱ्या जन्मांतलें हें परमावधीचें दु:ख आपणाला भोगावें लागलें, असा कार्यकारणभाव जुळविण्याला तिला शिकविलेलें होतें. तिचा बाप तिच्याशीं नेहमीं कठोरपणानें वागे, आणि **एलिझाबेथ** ही तिची सावत्र बहीण असूनही तिला ती राजपुत्री असें कधींही म्हणत नसे, त्या **एलिझाबेथला**, बापानें आपल्या मागें राणी नेमून ठेवलें. नंतर तिचा धाकटा भाऊ **एड्वर्ड** जन्मास आला. त्या-

राणी मेरी हिचे गुणदोष.

ला तर अग्रमान देऊन त्याच्या दोघां बहिणींच्या अगोदर गादी मिळावी असा बापानें ठराव केला, आणि त्या **एड्वर्डानें** आपल्या कारकीर्दींत, **मेरी**कडून जुलुमानें आपल्या धर्माचा त्याग करविण्याविषयीं यत्न केला. ह्या साऱ्या गोष्टी लक्ष्यांत आणल्या म्हणजे, त्या **मेरी**ला जे जे आडवे आले त्यांच्या विरुद्ध तिच्या मनांत जालीम द्वेषभाव उत्पन्न झाला, ह्या गोष्टीविषयीं आपणांला विस्मय वाटेल काय ?

तिच्या भावाच्या मृत्यूनें सारा रंग पालटला. **नार्थंबर्लंड**च्या वागणुकेनें लोकांना विटविलें होतें. त्यांनीं **मेरी**ला आपली राणी मानून तिचा जयजयकार केला. आतां पहिल्यानेंच ती स्वतंत्र झाली, आणि तिच्या हातीं सत्ता आली. **पोपा**चा **इंग्लंडां**तील अधिकार पुनः पूर्ववत् स्थापित व्हावा ही तिची परम इच्छा होती, आणि ती गोष्ट सिद्धीस नेण्याला एक उपाय म्हणून, तिचा माऊस भाऊ आणि सर्व **क्याथलिक**पंथी लोकांचा मुख्य आश्रय असा जो **पांचव्या चार्लेस बादशाहा**चा पुत्र (२८४ वें पृष्ठ पहा), **स्पेन** देशचा राजा **फिलिप**, त्याच्याशीं विवाह करावा, अशी **रेनर्ड** (स्पेनदेशचा वकील) ह्यानें तिला सल्ला दिली, ती तिनें ऐकली. ह्या लग्नाचा संकेत लोकांना कळला तेव्हां ते नाखुश झाले, आणि **पार्लमेंट** तर फारच नाखुश झालें कारण त्यांची इच्छा, तिनें **चौथ्या एड्वर्डा**चा पणतू, **डेव्हनचा अर्ल, एड्वर्ड कोर्ट्ने**, ह्याच्याशीं विवाह करावा, अशी होती. **स्पानिश** राजा झाला असतां, **इंग्लडां**त तो आपणाला अतिशय मोठा अखत्यार असावा असा हक्क सांगूं लागेल, आणि तें यमस्वरूप इ-

मेरीचें घांटत असलेलें लग्न.

न्किझिशनही ( धर्मसमीक्षण सभाही ) स्थापूं लागेल, अशी त्यांना भीति वाटत होती.

तेव्हां इंग्लंडच्या सर्व भागांतील लोक फार अस्वस्थचित्त झाले, आणि राजपुत्री एलिझाबेथ हिचा डेव्हनच्या अर्लाशीं विवाह करून, त्या उभयतांना मेरीच्या बदली गादीवर बसवावें, ह्या उद्देशानें, डेव्हनशायर, वेल्स, मिड्लंड कौंटीझ ( देशमध्यांतील कौंटी ), आणि केंट, इतक्या प्रांतांत संगनमत होऊन कट झाला. परंतु अव्यवस्थेमुळें, फक्त केंट कौंटींतील लोक, त्याच कौंटींत राहणाऱ्या एका सर टामस वायट नांवाच्या शूर गृहस्थाच्या हुकुमतीखालीं बंड करून उठले. त्यांनी टेम्स नदीवरील जहाजें आणि तोफा हल्ला करून हस्तगत केल्यीं; आणि त्यांवर नार्फकचा ड्यूक जी शिबंदी घेऊन गेला ती देखील त्या ड्यूकाला सोडून "वायट वायट" म्हणून मोठ्यानें गर्जना करून त्या बंडवाल्यांना जाऊन मिळाली. खुद्द मेरीनेंच त्या दिवशीं बाजू राखली. ती धीटपणानें घोड्यावर बसून गिल्डहाल ( लंडनांतील कार्पोरेशन म्हणजे सनदी मंडल ह्याची सभा भरण्याची हवेली ) एथें गेली, आणि त्या नगरांतील जनांना, मी पार्लमेंटाच्या अनुमोदनावांचून लग्न करणार नाहीं असें वचन देऊन, तुम्ही मजशीं प्रजाधर्मानें वागाल असा मला भरवसा आहे, असें गौरवून सांगितलें. नंतर जेव्हां वायट फेब्रुअरीच्या ३ ऱ्या तारिखेस, लंडनांत येऊन पोहोंचला, तेव्हां २५००० लोकांनीं त्याचा मार्ग रोखला. पुढें त्याला टेंपलबार एथें पकडून कैदकेलें, आणि टौअरांत पाठविलें.

वायट ह्याचें बंड, फेब्रुअरी १५५४.

नंतर सूड घेण्याचें घोर काम चालू झालें. मेरीनें हा वेळपा-

वेळीं लेडी जेन ग्रेला धका लावला नव्हता, परंतु आतां तिनें, तिला आणि तिच्या पतीला ठार मारण्याविषयीं आपला रुकार दिला. त्या उभयतांचा, १५५४ त फेब्रुअरीच्या १२ व्या तारिखेस वध केला. ग्रे आणि सफक हे दोघे लार्ड्स, आणि वायट, आणि इतर प्रमुख लोक ह्यांचा पुढें लवकरच शिरच्छेद केला, आणि शंभरांहूनही ज्यास्त सामान्यप्रतीचे लोक ह्यांना फांशीं दिलें. राजपुत्री एलिझाबेथ हिला टौअरांत पाठवून अटकेंत ठेवलें. तिलाही ठार मारविण्याची रेनर्डची इच्छा होती, परंतु गार्डिनरानें ती गोष्ट होऊं दिली नाहीं. तिला नंतर आक्सफर्डशायरांत वूडस्टाक एथें, आणि पुढें हर्टफर्डशायरांत हाट्फील्ड एथें एकाच्या दिम्मतींत ठेवलें होतें.

लेडी जेन ग्रे आणि इतर लोक ह्यांना ठार मारतात.

पुढें थोड्या महिन्यांनीं, १५५४ च्या जूलईत मेरीचें फिलिपाशीं लग्न झालें. हा संयोग सुखकर झाला नाहीं. पार्लमेंट फिलिपाला राज्याभिषेक करून राजा करण्याला परवानगी देईना, आणि तो मेरीशीं नेहमी सभ्यपणानें वागे, तथापि त्याचें त्या मध्यमवयस्क बायकोवर प्रेम नव्हतें. तो तिला पुत्र व्हावा या आशेनें इंग्लंडांत एक वर्ष राहिला, परंतु शेवटीं कंटाळून तो आपल्या देशीं परत गेला. मध्यावसरांत मेरीनें आपले बेत पुढें चालविले.

राणीचें लग्न, जूलई १५५४.

आपल्या कह्यांत बऱ्याच प्रकारें वर्तेल असें पार्लमेंट युक्तिप्रयुक्तीनें निवडवून तिनें भरविलें. त्या पार्लमेंटानें पोपाकडील लेगेट (वकील) घेण्याला आपला रुकार दिला, आणि आठव्या हेन्री-

गोपाकडील एक लेगेट (वकील) येतो.

च्या कारकीर्दीत ज्या **साल्झबरीच्या मार्चोयनेस्सचा** ( मार्किस्सच्या बायकोचा ) शिरच्छेद झाला होता त्या **मार्चोयनेस्सचा** पुत्र, **कार्डिनल पोल**, हा, **पोपाकडील लेगेट** ह्या नात्यानें आपल्या क्रीडानौकेच्या नाळीच्या बाजूवर रुप्याचा क्रूस लावून ती नौका **टेम्स** नदीच्या मुखावाटे हाकारून वर आला. तेव्हां त्यानें **लार्ड्स** आणि **कामन्स**, म्हणजे **पार्लमेंटच्या** उभय सभांचे सभासद, ह्यांना **पोपाच्या** नांवानें दोषमोचन ( निर्दोषीकरण ) दिलें, तें त्यांनीं गुडघे टेंकून स्वीकारलें. एथपर्यंत विरोध बिलकूल नव्हता. १५५४ त **कार्डिनल पोल** हा **कांटबेरीचा आर्चबिशप** झाला, आणि त्या नात्यानें **कौन्सिलांत** तो एक मुख्य स्थान पावला. परंतु जेव्हां **पोप चौथा पाल** ह्यानें, **धर्मसंबंधी** खात्याच्या स्थावर मिळकतीचा प्रत्येक एकर परत दिला पाहिजे, 'म्हणून हक्कानें मागणें केलें, तेव्हां ती गोष्ट मर्यादेबाहेर गेली. **मेरीच्यानें** परत देववेल तितकी जमीन तिनें परत दिली, परंतु थोर थोर बडे लोकांनीं शपथ घेतली कीं, जोंपर्यंत आमच्या कमरेला तरवार लटकलेली राहील, तोंपर्यंत आम्ही आपली जमीन रक्षण करूं. ह्यावरून लक्ष्यांत येईल कीं, **आठव्या हेन्रीनें** मानस्टरिझच्या जमिनी बडे लोकांमध्यें वांटून देऊन, **पोपाला** इंग्लंडावर खरा कबज पुनः कधीही मिळूं नये असा पक्काबंदोबस्त करून टाकला होता.

बडे लोक धर्माच्या खात्यासंबंधी जमिनी सोडून देण्याला नाकारितात.

आतां क्रूरपणा, आणि त्यापासून उत्पन्न होणारे क्लेश, ह्यांविषयीं दुःखकारक गोष्ट सांगावयाची उरली आहे. **इंग्लंडाला** पुनः एकवेळ **पोपाचें** ताबेदार करण्याविषयीं आपली इच्छा सिद्धीस गेली नाहीं खरी, तथापि पवित्र धर्माच्या ( म्हणजे क्याथलिक ध-

र्मांच्या ) आड येणाऱ्या पाखंडी लोकांना तरी मुळासकट उपटून टाकण्याविषयीं प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें **मेरीच्या** मनांत वागूं लागलें. **कार्डिनल पोल** हा स्वतः दयाळू आणि नेमस्त पुरुष होता, परंतु **पोप चौथा पाल**, त्याचा धनी, हा फार क्रूर छलक होता, त्याची तो फार वचक बाळगीत होता. नंतर **लॉलईसांच्या** विरुद्ध जीं **चौथ्या** आणि **पांचव्या हेन्रीचीं स्टाटुटें**, म्हणजे कायदे, होते ते पुनः अमलांत आणले, आणि **सेन्ट पाल** नांवाच्या देवळाचा **कानन** ( धर्माधिकारी विशेष ), **राजर्स**, आणि **ग्लास्टरचा बिशप**, **हूपर**, हे दोघे त्या कायद्यांचे पहिलेच बळी होऊन, त्यांना १५५५ च्या फेब्रुअरींत, खांबाला डांभून जिवंत जाळलें. त्यांच्या मागून इतरांनाही त्वरेनें त्यांच्यासारखेंच जिवंत जाळलें, त्यांची संख्या येणेंप्रमाणें; एप्रिल आणि मे ह्या दोहों महिन्यांत मिळून चार, जूनांत सहा, जूलईंत अकरा, आणि आगस्टांत अठरा. ह्याप्रकारें धर्माकरितां प्राणांस मुकणाऱ्या लोकांची यादी वाढत गेली. आक्टोबरांत, **लाटिमर** आणि **रिड्ले** ह्या दोघांना पाठीशीं पाठ लावून त्याच खांबाला साखळदंडांनीं खिळवून जिवंत जाळलें.

प्राटेस्टंटांचा छळ, १५५५–१५५८.

खांबाला बांधल्यावर **लाटिमर** म्हणाला, "**मास्टर रिड्ले**, मर्द होऊन नांव गाजीव. आम्ही आज **इंग्लंडांत** असला टेंबा पाजळूं कीं देवाच्या दयेनें तो कधींही विझणार नाहीं." आणि त्यांनीं निःसंशय तसाच तो पाजळला. कोणता धर्म खरा, किंवा कोणता खोटा, ह्या प्रश्नाची **इंग्लंडाला** इतकी मुजाख नव्हती. ज्या प्रश्नाची मुजाख होती तो हा, धर्माच्या कामांत माणसाला आपल्या अंतःकरणाला खरें वाटेल तें श्रद्धापूर्वक मानण्याचा हक्क आहे किंवा

नाहीं ? आणि त्या हक्काचें रक्षण करण्याचें त्याला सामर्थ्य आहे किंवा नाहीं ? वर सांगितलेल्या लोकांना, आणि १५५६ त **आर्चबिशप क्रान्मर** ह्याला, जिवंत जाळून मारलें त्या गोष्टीनें, शरीरयातना करून छळ करण्याचा जुलूम चालला असून त्याचा जणू जो गुडद काळोख पडला होता त्यामध्यें, सत्य आणि धैर्य ह्यांचा जणू खरोखर टेंभाच पेटला. **आर्चबिशप क्रान्मर** ह्याला जिवंत जाळून मारलें तेव्हां त्यानें, पूर्वी एकवेळ आपलें मत सोडलें अशा कबुलीच्या कागदावर धैर्यहीनतेनें ज्या उजव्या हातानें सही केली होती, तो उजवा हात पहिल्यानें आगींत खुपसला. एकंदरीनें, तीन वर्षांत धर्माकरितां निदान दोनशेंऐशीं प्रामाणिक आणि देवाला भिणारे लोक प्राणांस मुकले. परंतु ते सर्व व्यर्थ मेले नाहींत; कारण, त्यामुळें उत्पन्न झालेल्या दहशतीनें सर्व देश आपल्या छायेनें झांकून टाकला; त्या दहशतीनेंच, पुष्कळ चांगले चांगले पुरुष स्वदेश त्याग करून परागंदा होऊन **फ्रांकफर्ट** आणि **जिनीव्हा** एथें जाऊन राहिले; आणि त्याच दहशतीनें **इंग्लंडां**तील **क्याथलिक** व तसेच **प्राटेस्टंट**ही, **पोपा**ला, किंवा राज्याधिकारी पुरुषाला किंवा स्त्रीला, प्रांजल धर्मविषयक मताकरितां मनुष्यांच्या प्राणांची आहुति देऊं देणें, हें किती भयावह आहे, ह्या गोष्टीचा विचार करावयास लागले.

लाटिमर, रिड्ले, आणि क्रान्मर, ह्यांना जिवंत जाळतात.

लोक आतां राणीच्या क्षीण प्रकृतीविषयीं गुजगूज करून बोलूं लागले, आणि भयंकर प्रसंग बंद होतील असा काळ केव्हां येईल म्हणून आशा करूं लागले. **फिलिप दुसऱ्यानें** १५५७ त **इंग्लंडांत** आला त्यापासूनही वस्तुस्थिति कांहीं सुधरली नाहीं. **फ्रा-**

न्साच्या विरुद्ध त्याला युद्ध करावयाचें होतें, त्यांत **मेरीला** सामील होण्याविषयीं दोन गोष्टी सांगून तिचें मन वळवावें म्हणून तो आला होता. तें युद्ध, **कौन्सिलाच्या** इच्छेच्या अतिशय विरुद्ध, **मेरीनें** आपल्याच मतें आरंभिलें, आणि अखेरीस त्या गोष्टीचा **मेरीला** फार पश्चात्ताप झाला; कारण, १५५८त, **काले** शहर सतत दोनशेंहून जास्ती वर्षें **इंग्लंडच्या** ताब्यांत असून, तेथील रक्षणाचा बंदोबस्त नीट नसल्यामुळें **फ्रेंच** लोकांनीं जिंकून परत घेतलें. पुढें लवकरच **कालेच्या** अमलाखालचा कांहीं प्रांत होता त्यांतील **गिवनेझ** नांवाचा किल्लाही **फ्रेंचांस** द्यावा लागला, तेव्हां **इंग्लिश चानलच्या** पलीकडे **यूरोपांत इंग्लिशांकडे** एक फूटभर सुद्धां जमीन राहिली नाहीं. असें म्हणतात कीं, **काले** हातचें गेलें तेव्हां **मेरी** मोठ्यानें ओरडून म्हणाली, "जेव्हां मी मरेन तेव्हां **काले** हें नांव माझ्या काळजावर कोरलेलें सांपडेल." त्याच वर्षी, म्हणजे १५५८ त, नोव्हेंबरच्या १७ व्या तारिखेस, **मेरीला** मृत्यु आला, आणि **कार्डिनल पोल** हा तिच्या मागून बेवीस तासांनीं वारला. हीं भयंकर छळ करणारीं माणसें नाहींशीं झालीं तेव्हां, **इंग्लंड** पूर्वींहून मोकळेपणानें दम घेऊं टाकूं लागलें.

काले इंग्लिशांच्या हातून जातें, १५५८.

# प्रकरण १५.

## एलिझाबेथच्या अमलाखालील शांति आणि संवृद्धि

एलिझाबेथ, १५५८–१६०३

१५५८ त नोव्हेंबरच्या १७ व्या तारिखेस, जेव्हां मी इंग्लंडची राणी झालें ही खबर राजपुत्री एलिझाबेथ हिला कळली, तेव्हां ती हाट्फील्ड एथील कृत्रिम वनांत एका झाडाखालीं बसलेली होती. ती खबर कानीं पडतांच ती गुडघे टेंकून मोठ्यानें म्हणाली "ही देवाची करणी आहे, आणि आमच्या दृष्टीनें ती अद्भुत आहे." हे तिचे शब्द, तिच्या साऱ्या कारकीर्दींत पाडलेल्या सोन्याच्या नाण्यांवर छापलेले किंवा ठसवलेले होते.

स्त्री ह्या नात्यानें, एलिझाबेथच्या स्वभावांत पुष्कळ आणि मोठमोठे दुर्गुण किंवा दोष होते; राणी ह्या नात्यानें, तिची कितीही वाखाणणी केली तरी ती वाजवींपेक्षां फाजील म्हणून फारकरून होणारच नाहीं. तिच्या कारकीर्दीच्या अखेरीस तिला म्हणतां आलें तें खरें होतें. तें हें, "मी सदा माझ्या डोळ्यांपुढें अखेरीचा जज्जमेंट "डे, म्हणजे (खिस्तीशास्त्राप्रमाणें) जगाचा न्याय करण्याचा दि-"वस, ठेवीं, आणि कोणा एका वरिष्ठ न्यायाधीशापुढें मला हि-"शेब द्यावा लागेल, हें मनांत वागवून मी राज्यकारभार करीं. "त्या न्यायाधीशाच्या न्यायासनापुढें मी अर्ज करतें कीं, माझ्या "लोकांच्या कल्याणाकडे ज्या विचाराचा रोंख नव्हता, असला "विचार माझ्या अंतःकरणांत मीं कधींही वागविला नाहीं, हें खरें "किंवा खोटें ह्याचा निवाडा व्हावा." तिच्या बापापासून पिढीजाद, दृढ संकल्पशक्ति, हिम्मत, स्वमतनिष्ठा, आणि लोकप्रीति

मिळविण्याची आवड, हे गुण, आणि त्यांच्या बरोबरच, निष्कपटपणा, आणि ज्यांनीं आपली कामगिरी बजाविली त्यांच्याविषयीं कृतज्ञता, ह्या दोहोंचा अत्यंत अभाव, हा दुर्गुण, तिच्या आंगीं आलेला होता. चैनबाजी, सुंदर पोशाक, आणि नखरेबाजी, ह्यांची तिला आवड असे ती, तिच्या आईपासून पिढीजाद आली; आणि लटकी फुशारकी, आई आणि बाप ह्या उभयतांपासून तिजमध्यें आली. परंतु **एलिझाबेथ** ही फुशारखोर नखरेबाज बायको होती असेंच केवळ नव्हे. राणी ह्या नात्यानें आपल्या कर्तव्याचें तिला खोल परिज्ञान, आणि चांगले कौन्सिलदार (मंत्री) निवडण्याविषयीं शाहणपण, होतें; आणि वारंवार अमुक एक गोष्ट तिच्या प्रजाजनांना हिताची किंवा गैरहिताची हें त्यांचें त्यांनाच जितकें स्पष्ट कळे, त्याहून तिला तें स्पष्ट कळत असे. तिला जीं कामें करावयाचीं होतीं तीं हीं. (१) गादीवर आपली स्थिति काईम राखणें, (२) आपल्या देशाला परदेशीय शत्रु आणि जबर कर ह्यांपासून मुक्त करणें, आणि (३) **इंग्लंड** संयुक्त, किंवा एकदिल, आणि बलाढ्य, राष्ट्र होई अशा प्रकारें, मुलकीखातें आणि धर्मसंबंधी खातें ह्यांतील अव्यवस्था मोडून तीं खातीं पूर्वीप्रमाणें व्यवस्थित करणें. हीं कामें करण्यांत जर ती वारंवार खोटें बोलणारी, आणि चंचल बुद्धीची असेल, तर, किती झाली तरी, ती स्वतः म्हणे, त्याप्रमाणें ती "अबला स्त्री" होती, आणि तिला बलाढ्य शत्रूंविरुद्ध आपला डाव खेळावयाचा होता, हें तो दोष उडविण्याला कांहींसें निमित्त म्हणून सांगतां येईल.

एलिझाबेथचे गुणदोष.

**एलिझाबेथ** गादीवर बसली तेव्हां **इंग्लंड**ची स्थिति इतकी कमाल वाईट होती, कीं तीहून वाईट अशी स्थिति असण्याची शक्यताच नव्हती. धर्मसंबंधी खात्याच्या जमिनी सरकाराकडे

आलेल्या होत्या त्या सोडून परत देऊन, आणि फ्रान्स देशाशीं नाशकारक असें युद्ध करून मेरीनें राज्याचा खजीना रिता केला होता. धर्मसंबंधी घोर छळणुकेनें उत्तम उत्तम माणसें पिटाळून देशबहिष्कृत केलेलीं होतीं, आणि सारा देश बंड करण्याच्या रंगांत आलेला होता. शिवाय, सर्वत्र एकसारखा असंतोष उत्पन्न झाल्यामुळें जीवित आणि धन ह्यांच्या सुरक्षितपणाचा भरवसा बिलकूल राहिला नव्हता. ह्या आंतल्या दुःखांना भर घालण्याला, बाहेरचीं संकटेंही मोठीं होतीं. आयर्लंडांत यादवी किंवा आपआपसांतील युद्ध मातले होतें, आणि स्काट्लंडची राणी, मेरी स्टयूअर्ट, हिनें फ्रान्सच्या डाफिनाशीं विवाह केलेला होता ती, एलिझाबेथ ही सशास्त्र लग्नाच्या बायकोपासून झालेली नाहीं असें उघड बोलूं लागली, आणि इंग्लिशांची गादी आपणास मिळाली पाहिजे असा तिनें दावा मांडला. यूरोपखंडांत क्याथलिक्स आणि प्राटेस्टंट्स ह्यांच्या दरम्यान मोठा झगडा चालला होता. तो एलिझाबेथच्या साऱ्या कारकीर्दीभर टिकला. फ्रान्सचा राजा दुसरा हेन्री हा, आपल्या प्रजेपैकीं ह्यूगेनाट्स नांवाच्या प्राटेस्टंटपंथी लोकांना दडपून टाकून नाहींसे करण्याविषयीं प्रयास करीत होता; आणि फिलिप राजा स्पेन देशांत पाखंडी (क्याथलिक धर्माला अमान्य) लोकांना जिवंत जाळून मारीत होता. फिलिपाला फ्रान्सची भीति वाटत होती म्हणून तो पहिल्यानें एलिझाबेथशीं स्नेहभावानें वागत होता; तथापि तिचें बरें व्हावें अशी त्याची खरोखर इच्छा कधींही नव्हती. शिवाय, ही गोष्ट स्मरेलच कीं, फिलिपाचा बाप पांचवा चार्लस ह्याला त्याची आजी, बर्या

इंग्लंडची दुर्बल अवस्था.

डीची मेरी (हिनें आस्ट्रियाचा माक्सिमिल्यन ह्याच्याशीं विवाह केलेला होता) हीपासून वारशानें लो कन्ट्रिझ (समुद्राच्या सपाटीहून सखल असलेले देश) ऊर्फ नेदरलंड्स हे देश मिळालेले होते. आतां नेदर्लंडर्स, म्हणजे नेदर्लंड्सचे लोक, टेंकीचे प्राटेस्टंट झालेले होते, आणि दुसरा फिलिप आणि इन्क्विझिशन (धर्मसमीक्षणसभा) ह्यांच्या अमलाखालीं, ह्यापूर्वीच ते अस्वस्थचित्त होऊं लागलेले होते. ह्याप्रकारें यूरोपखंडाचे दोन विभाग होऊन, क्याथलिक आणि प्राटेस्टंट असे दोन परस्पर शत्रूंच्या सैन्यांचे तळ किंवा गोट बनले, आणि पोप चौथा पाल ह्यानें इंग्लंडांतील गमावलेली आपली सत्ता मेरीच्या कारकीर्दीत पुष्कळ परत मिळविलेली होती, तो, एलिझाबेथ कोणता पक्ष धरते हें पाहण्यासाठीं खोळंबून राहिला होता.

यूरोपखंडांतील धर्मसंबंधी झगडा.

पहिल्यानें, शाहणपणानें, तिनें दोहोंतून एकही पक्ष धरला नाहीं. मेरीच्या कौन्सिलांत असलेल्या प्रधानांपैकीं पुष्कळांस तिनें तसेंच ठेवलें. तिनें त्यांत सर वुइलियम सेसिल नांवाचा एक शाहणा मुतसद्दी नवीन प्रधान नेमला. तो पुढें लार्ड बर्ली हा किताब पावून, राज्याचा सेक्रेटरी (चिटणीस) झाला, आणि त्यानें आपल्या साऱ्या जन्मभर तिची इमानें इतबारें सेवा केली. तिनें पार्लमेंट भरे तोंपर्यंत देवळांतील उपासनेंत फेरफार करण्याचें नाकारलें, आणि दरम्यानच्या वेळांत आपल्या प्रजाजनांच्या अंतःकरणसंबंधी गोष्टींत मी हात घालणार नाहीं, आणि जोंपर्यंत प्रत्येक माणूस कायद्यानें नेमून दिलेल्या सार्वजनिक उपासनेला येत राहील तोंपर्यंत, त्याला आपलीं पाहिजे

सर वुइलियम सेसिल हा राज्याचा सेक्रेटरी होतो.

तीं मतें बाळगण्याला मी मोकळीक ठेवीन, असें तिनें जाहीर केलें.

बाहेरून सारूप्य, म्हणजे कायद्यानें स्थापिलेल्या धर्मास अनुसरून वर्तन, असल्यास धर्मप्रकरणीं पाहिजे तीं मतें बाळगण्याला मोकळीक.

जेव्हां **पार्लमेंट** १५५९ त जान्युअरीच्या २५ व्या तारिखेस भरलें, तेव्हां त्यानें जें पहिलें काम केलें तें हें कीं, **एलिझाबेथ**ला यथान्याय आणि खरी **इंग्लंड**ची राणी म्हणून ठरविलें, आणि "**सुप्रेमसी**चा" (धर्मप्रकरणांत राणीच्या सर्वश्रेष्ठाधिकाराविषयींचा), आणि "**युनिफार्मिटी**चा" (उपासनेच्या एकरूपतेविषयींचा) असे दोन **आक्ट** (कायदे) पसार केले. ह्यांतून पहिल्या कायद्यानें, सर्व धर्मोपदेशकांनीं, राणीचा धर्मप्रकरणीं सर्वश्रेष्ठाधिकार आम्हाला मान्य आहे, अशी शपथ घेतलीच पाहिजे असा निर्बंध केला; आणि दुसऱ्या कायद्यानें, **सहाव्या एड्वर्डाचें प्रार्थना-पुस्तक** (त्यांत **क्याथलिकां**ना आवडतील असे कांहीं फेरफार करून) पुनः चालू केलें, आणि सर्व लोकांनीं उपासनेला आलेच पाहिजे, नाहीं तर भारी दंड द्यावा लागेल, असा ठराव केला.

सर्वश्रेष्ठाधिकारसंबंधी शपथ.

बिशप्स हे टेंकीचे **क्याथलिक्स** होते, आणि एकाखेरीज बाकीच्या त्या सर्वांनीं, सर्वश्रेष्ठाधिकारसंबंधाची शपथ घेत नाहीं, असें सांगितलें. ह्या गोष्टीनें राणी आमची स्वामिनी नव्हे असें म्हटल्यासारखें झालें, म्हणून त्यांचे अधिकार काढून घेतले, आणि त्यांच्या जागी **प्राटेस्टंट** बिशप्स नेमले. परंतु **एलिझाबेथनें** खालच्या प्रतीच्या धर्मोपदेशकांवर फार सख्ती न करण्याची सावधगिरी ठेवली होती. त्यांपैकीं ज्यांनी येऊन शपथ घेण्याची हेळसांड केली, त्यांची वासपूस केली नाहीं, आणि पुष्कळ ठिकाणीं **पारिश**, म्हणजे पाद्रीचा उपाध्येपणाचा प्रदेश, ह्यांतील धर्मोपाध्याय आपल्या

घरीं **क्याथलिकां**करितां " मास्स," म्हणजे प्रभुभोजनपूर्वक उपासना, करी, आणि देवळांत **इंग्लिश** उपासना करी. **माथ्यू पार्कर** नांवाचा एक विद्वान आणि समजदार पुरुष होता, त्याला **कांटर्बरी**चा **आर्चबिशप** केलें, आणि कांहीं काळपर्यंत तरी, ह्या प्रकारानें, अन्यदेशीं चालले होते तसले धर्मसंबंधी बखेडे **एलिझाबेथनें** टाळले.

आतां दुसरी लागोपाठची अडचण म्हटली म्हणजे **स्काट्लंड्**च्या संबंधाची होती. तेथें, **ग्वीझची मेरी** ही राजप्रतिनिधिनी ह्या नात्यानें राज्य करीत होती, कारण तिची मुलगी, **मेरी स्ट्यूअर्ट,** ही आतां **फ्रान्स**ची **राणी** झालेली होती. पुष्कळ वर्षांपासून **स्काट्लंड प्राटेस्टान्टिझम** (प्राटेस्टंट नांवाचा धर्म) हळू हळू स्वीकारीत चाललें होतें. त्यांतील मानस्टरिझ (मठ) आचारभ्रष्ट झालेल्या होत्या, आणि बडे लोकांना, धर्माधिकारी लोकांची संपत्ति आणि सत्ता, ह्यांविषयीं मत्सर वाटूं लागला होता. म्हणून त्या बडे लोकांपैकीं पुष्कळ नवीन धर्माला उत्तेजन देऊं लागले, आणि मागल्या कारकीर्दींतील छळणुकीमुळें जे **इंग्लिश प्राटेस्टंट** लोक सरहद्द ओलांडून **स्काट्लंडां**त पळून गेले होते, त्यांचें तेथें आगतस्वागत झालें. **स्काच** लोक स्वभावानें निग्रही आणि आस्थेवाईक असल्यामुळें, ते **इंग्लिशांच्या**ही पुढें गेले, आणि **जीनिव्हा** एथील **जान कॉल्व्हिन** नांवाच्या प्रतापी धर्मगुरूचे शिष्य झाले. १५५७ त बडे लोकांचा एक मोठा समुदाय **एडिंबरो** एथें एकत्र जमला, आणि त्यांनीं एकमेकाला आश्रय देऊं आणि त्या नवीन धर्ममताचा, म्हणजे **काल्व्हिन** ह्यानें प्रवृत्तींत आणलेल्या मताचा, प्रसार करूं म्हणून आणभाक केली. ज्या आणभाकेच्या लेखावर त्या सर्वांनीं सह्या

स्काट्लंडची स्थिति.

**केल्या**, त्याला **"फर्स्ट कॉव्हेनांट"** (पहिला करारनामा) असें म्हणतात, आणि त्यांनीं आपणांला **"लार्ड्स आफ् धि कांग्रिगेशन"** (समाजाचे बडे लोक) असें नांव धारण केलें. आतां, **ग्वीझची मेरी** ही तर खंबीर **क्याथलिक** होती, आणि जेव्हां तिनें तें नवीन धर्ममत दडपून नाहींसें करण्याविषयीं यत्न केला तेव्हां, **जान नॉक्स** नांवाच्या प्रख्यात **काल्व्हिन**पंथी धर्मशिक्षकाच्या हुकमतीखालीं, देवळांतील मूर्ति प्रतिमा वगैरे फोडून नाश करून, १५५९ त मेच्या ११ व्या तारखेस, लोक उघड बंड करून उठले. तेव्हां त्या राजप्रतिनिधीनीनें **फ्रेंच** फौजेच्या कुमकेनें आपला अमल जबरीनें स्थापण्याविषयीं यत्न केला. परंतु **कांग्रिगेशनचे लार्ड्स** ह्यांनीं **एडिंबरो** शहर घेऊन त्यांत ते ठाणें देऊन राहिले, आणि त्यांनीं एक **पार्लमेंट** भरविलें. ते, आपले प्राचीन साहाय्यसंकेती दोस्त, **फ्रेंच**, ह्यांपासून मोकळे होण्याविषयीं उत्कंठित होते, त्यामुळें, त्यांनीं **एलिझाबेथ**कडे आम्हांला कुमक करा असें मागणें केलें.

स्काटूलंडांतील लार्ड्स आफ् धि कांग्रिगेशन, १५५७.

**एलिझाबेथ** कांकूं करूं लागली, कारण बंडवाल्यांना आपल्या राज्यकर्त्रीविरुद्ध आश्रय देणें तिला आवडलें नाहीं. परंतु **स्काट्लंडांत फ्रेंच** फौज असणें हें **इंग्लंडा**ला विचार करण्यासारखेंच संकट होतें, म्हणून तिनें शेवटीं **लीथ** शहराला वेढा देण्याच्या कामीं कुमक करण्यासाठीं **इंग्लिश** अरमार **फर्थ आफ् फोर्थ** ह्या नांवाच्या खाडींत पाठविलें, आणि **लार्ड ग्रे** ह्याच्या हाताखालीं ८००० फौज देऊन ती खुशकीच्या मार्गानें पाठविली. त्याच वेळीं राजप्रतिनिधित्वानें राज्यकारभार करणारी राणी, **ग्वीझची मेरी**, मरण पावली, आणि **लार्डांच्या कौन्सिला**नें राज्यकारभार हातीं घेतला

होता, त्या कौन्सिलानें एडिंबरो एथें तहनामा करून त्यावर सह्या केल्या. त्या तहांत फ्रेंचांनीं स्काट्लंड सोडून जाण्याचें वचन दिलें, आणि कौन्सिलाच्या लार्डांनीं मेरी स्टयूअर्ट ही इंग्लिश गादीवर हक्क सांगणार नाहीं असें वचन दिलें. परंतु मेरी त्या वचनाच्या लेखावर कधींही सही करण्यास कबूल झाली नाहीं. नंतर स्काच पार्लमेंटानें, १५६० त आगस्टच्या २५ व्या तारिखेस, जिनीव्हा एथील कन्फेशन आफ् फेथ ( धर्मतत्वसंग्रह ) ह्या नांवाच्या नवीन धर्मपंथाचा यथाविधि स्वीकार केला, आणि तेव्हांपासून प्राटेस्टांटिझम हा स्काट्लंडचा धर्म झालेला आहे. पुढें थोड्या महिन्यांनीं १५६० च्या डिसेंबरांत मेरीचा फ्रेंच पति, दुसरा फ्रान्सिस राजा, हा वारला, आणि पुढील सालीं ती विधवा, स्काट्लंडची राणी ह्या नात्यानें आपलें स्थान स्वीकारण्यासाठीं, स्काट्लंडास परत आली. परंतु त्या वेळेपुरती तरी, एलिझाबेथला, स्काट्लंडांतील प्राटेस्टंट लार्ड्स तिच्या पक्षाचे होते म्हणून, मेरीपासून कसलीही भीति नव्हती.

एडिंबरोचा तह, जूलई, १५६०.

स्काटांची राणी मेरी फ्रान्साहून परत येते, आगस्ट १५६१.

दरम्यानच्या काळांत इंग्लंडांत स्वस्थता होती तीमुळें इंग्लंडाला आबाद होण्याला सवड मिळूं लागली. धर्मसंबंधीं खात्याकडील जमिनी हक्कानें परत घेऊन, आणि खर्चाचा फार बंदोबस्त करून, राज्याचा खजीना पुनः भरला; आणि हिणकस नाणीं रद्द करून, आणि नाणीं पहिल्याप्रमाणें खऱ्या मोलाचीं करून, सेसिलानें, लोकांवरील मोठा भार उतरला. देशांत अतिशय विपत्ति होती तिच्या कारणांची चौकशी करण्यासाठीं १५६१ त एक अ-

इंग्लंडची समृद्धि होते.

धिकार देऊन कमिशन, म्हणजे कामगारमंडळ, नेमून पाठविलें, आणि १५६२ त प्रत्येक शहरांतील मेयराला (कोतवालाला किंवा नगराध्यक्षाला), आणि प्रत्येक खेड्यांतील देवळाच्या रखवालदाराला, आपआपल्या गांवांतील गरीब अनाथ लोकांच्या पालनपोषणाकरितां, गांवांत राहणाऱ्या लोकांकडून फंड (द्रव्याची रकम) जमवावी अशी ताकीद पाठविली. हा, पहिला "**पुअर–लॉ**" (अनाथ किंवा भिकारी ह्यांविषयीं कानू) असें ज्याला म्हणतात, त्याचा आरंभ होय. त्या कानूचें, १६०१ त **पार्लमेंटांच्या आक्टानें** दृढीकरण झालें, आणि तो आमच्या चालू शतकांत १८३२ पर्यंत टिकला. जरी शेवटीं त्या कानूपासून लोकांवर मोठा भार झाला, तरी, त्या काळीं तो शाहणपणाचा उपाय होता, आणि त्याच्या योगें पूर्ववत् बंदोबस्त होण्याला मदत झाली.

पुअर–लॉ (भिकाऱ्यांविषयीं कानू) स्थापित होतो, १५६२–१६०१.

परंतु लोकांचें पराकाष्ठेचें कल्याण म्हणून जें **एलिझाबेथ**कडून झालें तें, हें होय. तिनें, धर्मसंबंधानें छळणूक होण्याची भीति असे, ती दूर केली, आणि मालमत्ता सुरक्षित केली. जमिनींचे मालक, आणि गृहस्थ लोक आपआपल्या शेतांची पूर्वीपेक्षां चांगली मशागत करूं लागले, खतांचा उपयोग कसा करावा, आणि वेगवेगळीं जित्रबें कोणत्या अनुक्रमानें पेरावीं, हें शिकूं लागले. मजूरांना स्वतःच्या मालकीची जमीन बिलकूल राहिली नाहीं, ही जरी निःसंशय मोठी आपत्ति होती, तरी शेतकी पूर्वीपेक्षां सुधरल्यामुळें पूर्वीपेक्षां पिकें चांगलीं येऊं लागलीं, आणि शेतकीच्या कामाकरितां पूर्वीपेक्षां मजूर ज्यास्त लागूं लागले.

शेतकीच्या कामांत सुधारणा होतात.

उद्योग धंदे, शिल्पानें पदार्थ तयार करण्याचे कारखाने, आणि व्यापार ह्यांचें पुनरुज्जीवन होऊं लागलें, त्यामुळें पुष्कळ लोकांना काम मिळूं लागलें. धर्मसंबंधीं छळणुकेनें **नेदर्लँड्स** मधील पुष्कळ **फ्लेमिंग्स** लोक **इंग्लंडांत** पळून आले, आणि त्यांपासून, **इंग्लिश** लोक, सुती आणि रेशमी कापड पहिल्यापेक्षां चांगलें कसें विणावें, आणि तें धुवून तयार करण्यासाठीं साबण कसा करावा, आणि तेल कसें काढावें, आणि घरच्या घरीं कापड कसें रंगवावें, ह्या कला शिकले. उत्तरेकडील शहरें ऊर्जित दशेस येऊं लागलीं, आणि **मांचेस्टरचीं** फ्रीझीझ (एका प्रकारचीं लोंकरीचीं सनंगें) **हालिफाक्सचें** कापड, आणि **शेफ्फील्डचें** तरवारी सुऱ्या वगैरे लोखंडी व पोलादी सामान हीं प्रख्यातीस आलीं. शिवाय जो माल आणि पैका **आंट्वर्प** एथें पूर्वीं जाई, तो आतां सरळ **इंग्लंडास** येऊं लागला. **अमेरिकेंतील** कच्चें (शुद्ध न केलेलें) सोनें आणि रुपें, **आफ्रिकेंतील** सोन्याची माती आणि हस्तिदंत, पूर्वेकडील देशांतील रेशमी आणि सुती कापड, ह्या सर्व जिन्नसांना **लंडनांत** खप मिळूं लागला. तेथें **सर टामस ग्रेशम** ह्या नांवाच्या एका गृहस्थानें, १५५६ त **रायल एक्स्चेन्ज** (उदमी लोकांचा आलीजाहां फड, अड्डा, किंवा चौक) ह्या नांवाची टोलेजंग हवेली उदमी व्यापारी लोकांना एकत्र जमून आपलीं कामधामें करण्याचें ठिकाण म्हणून बांधली. आणखी जहाजांसंबंधी किंवा नावाडीपणाच्या साहसाच्या आणि जोखिमाच्या धंद्याला राणीकडून प्रोत्साहन मिळत गेलें, त्यायोगें व्यापारी लढाऊ जहाजांचें एक शिलेपोस

व्यापार आणि शिल्पानें पदार्थ तयार करण्याचे कारखाने.

अरमार उत्पन्न झालें, आणि त्यांवर आधिपत्य करण्याला साहसी नाखोदा किंवा नाविक सरदार होते.

ज्या समुद्राच्या विजयानें **इंग्लंड** इतकें प्रतापी झालें आहे, त्या विजयाला त्यानें आतां वस्तुत: आरंभ केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. १५७६ त **इंग्लंड**च्या पश्चिमेकडील मुलुखांतला **फ्राबिशर** नांवाचा एक नाविक, वायव्य दिशेकडून समुद्रांतून **हिंदुस्तानास** पोहोंचण्याचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करण्यासाठीं, उत्तर दिशेकडे आपलें जहाज हकारून गेला, आणि त्यानें **हड्सन**च्या आखातांतील एका सामुद्रधुनीचा शोध लावला, तिला अद्यापि त्याचेंच नांव चालू आहे. त्याच वर्षी **सर हम्फ्री गिल्बर्ट** नांवाच्या एका शूर गृहस्थानें नवीन देशांचा शोध लावण्यासाठी **अमेरिकेस** एक सफर केली, आणि १५८३ त त्यानेंच दुसरी सफर केली, तींत, त्यानें **न्यूफौन्डलंड** नांवाचें बेट आपल्या हस्तगत केलें, आणि पुढें तो, त्याचें जहाज, व त्यावर असलेलीं इतर सारी माणसें, ह्यांसुद्धां समुद्रांत बुडून नाहींसा झाला. **डेव्हिस, राली, हॉकिन्स** आणि **ड्रेक** ( ड्रेक हा जहाजांतून सर्व पृथ्वीला प्रदक्षिणा करणारा पहिलाच इंग्रज होय ), हीं सर्व नांवें समुद्रावरून जाऊन नवीन देशांचा शोध लावण्याच्या कामीं विख्यात अशा पुरुषांचीं आहेत. ह्यांपैकीं दुर्दैवानें, **हॉकिन्साचें** स्मरण, १५६२ त **आफ्रिकेंतून अमेरिकेस** गुलाम पहिल्यानें त्यानें नेले, ह्या गोष्टीनें मुख्यत्वें राहिलें आहे. ह्या सर्व पुरुषांनीं नव्या देशांचा मार्ग दाखविला, आणि व्यापाराला नवीन रस्ते खुले केले.

नवीन देश शोधून काढण्याकरितां जलपर्यटणें किंवा सफरी, १५७६–१५८३.

ह्या आबादानीच्या वृद्धीचा परिणाम हा झाला कीं, लोक पूर्वीपेक्षां

सुखानें राहूं लागले. तटबंद्यांनीं आणि जंग्याच्या भिंतींनीं मजबूत केलेल्या पूर्वीच्या किल्ल्यांच्या बदली गृहस्थवर्गातील लोकांनीं आपल्याकरितां एलिझाबेथच्या वाड्यांच्या नमुन्याचे भोंवतीं बगीचे असलेले असे सुंदर वाडे बांधले. त्यांना, नकशीदार खोदींव काम केलेले असे जिने असत, आणि त्यांमधील जमिनींवर मोलवान जमखाने किंवा गालिचे पसरलेले असत. खातेपिते जमीनदार आणि धारेकरी, ह्या लोकांचीं खासगत, दगड आणि विटा ह्यांनीं बांधलेलीं, घरें होतीं. त्यांना तावदानी खिडक्या असत, आणि छपरांत धूर जाण्याकरितां पूर्वीं फक्त भोंकें राखलेलीं असत त्यांच्या बदली आतां धुरांडीं असत. सर्व वर्गांतील लोकांचा, आणि विशेषेंकरून गृहस्थ वर्गांतील लोकांचा, पोशाक पूर्वींपेक्षां शोभिवंत आणि मोलाचा असे. राणी जातीनें, जरी काटकसरी होती, तरी तिला थाटमाट आणि डामडौल आवडे, आणि एका दरबारी माणसाच्या घरून दुसऱ्या दरबारी माणसाच्या घरीं ती प्रवास करून जाई तेव्हां, जी आनंदप्रदर्शक उत्सवांची धुमाकूळ आणि थाटमाट तमाशे होत त्यांनीं तिच्या प्रजाजनांच्या आयुष्यांला नवी तेजगी येई.

सुखाची अभिवृद्धि.

परंतु लोक ह्या प्रकारें शांतिसुखांत आणि चंगळींत असतां, एलिझाबेथला स्वतः अनंत काळज्या होत्या. ती इंग्लंडांत आपल्याकडील लेगेटही (वकीलही) घेत नाहीं, किंवा १५६१ त त्यानें ट्रेन्ट एथें आपलें कौन्सिल भरविलें होतें त्याला तिनें आपले वकीलही पाठविले नाहींत, ही तिची वागणूक पोप चौथा पायस ह्यानें पाहून, तो तिला बंडखोर राणी म्हणून समजून तिच्याशीं वागूं लागला, आणि तुम्ही इंग्लिश देवळांत उपासनेकरितां जात जाऊं नये अशी त्यानें सर्व क्याथलिकांला आज्ञा केली.* पार्लमेंटाला ती पोपाची

ढवळाढवळ सहन झाली नाहीं, म्हणून त्यानें एक **आक्ट** (कायदा) केला. त्यांत, **कामन्सां**च्या सभेच्या प्रत्येक सभासदानें, प्रत्येक सरकारी कामदारानें, आणि प्रत्येक पारिशाच्या धर्माधिकाऱ्यानें, राणीशीं मी प्रजाधर्मानें वर्तेन, आणि **इंग्लंडांत पोपाचा** अधिकार मी मानणार नाहीं, अशी शपथ घेतली पाहिजे, असा निर्बंध केलेला होता. ह्या कायद्यानें, जे निश्चीचे **क्याथलिक्स** होते त्यांना तर, **हौस आफ् कामन्स** अर्थात् वर्ज झालेंच. **सहाव्या एड्वर्डा**च्या कारकीर्दीत जीं धर्मतत्वें म्हणून एकूणचाळीस कलमें ठरविलीं होतीं, तीं स्वीकारून, सर्व धर्मोपदेशकांना त्या कलमबंदीवर, ती आम्हाला मान्य आहे, म्हणून सह्या करण्याचा हुकूम केला. ह्याप्रकारें धर्मसंबंधी वैमनस्याचें बीं, **एलिझाबेथ**च्या प्रजाजनांमध्यें, तिच्या इच्छेच्या अति विरुद्ध, पेरलें गेलें.

ओथ आफ् आल्लीजियन्स म्हणजे प्रजाधर्मानें वागेन अशी शपथ स्थापली, १५६३.

**स्काटांची राणी मेरी** हीही आतां पुनः उपद्रव देऊं लागली. ती अजूनही **एलिझाबेथ**च्या मागून तरी गादीला वारस होतीच, कारण, जरी **एलिझाबेथ**ला लग्न करण्याविषयीं **पार्लमेंटानें** वारंवार आग्रह केला, आणि **आस्ट्रियाच्या आर्चड्यूका**कडून तिच्याशीं लग्न करण्याविषयीं बोलणें आलें त्या संबंधानें, आपली इच्छा आहे म्हणून तिनें नखरे केले, आणि आपल्या कृपेंतला दरबारी गृहस्थ **राबर्ट डड्ले, लेस्टरचा अर्ल,** ह्याच्याशीं लग्न करण्याची माझी इच्छा आहे म्हणून तिनें हावभाव केले, तरी त्या कृतीप्रमाणें फल कांहींही नजरेस आलें नाहीं. वास्तविक पाहतां, तिच्यानें लग्न करवलेंच नसतें, कारण तिनें **प्राटेस्टंट** पति पसंत

एलिझाबेथची लग्न करण्याची इच्छा नव्हती.

केला असता तर तिजवर तिची अर्धी प्रजा रुसती, किंवा क्याथ-लिक पति पसंत केला असता तरीही तिजवर अर्धी प्रजा रुसती.

ह्यास्तव मेरी स्ट्यूअर्ट ही, अजूनही, एलिझाबेथच्या कुशींत सलणारा कांटा असावा तशी होती. जेव्हां ती मेरी स्काट्लंडास पहिल्यानें परत आली, तेव्हां, सर्व लोकांनीं त्या आपल्या रूपवती तरुण राणीला देवीसारखी पूजिली, आणि तिला राज्यकारभारांत तिचा प्राटेस्टंटधर्मी सावत्र भाऊ, अर्ल मरे, मदत करीत होता त्यामुळें मुख्यत्वेंकरून, त्यांनीं तिला आपला क्याथलिक धर्म पाळण्याला मोकळीक दिली. पुढें लवकरच दुसऱ्यानें लग्न कर-ण्याचा विचार तिच्या मनांत येऊं लागला, आणि १५६५ त तिनें आपला तरुण चुलत भाऊ हेन्री स्ट्यूअर्ट, लार्ड डार्न्ले, ह्याला वरण्यासाठीं पसंत केलें. लार्ड डार्न्ले हा, तिच्यासारखा, आठव्या हेन्रीची बहीण, मार्गरेट ट्यूडर, हिच्या वंशांत उत्पन्न झालेला होता. तो डार्न्ले इंग्लंडांतच पालनपोषण होऊन लहानाचा थोर झालेला होता, आणि लेनॉक्सिझ उपनांवाचें त्याचें घराणें होतें त्यांतील माणसें फार दिवसांपासून क्याथलिक्स होतीं. आतां क्याथलिक लार्ड्स ह्यांचें स्काट्लंडांत प्राबल्य झालें त्यामुळें, मरेला त्या देशाचा त्याग करून जाणें भाग पडलें, तेव्हां मेरी आणि डार्न्ले ह्या दोघांना कोणत्याही वेळीं इंग्लिश गादी हस्तगत करून घेण्याविषयीं प्रयत्न करण्याला अ-टक राहिली नाहीं, ही गोष्ट एलिझाबेथच्या लक्ष्यांत आली.

स्काटांची राणी मेरी लार्ड डार्न्लेशीं विवाह करते, १५६५.

परंतु मेरीनें आपले जमून आलेले योग आपण दवडले. डार्न्ले हा बुद्धीचा हलका, आणि व्यसनी पुरुष होता, आणि

त्याचा तिला लवकरच कंटाळा आला. तिला **क्याथलिक** धर्म पुन: स्थापण्याची, आणि **इंग्लंड**ची राणी होण्याची, उत्कंठा होती, आणि तिचा **डेव्हिड रिझिओ** नांवाचा एक **इटालियन** ( इटाली देशांतला, किंवा इटलीची भाषा जाणणारा ) हुशार सेक्रेटरी होता, त्यानें **पोपा**शीं आणि **स्पेन**च्या राजाशीं गुप्त पत्रव्यवहार चालविण्याच्या कामीं तिला साहाय्य केलें. **मेरी डार्न्ले**ला राज्याभिषेक करून राजा करूं देईना, म्हणून त्याला इतका तैष आला, आणि **रिझिओ**विषयीं त्याला इतका मत्सर वाटूं लागला कीं, त्यानें कित्येक **प्राटेस्टंट** लार्ड्स ह्यांशीं मिळून गुप्त कारस्थान केलें. तेव्हां ते लार्ड्स, **हॉलिरूड** एथील राणीच्या महालांत शिरले आणि ती समक्ष बसलेली होती तेथून त्या **रिझिओ**ला धरून खेंचून नेऊन जिन्यावरच त्यांनीं ठार मारलें. नंतर त्यांनीं त्या राजमंदिराच्या वेशी आपल्या हस्तगत केल्या, त्यामुळें **मेरी** त्यांच्या आहारीं आली. ती शाहणीच होती, म्हणून तत्काल त्यांना शरण गेली, आणि **डार्न्ले**शीं पुन: तिनें सख्य केलें, परंतु त्याचें तें कृत्य ती विसरली नाही. पुढें तीन महिन्यांनीं, १५६६ त जूनच्या ९ व्या तारिखेस, तिच्या पुत्राचें जन्म झालें, तेव्हां, तिच्या पश्चात् गादीवर बसण्याला तिला वारस झाला, ह्या गोष्टीनें तिचा आतां **एलिझाबेथ**वर उपराळा किंवा वरचष्मा झाला.

रिझिओचा खून, ता. ९ मार्च १५६६.

पुढल्या नऊ महिन्यांत, सर्व गोष्टी निवांत चालल्या होत्या, आणि नंतर एक अतिभयंकर गोष्ट घडली. **डार्न्ले**ला दुखणें आलें, आणि **मेरी** त्याच्याविषयीं फार काळजींत आहे, अशी दिसली. तिनें त्याला हवा पालटण्याकरितां म्हणून **एडिंबरो** शहराच्या बाहेर **हॉलिरूड** एथील राजमंदिरानजीक एक **कर्क**-

ओ'-फील्ड ( शेतांतील देऊळ ) ह्या नांवाचा जुना मठ होता त्यांत आणून ठेवलें. तेथें एके दिवशीं संध्याकाळीं, त्याला एका तरुण हुजऱ्याच्या दिम्मतीत ठेवून, ती हॉलिरूड एथें एका नौकराच्या लग्नानिमित्त नाच होता त्या नाचाला गेली. मध्यरात्रीनंतर थोड्या वेळानें एक भयंकर धडाका उडाला त्यानें सारें शहर हाललें. कर्क-ओ'-फील्ड हा मठ सुरुंगानें उडून गेला, आणि तो डार्न्ले व तो हुजऱ्या हे दोघे जवळच एका शेतांत मरून पडले. राणीला ह्या गोष्टीविषयीं पूर्वी किती काय माहिती होती हें कोणाच्यानें सांगवलें नाहीं. परंतु बडे लोकांपैकी बाथ्वेलचा अर्ल, जेम्स हेप्बर्न, ह्या नांवाच्या एका तरण्या दांडग्या मुरदाड पुरुषानें तें कृत्य केलें ह्यांत बिलकुल संशय नाहीं, आणि मेरीनें पुढें तीन महिन्यांनी, म्हणजे १५६७ त मेच्या १५ व्या तारिखेस, त्याच्याशी लग्न लावलें.

डार्न्लेचा खून, तारीख ९ फेब्रुअरी १५६७.

पुष्कळ लोक, मेरी त्या खुनाच्या संबंधानें निर्दोष होती असें विश्वासानें मानीत होते, तथापि सारें स्काटूंड तिचें नांव निघाल्याबरोबर भीतीनें आंग काढी. तिनें, लार्ड्स ह्यांशीं सामना करण्यासाठीं फौज गोळा करण्यांत एक महिना घालविला, परंतु जेव्हां वेळ आली, तेव्हां, तिच्याकरितां कोणीच लढावयास तयार होईना. बाथ्वेल हा पहिल्यानें ऑर्क्निझ नांवाच्या बेटांत पळून गेला, आणि नंतर तेथून डेन्मार्क देशी गेला. तेथें तो मरण पावला. मेरीला धरून कैदकेलें, आणि किन्रॉसशायरांतील लाख् लीव्हन नांवाच्या सरोवराच्या मध्यभागी एक मजबूत किल्ला होता त्यांत तिला बंदींत ठेवलें. लार्ड्स ह्यांनीं तिला जुलुमानें राज्याधिकार सोडावयास लावलें, आणि तिचा मुलगा त्या समयीं

तान्हें मूल होता त्याला **सहावा जेम्स** ह्या नांवानें राज्याभिषेक केला, आणि **अर्ल मरे** ह्याला राजप्रतिनिधि केलें. पुढें एका वर्षानें **मेरी** कैदेंतून निसटून पळाली, आणि तिनें फौज जमा केली. परंतु **ग्लास्गो** नजीक **लांग्साइड** एथें तिचा पराभव झाला.. तेव्हां, ती घोड्यावर बसून एक सारखी दौडत, मध्यें घोडे बदलण्याकरितां मात्र थांबून, नव्वद मैल गेली, आणि **साल्वे फर्थ** नांवाची खाडी उतरून **कार्लाइल** एथें तिनें आस्रा धरला.

मेरी कैदेंतून पळून इंग्लंडास जाते, माहे मे १५६८.

आपली प्रतिस्पर्धिनी **इंग्लंडांत** यावी, ही गोष्ट अगदीं निदानींची म्हणून **एलिझाबेथनें** कदाचित् इच्छिली असती. पूर्वींच्याच वर्षीं **एलिझाबेथचें** लग्न आणि तिच्या पश्चात् गादीचा वारस ह्या संबंधानें तिचा **पार्लमेंटाशीं** वाद झालेला होता. राष्ट्राची सुबत्ता होत चालली तसतशी **हौस आफ् कामन्स** ही सभा अधिकाधिक धीट होत चालली. खेड्यापाड्यांत राहणारे सभ्य गृहस्थ, **पार्लमेंटांतील** जागांविषयीं लोभ करूं लागले, त्यांबद्दल सभासदांना पूर्वीं वेतनें किंवा नेमणुका द्याव्या लागत, परंतु आतां आपल्या आशींपाशींच्या लोकांचें प्रतिनिधित्व आम्ही फुकटवारी करतों असें सभासद होण्याविषयीं उमेदवार म्हणूं लागले. असें म्हणणारे लोक स्वतंत्र होते, आणि ते आपल्या हक्कांकडे लक्ष्य देणारे होते. **मेरीचा** पुत्र जन्मास आल्यावर पुढें लवकरच **हौस आफ् कामन्स** सभेच्या सभासदांनीं, आपल्या पश्चात् गादीवर कोणाला बसवावयाचें ह्या गोष्टीचा निकाल करा अशी **एलिझाबेथ राणीला** टुमणी लावली; आणि जेव्हां **एलिझाबेथनें**,

इंग्लिश पार्लमेंट बलवत्तर होत जातें.

ती गोष्ट मजकडे सोंपा, असा त्यांना खरमरीत निरोप पाठविला तेव्हां, **वेन्टवर्थ** नांवाच्या **हौस आफ् कामन्सच्या** सभासदानें, उभा राहून "हें आपणां सर्वांच्या स्वातंत्र्याला विरुद्ध नव्हे काय?" असा प्रश्न केला. शेवटीं राणीनें वचनें देऊन त्यांना शांत केलें, आणि **आयर्लंडांत** फौज पाठविण्यासाठीं खर्चाला पैका पाहिजे होता तो पुरविण्याविषयीं त्यांनीं संमति दिली. १५६५ पासून, **शान-ओ'-नील** नांवाच्या एका धाडस आणि शाहण्या पुढाऱ्याच्या हुकमतीखालीं त्या देशांत उघड बंड मातलें होतें. परंतु १५६७ त पैका आणि माणसें मिळून, **सर हेन्री सिड्नी** ह्यानें तें बंड मोडलें, तेव्हां त्या देशीं स्वस्थतेची कांहीं आशा दिसूं लागली.

शान-ओ'-नील ह्याचें बंड, १५६५-१५६७.

ह्याच वेळीं **मेरी स्ट्यूअर्ट** पळून **इंग्लंडांत** आली, त्या गोष्टीनें **एलिझाबेथ** नव्या संकटांत पडली. **मेरीचें** करावें काय? हा प्रश्न उत्पन्न झाला. **मेरीनें**, मला **स्काट्लंडला** परत घेऊन जाण्यासाठीं फौज द्या, किंवा **फ्रान्सला** जाण्याला खुला मार्ग द्या, असें मागणें केलें. ह्यांतून शेवटचें मागणें **एलिझाबेथच्यानें** देववेना, कारण तिला **फ्रान्सला** जाऊं दिलें असतें तर, **फ्रेंच** लोकांना **स्काट्लंडावर** नवा कबज मिळाला असता. **एलिझाबेथनें मरेकडून** आपल्या राणीला माघारी घेवविण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु त्यानें ती गोष्ट नाकारिली, आणि त्यानें **बाथ्वेल्ल** आणि **मेरी** ह्यांच्या दरम्यानचीं पत्रें हाजीर केलीं. तीं जर खरीं असलीं तर त्यांवरून **मेरीनें** आपल्या नवऱ्याला ठार मारविण्याचें कारस्थान केलेलें होतें असें सिद्ध होत होतें. म्हणून **एलिझाबेथनें** तिला **इंग्लंडांतच** पहिल्यानें एका खेड्यांतील वाड्यांत, नंतर

मेरी इंग्लंडांत कैदेंत पडते, १५६८-१५८७.

दुसऱ्या एका खेड्यांतील वाड्यांत, ह्याप्रमाणें राहण्याचीं ठिकाणें पालटून, रखवालीखालीं ठेवलें.

पुष्कळांनीं **मेरी**ला कैदेंत ठेवल्याबद्दल **एलिझाबेथ**ला दूषण दिलेलें आहे, आणि इतर कित्येक, पुढल्या अठरा वर्षांत **एलिझाबेथ**च्या विरुद्ध झालेल्या फंदफितुरांत **मेरी**चें आंग होतें, असा **मेरी**वर दोष ठेवतात. मला असें दिसतें कीं, त्या दोहों राण्यांतून एकीच्यानेंही, तिनें वर्तन केलें त्याहून अन्य प्रकारें वर्तन करवलें असतें, असा संभवच नव्हता. **मेरी क्याथलिक** असून **क्याथलिकां**ची दोस्त होती, तेव्हां **इंग्लंड**ची गादी आपल्याच्यानें हिरावून घेववेल तर तशी ती घेण्यांत कांहीं पाप नाहीं असें ती श्रद्धापूर्वक मानीत होती, आणि **एलिझाबेथ** ही, तिचे प्रजाजन तिजवर प्रेम करीत होते, म्हणून त्यांवरील आपलें अधिकारस्थान काईम राखण्याकरितां हरएक प्रयत्न करण्याविषयीं अर्थतःच बद्ध होती. त्या दोहों राण्यांच्या दरम्यान जो स्वभावगुणांचा भेद होता त्यानें **एलिझाबेथ**ची मात्रा वरच होती. तो भेद हा. **एलिझाबेथ** जरी निर्दय होती तरी, आपल्या प्रजेच्या कल्याणाकडे तिचें निरंतर लक्ष्य असे. **मेरी** ही मनमोहक, आणि आवडायाजोग्या, गुणांची असतांही, तिनें आपले कामक्रोधादि मनोविकार अनर्गल ठेवले, त्यामुळें तिनें आपल्या सुयोगाचा नाश केला. **मेरी**नें आपल्या नवऱ्याचा खून करणाऱ्या पुरुषाशीं विवाह केला, त्या वेळेपासूनच तिचा मुकदमा बुडाला.

मेरी आणि एलिझाबेथ.

असो, ह्या सर्व वेळांत **एलिझाबेथ**नें परदेशीय राजांशीं बोलणें चालणें करण्याच्या कामीं फार कौशल्य खर्च करून, परदेशांशीं युद्धें अगदीं टाळलीं होतीं. परंतु आतां तीं युद्धें टाळणें प्रति-

नेदर्लंड्स देशांत बंड होतें, १५६८.

दिवशीं अधिकाधिक कठीण होत चाललें होतें. जेव्हां **मेरी स्टयूअर्ट** ही पळून **इंग्लंडांत** आली, त्याच वेळीं, शूर **नेदर्लंडर्स**, म्हणजे **हालंड**, **झीलंड**, आणि **फ्लांडर्स**, ह्या देशांतील लोक, ह्यांनीं **आरेन्जचा वुइलियम** ह्याच्या हुकुमती खालीं, आपल्या **स्पानिश** जुलमी सत्ताधाऱ्यांशीं फार दिवस चालणाऱ्या आणि हाडवैराच्या झगड्याला आरंभ केला. ते लढले, त्यांनीं फार यातना भोगली, आणि ते उपाशीं मेले; आणि शेवटीं समुद्राला अडविण्यासाठीं घातलेले बांध फोडून आपला देश पाण्यानें बुडवून जलमय करून त्यांनीं आपल्या शत्रूंना देशांतून हाकवून लावलें. हा झगडा चालला असतां, **इंग्लिशांच्या** गादीवर जर **क्याथलिक** राणी असती तर, **नेदर्लंड्सचा** राजा, **दुसरा फिलिप** ह्याला फार उपयोग झाला असता. त्या कलहांत दोहोंतून कोणताही एक पक्ष न स्वीकारतां तटस्थ राहणें **एलिझाबेथला** कठीण होतें. तिच्या **कौन्सिलांत** दुफळी होती. **सेसिल** आणि इतर **प्राटेस्टंट** लार्ड्स ह्यांची **नेदर्लंडर्स** ह्यांला कुमक करण्याची इच्छा होती. **नार्फकचा ड्यूक**, आणि इतर **क्याथलिक** लार्ड्स, ह्यांना **स्पेन** देशाशीं सल्ला, आणि **एलिझाबेथच्या** मागून **मेरीला** गादीवर बसविण्याचा ठराव, ह्या दोन गोष्टी पाहिजे होत्या. **एलिझाबेथ** राणीनें त्या दोन्ही फळ्या समतोल राखण्याविषयीं प्रयत्न केला. परंतु **क्याथलिक** लार्ड्स उतावळे झाले. **मेरीचें नार्फकशीं** लग्न करविण्याची गुप्त मसलत झाली. ती उघडकीस आली, आणि **नार्फकला** पकडून **टौअरांत** कैदेंत टाकलें. तेव्हां **इंग्लं**-

इंग्लंडच्या उत्तरेस बंड होतें, नोव्हेंबर १५६९.

डच्या उत्तरेकडे, **मेरीची** कैदेंतून सुटका करण्याच्या इराद्यानें **नार्थंबर्लंड** आणि **वेस्टमर्लंड** ह्या कौंटींच्या **अर्लांच्या** हुकुमती खालीं एक बंड उठलें. त्या **अर्लांचा** पराभव झाला, तेव्हां ते **स्काट्लंडांत** पळून गेले, आणि सहाशेंहून ज्यास्ती लोकांना बंडखोर म्हणून जिवें मारलें.

इतकें झालें तथापि अजून **क्याथलिक** लोकांची तडफड चाललीच होती; आणि पुढील वर्षी, म्हणजे १५७०त, **पोप पांचवा पायस** ह्यानें **एलिझाबेथ**ला बहिष्कार घातला, आणि तिच्या प्रजाजनांनीं तिच्याशीं प्रजाधर्मानें वागूं नये, अशी आज्ञा करून तसें न वागल्यानें होणाऱ्या दोषापासून त्यांना त्यानें मुक्त केलें. ह्याचें उसनें वाण म्हणून **पार्लमेंटानें क्याथलिकांच्या** विरुद्ध पूर्वीहून कडक कायदे केले; आणि आपल्या "बहिष्काराच्या आज्ञापत्राचें"

एलिझाबेथला पोप बहिष्कार घालतो आणि रिडाल्फीचें कारस्थान, १५७०–१५७१.

कांहींच फळ झालें नाहीं असें पाहून रागावून **पोपानें, रिडाल्फी** नांवाच्या एका पेढीवाल्या सावकाराला हातीं धरून त्याकडून **नार्फकाशीं मेरीचें** लग्न करविण्याच्या कारस्थानाचें पुनरुज्जीवन करविलें, आणि **स्पेन** देशाच्या राजाशीं संगनमत करवून **एलिझाबेथ**ला पदच्युत करण्याची मसलत केली. **मद्रिड** शहरांत एक माणूस त्या **रिडाल्फी**ला सांपडला, त्यानें राणीला ( एलिझाबेथला ) दग्यानें ठार मारण्याचें कबूल केलें; आणि **स्पेन** देशचा सेनापति, **आल्व्हा,** ह्यानें **नेदर्लंड्स**मधून समुद्र ओलांडून जाऊन **इंग्लंड**चें राज्य घ्यावें असा बेत ठरला. परंतु त्या लोकांच्या हातून योजलेल्या गोष्टींपैकीं एकादी तरी होण्यापूर्वींच, **लार्ड बर्ली** ह्याला ती गुप्त मसलत कळली. तेव्हां **नार्फक**ला १५७२ त जूनच्या २ ऱ्या तारिखेस देहांतशासन केलें, आणि

**स्पेन** देशच्या वकिलाला **इंग्लंडांतून** निघून जाण्याचा हुकूम केला. **मेरीवर** राजद्रोहाचा गुन्हा ठेवून तिची चौकशी करविण्याविषयीं **पार्लमेंटानें एलिझाबेथला** टुमणी लाविली, तथापि अजून ती गोष्ट करण्याविषयीं तिचें मन होईना.

ह्या प्रकारें जरी **स्पेनानें एलिझाबेथला** ह्या प्रकारें समूळ उलथून टाकण्याविषयीं प्रयत्न केला, तथापि, तिनें, पहिल्यानें **आन्जूच्या ड्यूकाशीं**, आणि पुढें त्या **ड्यूकाच्या** धाकट्या भावाशीं, विवाह करतें म्हणून बोलणें लावून, **फ्रान्स** देशावर आपला कबज राखला. परंतु इतक्यांत एक भयंकर गोष्ट घडली. **फ्रेंच** राजाची आई **काथरिन-डि-मेडिची**, आणि **ग्वीझिझ** उपनांवाचे **क्याथलिक ड्यूक्स** ह्यांना, **ह्यूगेनोस** नांवाचे **फ्रान्स** देशांतील **प्राटेस्टंट** लोक अति बलाढ्य होत चालले अशी भीति पडून, त्यांनीं **पारिसांतील** बंडाळ लोकांना त्यांच्या विरुद्ध चिथविलें. तेव्हां १५७२ त आगस्टच्या २४ व्या तारिखेस, **सेन्ट बर्थोलोम्यू** ह्या नांवाची कत्तल उडाली. तींत **ह्यूगेनोस** लोकांमध्यें जे प्रमुख म्हणून होते त्या सर्वांना **पारिसमध्यें** ठार मारलें, आणि तो तैष शहरोशहरीं पसरून एक लक्षाहूनही ज्यास्ती **ह्यूगेनोस** ह्यांचा संहार झाला. ह्या **क्याथलिक** पक्षाच्या भयानक विजयानें **एलिझाबेथ** आणि तिची प्रजा ह्या उभयतांना दहशत पडली. तथापि आतां देखील **प्राटेस्टंटांचा** उघडपणें पक्ष धरण्यास तिचें मन होईना. १५७५ त **नेदर्लंडर्स** ( नेदर्लंड्सचे लोक ) ह्यांनीं तिला आमची आपण राणी व्हा अशी विनंति केली, तेव्हां, जरी तिनें त्यांना मदत करण्यासाठीं कांहीं पैका पाठविला, तरी राणी होण्याचें नाकारिलें.

सेन्ट बर्थोलोम्यू नांवाची कत्तल, तारीख २४ आगस्ट १५७२.

परंतु त्यांना साहाय्य करण्याला तिनें आपल्या प्रजेला मनाई केली नाहीं. **लंडनां**तील व्यापाऱ्यांनीं पांच लक्ष पौंड **ऑरेन्ज**च्या **वुइलियमा**ला पाठविले, आणि **नेदर्लंड्स**-मधल्या शूर स्वदेशभक्तांना पाठबळ देण्याकरितां पांच हजारांहूनही ज्यास्तीच **इंग्लिश** लोक समुद्र ओलांडून त्या देशीं गेले.

इंग्लिश लोक नेदर्लंडर्स लोकांना साहाय्य करितात.

दुसरे कित्येक स्वतःच्या जहाजांतून बसून समुद्रांत बाहेर निघाले, त्यांना "**सी डॉग्स**" ( समुद्रांतले कुतरे ) असें म्हणत, त्यांनीं **इंग्लिश चानल** ( खाडी ) गच्च भरून गेली; आणि ते **फ्रान्स** आणि **स्पेन** ह्या देशांच्या व्यापारी जहाजांवर हल्ला करूं लागले. ह्या चाच्यांचें **नेदर्लंडर्स** लोकांच्या हिताकडे जितकें लक्ष्य असेल तितकेंच लुटीकडेही असावें असें दिसतें. **नव्या पृथ्वी**च्या (**अमेरिके**च्या) ज्या भागांत सोनें आणि इतर प्रकारचें धन सांपडे ते भाग **स्पानिश** आणि **पोर्तुगीझ** ह्यांच्या हातीं होते; आणि **फ्रान्सिस ड्रेक** नांवाचा **डेव्हनशायरां**तील एका पाद्रीचा मुलगा, पहिल्यानें १५७२ त, आणि नंतर १५७७ त, जहाज हकारून **दक्षिण अमेरिकें**तील **स्पानिश** लोकांच्या ताब्यांतील मुलुखास गेला, आणि त्यानें त्यांचीं सोनें भरून आणणारीं जहाजें लुटलीं. जेव्हां तो परत आला, तेव्हां **इंग्लंडां**तील लोकांनीं त्याला मोठा वीर मानून त्याचें आगतस्वागत केलें, आणि **एलिझाबेथ**नें त्याला नाइट पदवी दिली. मुख्यत्वेंकरून ह्याच कारणानें, **स्पेन**चा राजा, **फिलिप**, ह्यानें त्या गोष्टीचा सूड घेईन अशी प्रतिज्ञा केली. परंतु ह्या अगोदरच **फिलिपा**च्या हातीं इतर पुष्कळ कामें करावयाचीं पडलेलीं होतीं. म्हणून तें सूड घेण्याचें

इंग्लिश चांचे स्पानिश लोकांचीं जहाजें लुटतात.

काम पडून राहून आठ वर्षें गुदरलीं. शेवटीं **एलिझाबेथनें लेस्टरचा अर्ल** ह्याला **नेदर्लंडर्स** लोकांच्या कुमकेस पाठविलें, आणि **ड्रेक** ह्याला १५८५ त पंचवीस जहाजें बरोबर घेऊन **स्पानिश अमेरिकेस** पुनः जाण्याला परवानगी दिली. तिकडून तो आपल्या जहाजांवर लूट लादून घेऊन परत आला. ह्या वेळेपासून **फिलिप इंग्लंडाशीं** युद्ध करावयाचें अशा हेतूनें खरोखर तयारी करूं लागला. परंतु त्याचें तें विख्यात "**स्पानिश आर्मोडा**" (फौजबंद किंवा शिलेपोस अरमार) नांवाचें अरमार तयार होई तों आणखी तीन वर्षें गेलीं, आणि त्या तीन वर्षांत पुष्कळ गोष्टी घडल्या.

मागल्या कांहीं काळापासून, **फ्रान्स** देशांत **डूए** एथें, अनेक तरुण **इंग्लिश क्याथलिकांना, इंग्लंडास** पाद्री म्हणून पाठविण्याकरितां, शिकवून तयार करीत होते. ह्या लोकांचा श्रद्धापूर्वक दृढ भरवसा होता कीं, **इंग्लंड** देशाचा उद्धार किंवा पापमुक्ति, तेथील लोकांना पुनः **पोपाच्या** अधिकाराखालीं आणल्यावांचून होणारच नाहीं. १५७६ त ते तयार झालेले पाद्री, साऱ्या **इंग्लंडभर** गुप्तपणें प्रवास करूं लागले. ते जागोजाग उपासना करीत, राणीविरुद्ध लिहिलेलीं लहान लहान पुस्तकें वांटीत, आणि माणसांना बंड करण्याविषयीं फूस देत. तेव्हां **इंग्लंडांतील** सरकाराला खरोखर भारी दहशत पडली; म्हणून त्या पाद्री धर्मोपदेशकांना कोठें सांपडतील तेथें धरधरून कैदकेलें, आणि पुढल्या वीस वर्षांत त्यांतील पुष्कळांना जिवें मारलें. परंतु त्या पाद्रींनीं केलेल्या श्रमाला फळ आलें. १५८३ त **एलिझाबेथला** दग्यानें ठार मारून **मेरीला** गादीवर बसविण्यासाठीं केलेला एक कट उघडकेस आला, त्याचा मुख्य

इंग्लंडांत धर्मप्रचारार्थ क्याथलिक पाद्रींचा समुदाय येतो, १५७६.

**फ्रान्सिस थ्रॉग्मॉर्टन** नांवाचा क्याथलिक होता; आणि **स्पेन** देशच्या **इंग्लंडां**तील वकिलाला त्या कटाविषयीं माहिती होती, हें स्पष्ट दिसून आलें. **थ्रॉग्मॉर्टन** ह्याला देहांतशासन झालें, आणि **इंग्लंडां**तील प्रमुख लोकांना, आपल्या राणीला कांहीं तरी उपद्रव होणार अशी पुरी भीति पडून, त्यांनीं १५८४ त एक मंडळी स्थापली. तींत **पार्लमें-टा**च्या अनुमतानें त्यांनीं, "राणीच्या विरुद्ध कोणी फंदफितूर "करील तो, व ज्या माणसाच्या तर्फे किंवा वतीनें तो फंदफितूर "होईल तो माणूस, मरे तोंपर्यंत त्याच्या हात धुवून पाठीस लाग-"ण्याविषयीं" प्रतिज्ञा केली.

राणीचें रक्षण कर-ण्याकरितां एका मंड-ळीची स्थापना होते, १५८४.

हें कृत्य **राणी मेरी**ला, एका प्रकारच्या सूचने सारखेंच होतें हें एकदम लक्ष्यांत येईल; आणि त्या प्रतिज्ञापत्रावर खुद्द **मेरी**कडूनही सही करविली. असें असतां, पुढें तीन वर्षांनीं, राज्याचा **सेक्रेटरी, सर फ्रान्सिस वाल्सिंग्हम**, ह्यानें शोध लावला कीं, फार दिवस कैदेंत राहिल्यामुळें कंटाळून आणि त्रासून **मेरी**नें, पूर्वीप्रमाणेंच **स्पे-न**च्या राजाच्या चिथवणीनें, **आन्टनी बाबिंग्टन** नांवाच्या कोणा एका तरुण पुरुषानें प्रमुख होऊन केलेल्या दुसऱ्या एका कटाला आपलें अनुमोदन दिलेलें होतें. हा कट **मेरी**च्या मृत्यूला कारण झाला. तिला **नार्थहाम्टनशायरां**तील **फॉदरिंगे** नांवाच्या कि-ल्ल्यांत कैदेंत ठेवलेलें होतें. तेथेंच एक बडे लोकांचें कमिशन, म्हणजे अधिकार दिलेलें मंडल, नेमलें. त्या कमिशनापुढें, त्या कटांत तिचें आंग होतें ह्या गोष्टीबद्दल जो पुरावा होता तो हाजीर केला, आणि तिला **पार्लमेंटा**नें १५८६ च्या

स्काटांची राणी मेरी हिचा शिरच्छेद, तारीख ८ फेब्रुअरी १५८७.

नोव्हेंबर महिन्यांत अपराधी ठरवून मृत्यूची सजा नेमली. कित्येक वर्षेंपर्यंत सतत चाललेले फंदफितूर आतां बंद होतील म्हणून, लोकांना फार आनंद झाला, आणि लंडनांतील रस्तोरस्तीं आनंदसूचक मोठमोठाले अग्नि पेटविले त्यांनीं रस्ते भडाडून जाऊन एकच लकलकाट झाला. परंतु मृत्यूची सजा देण्याच्या वारंटावर (अधिकारपत्रावर) सही करण्याला एलिझाबेथचें मन होण्यापूर्वी पुष्कळ दिवस लोटले. सर्व यूरोपखंड आपल्याला ह्या कामीं दोषी ठरवील अशी तिला भीति वाटत होती. शेवटीं तिनें त्या वारंटावर सही केली, आणि स्काटांच्या त्या अति सुंदर आणि हतभाग्य राणीचा १५८७ त फेब्रुअरीच्या ८ व्या तारिखेस शिरच्छेद केला. तत्पूर्वी ती आपल्या पदरच्या बायकांना म्हणाली, "रडूं नका, तुम्हांविषयीं मी आपलें वचन दिलें आहे. माझी "क्याथलिक धर्मावर पूर्ण श्रद्धा असून मी मेलें असें माझ्या सर्व "मित्रांना आणि मैत्रिणींना सांगा."

आतां एलिझाबेथला, फक्त स्पेनदेशचा राजा, फिलिप, एवढ्या एकाच शत्रूशीं प्रसंग राहिला. तो इंग्लंडावर हल्ला करण्यासाठीं कडेकोट तयारी करीत होता. ती राणी, नेहमीप्रमाणें, पैसा खर्च करण्याला भीत होती. इंग्लिश अरमार प्रसंगाला उपयोगीं पडण्यासारखें करण्याला पुरे होईल इतकें देखील द्रव्य देण्याला तिचें मन होईना. परंतु एफिंगहमचा लार्ड हाउअर्ड आणि त्याच्या हाताखालचे अरमाराकडील मुख्य सरदार, ह्यांनीं आपल्याकडून प्रयत्नांत कसर केली नाहीं. सर फ्रान्सिस ड्रेक ह्यानें १५८७ त स्पेन देशांतील केडिझ नांवाच्या बंदरावर मोठ्या शौर्यानें धडक दिली, आणि तेथील आर्माडा (शिलेपोस अरमार) पैकीं कांहीं भाग जाळला, आणि पुष्कळ सुखवस्तु गृ-

इस्थांनीं आपल्या खर्चानें सर्व सामग्रीनें सज्ज आणि लढाईला योग्य अशीं जहाजें तयार केलीं. शेवटीं त्या योजिलेल्या हल्ल्याचा वेळ आला. **फिलिपाचा** प्रतापी सेनापति, **पार्माचा ड्यूक**, ह्यानें, **आर्मोडा** येऊन पोहोंचतांच समुद्र ओलांडून जाण्यास तयार, अशी **नेदर्लंड्स** देशामध्यें ३०,००० **स्पानिश** फौज जमविली होती, आणि आपल्याला सारे **इंग्लंडां**तील **क्याथलिक्स** येऊन मिळतील असा **फिलिपाला** भरवसा वाटून, त्यानें, १५८८ त जूलईच्या १२ व्या तारिखेस, **मेडिना सिडोनियाचा ड्यूक** ह्याच्या हुकुमतीखालीं एकशें एकुणतीस जहाजांचें प्रचंड अरमार रवाना केलें.

स्पानिश आर्मोडा (अरमार) रवाना होतो, ता. १२ जूलई १५८८.

त्याचा भरवसा चुकीचा होता. जूलईच्या १९ व्या तारिखेस, पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणें, अहदतहद समुद्रकिनाऱ्यावर सूचक अग्नि पेटून तो **आर्मोडा** येऊं लागला' अशी बातमी पसरतांच, **इंग्लंडां**तील चट सारे **प्राटेस्टंट्स** लोक व तसेच **क्याथलिक्स** लोकही, आपला देश व आपली राणी ह्यांचें रक्षण करण्यासाठीं कमरा बांधून उठले. **लार्ड हाउअर्ड** ह्याच्या हाताखालीं जरी अवघीं ऐशीं जहाजें, आणि ९००० समुद्रांत लढणारे शिपाई होते, तरी **लार्ड हेन्री सीमर, फ्रॉबिशर, ड्रेक,** आणि **हॉकिन्स,** ह्यांसारख्या बांक्या निर्वाणी वीरांच्या हुकुमतीखालीं तीं जहाजें आणि ते शिपाई होते. **इंग्लिशांच्या** आंगावजनानें हलक्या जहाजांनीं, **स्पानियर्डांच्या** अवजड धुडांसारख्या गलबतांना फार पीडा केली, आणि **काले** बंदरांत दारूसारख्या शीघ्र ज्वालाग्राही पदार्थांनीं भरलेलीं अशीं आठ जहाजें रात्रीं, **स्पानिश** जहाजें

आर्मोडाचा पराभव, १५८८.

नांगरलेलीं होतीं त्यांच्यामध्यें वाऱ्यावर वहावत खुलीं सोडलीं. त्यांमुळें **स्पानियर्ड** लोक आपआपल्या जहाजांच्या नांगरांच्या दोरांचीं शेवटें मोकळीं सोडून देऊन नाळी फिरवून भर दर्यांत जाण्यासाठीं तीं जहाजें हकारून निघाले. तेव्हां **इंग्लिशांचें** अरमार त्या जहाजांच्या मध्यें घुसून, त्यानें त्यांचा माघारी जाण्याचा रस्ता अडवून नाळींपासून सुकाणांपर्यंत किंवा सुकाणांपासून नाळींपर्यंत गोळे जावे अशा प्रकारें त्यांवर, दारूगोळा संपेपर्यंत तोफांचा भयंकर भडिमार केला. तेव्हां **स्पानियर्डांचें** धैर्य खचलें. तितक्यांत फार जोराचा वारा सुटला. त्यामुळें त्या **आर्माडाचा** अधिपति **ड्यूक** झाला, **स्कॉट्लंडाच्या** उत्तरभागाला वळसा घालून **स्पेन** देशीं माघारें जाण्याला मार्ग शोधण्याचा प्रयत्न करणें भाग आलें. **आर्क्नि** बेटांजवळ तीं जहाजें पोहोंचतात तों त्या वादळाचा तडाका किंवा कहर त्यांवर गुदरला; त्यानें तीं जहाजें खडकांवर पिटाळलीं. **स्कॉट्लंडा**भोंवतालच्या बेटांच्या किनाऱ्यावर मनुष्यांच्या प्रेतांचें अंथरूण झालें, ११००० **स्पानियर्ड्स आयर्लंडच्या** किनाऱ्याबाहेर प्राणांस मुकले; आणि त्या **आर्माडा**पैकीं छिन्नभिन्न झालेल्या फक्त त्रेपन्न जहाजांचा समुदाय **स्पेन** देशांतील **कोरन्ना** बंदरी मार्ग सांपडून माघारा गेला. ज्याविषयीं दहशत पडलेली होती अशा त्या **आर्माडाचा** पराभव झाला, आणि **इंग्लिशांचा** तत्संबंधानें आनंद आणि कृतज्ञता, हीं, **एलिझाबेथनें** त्या समयीं एक नवीन नाणें पाडविलें त्यावर, "**देवानें** फू केलें आणि त्याबरोबर ते उधळले." ह्या अर्थी **लाटिन** भाषेंत "**आफ्लेव्हिट डेउस एट् डिस्सिप्याटि सुन्ट**" हें वाक्य छापून किंवा ठसवून, प्रदर्शित केलीं.

आतां शेवटीं तुलनेनें पाहतां पूर्वींहून **एलिझाबेथला** कांहींसा

विसांवा मिळाला. यूरोपांतील सर्व राष्ट्रें तिचा प्रताप मानूं लागलीं, तिचें अरमार "सागरांचे स्वामी" झालें; तिच्या प्रजाजनांनीं तिचा द्रोह करण्याविषयीं उत्पन्न झालेल्या साऱ्या मोहांचा प्रतिरोध केला; परदेशीय सत्ताधीशांशीं मसलती करून फंदफितूर करण्यापेक्षां आपल्या राणीच्या अमलाखालील स्वस्थपणा आणि स्वधर्माविषयीं सहिष्णुता ह्यांत राहणें फार चांगलें अशी **क्याथलिकांची** खातरी झाली; आणि **इंग्रज** बनून, **इंग्लिश** धर्मानें तृप्त होत्साते, ते देखील, निमूटपणें स्थिरस्थावर होऊन राहिले. आतां ज्यांच्याशीं वागणें अत्यंत कठीण झालें होतें, असे लोक म्हटले म्हणजे, "**प्यूरिटन्स**" नांवाचे परमावधीचे **प्राटेस्टंट** लोक होते ते. त्यांनीं **जिनोव्हा** एथून माघारीं येतांना अत्यंत साध्या संस्काराविषयीं देखील अप्रीति किंवा अरुची आपल्या बरोबर आणली होती. परंतु त्यांना **एलिझाबेथच्या** कारकीर्दींत बरेंच निवांत ठेवलें होतें. **फ्रान्स** देशांत **चौथ्या** हेन्रीनें, आपल्या विख्यात "**नान्ट** एथील **ईडिक्टानें**" (**नान्ट** एथील शासनानें किंवा आज्ञापत्रानें) आपल्या **प्राटेस्टंटधर्मी** प्रजाजनांला इच्छेस येईल त्या प्रकारें भजनपूजन करण्याविषयीं मोकळीक दिली, आणि तेणेंकरून **यूरोपांत** स्वस्थता होण्याला त्यानें साहाय्य केलें.

> इंग्लंडांतलें द्वैत मोडून एकदिल होऊन त्यांत स्वस्थता होते.

> नान्टचें ईडिक्ट (राजशासन किंवा राजाज्ञापत्र), १५९८.

आणि **इंग्लिश** राष्ट्रांतील लोकांची जी अभिवृद्धि गेल्या तीस वर्षांत लक्ष्यांत न येतां होत होती, ती आतां फळास येऊं लागली. समुद्रावरून **इंग्लिश** जहाजें चहूंकडे दूरदूर हकारून जाऊं लागलीं. **सर वाल्टर राली** ह्यानें **उत्तर अमेरिकेस** आणि **दक्षिण**

**अमेरिकेस** सात मोहिमी अथवा स्वाऱ्या करविल्या; त्या स्वाऱ्यांत गेलेल्या माणसांनीं नवीं नवीं फळें, व तसाच तमाखू, आणि बटाटे परत येतांना आपल्याबरोबर आणले; आणि त्यानें **व्हर्जिनिया** नांवाची जी नवीन वसाहत स्थापली, ती जरी फारशी भरभराटीस आली नाहीं, तरी तिनें तसल्या दुसऱ्या वसाहती होण्याला मार्ग सुगम केला. **सर फ्रान्सिस ड्रेक** ह्यानें **ईस्ट इंडिझ्** ( पूर्वेकडील देश किंवा बेटें ) ह्यांस जाण्याचा मार्ग खुला केला, आणि **इंग्लंड** व **हालंड** ह्या देशांपासून जहाजांमागून जहाजें पूर्वेकडील देशांला जाऊन त्या देशांशीं व्यापार करूं लागलीं. १५९९ त डिसेंबरच्या ३१ व्या तारिखेस, **लंडनांतील ईस्ट इंडिया मर्चंट्स**, म्हणजे पूर्वेकडील देशांशीं व्यापार करणारे उदमी लोक, ह्यांच्या एका कंपनीला ( मंडळीला ) **एलिझाबेथनें** सनद दिली. ह्या कंपनीपासूनच आमची जी विख्यात **ईस्ट इन्डिया कंपनी** ( पूर्वेकडील देशांशीं व्यापार करणारी मंडळी ) नांवाची मंडळी पुढें झाली, तिचा आरंभ झाला.

ईस्ट इन्डिया कंपनी होते, तारीख ३१ डिसेंबर १५९९.

ह्या बाह्य अभिवृद्धीच्या बरोबरच, मन आणि तर्क किंवा विचार ह्यांची अंतर्वृद्धि होत होती. **हेन्री ट्यूडर** हा गादीवर बसला त्या काळापासून जीं शंभर वर्षें लोटलेलीं होतीं, त्या शंभर वर्षांत मोठमोठ्या गोष्टी घडलेल्या होत्या, आणि विस्मयकारक नवीन शोध लावलेले होते. त्या गोष्टींनीं आणि शोधांनीं माणसांच्या मनांचें उद्बोधन किंवा उद्दीपन होण्याला चुकलें नाहीं. **कोपर्निकस आणि गालिलीयो** ह्यांनीं आमची ही लहानशी पृथ्वी सकल विश्वाचा केन्द्र नाहीं ही गोष्ट सिद्ध करून दाख-

कोपर्निकस आणि गालिलीओ.

विली, त्याच वेळीं नवीन देशांचा शोध लावण्याकरितां केलेलीं जलपर्यटणें किंवा सफरी ह्यांनीं, ही आमची लहानशी पृथ्वी देखील, प्राचीन काळचे लोक मानीत होते तीहून किती पुष्कळ मोठी आणि विस्तीर्ण आहे, हें सिद्ध झालें. **अमेरिका** खंडांतील सोनें आणि रुपें ह्यांचीं भांडारें ( खाणी ), आणि तेथील विचित्र लोकजाति किंवा लोकवंश, ह्यांसहवर्तमान, त्या खंडाचा शोध लावलेला होता; आणि खुद्द **इंग्लंडांत**, तो नवीन धर्म, तो मुद्रणकलेचा किंवा छापण्याच्या कलेचा प्रसार, आणि **ग्रीक** आणि **लाटिन** ह्या भाषांचा तो अभ्यास, ह्या गोष्टींनीं, **इंग्लिश** लोकांचीं मनें उद्दीपन पावून त्यांत प्रगल्भ कल्पना किंवा विचार उत्पन्न झालेले होते, आणि चित्ताला उद्बोधन करणारे गद्यात्मक आणि पद्यात्मक ग्रंथ होऊन त्यांतून ते विचार किंवा कल्पना प्रकट झाल्या. आणि ह्याच प्रकारें **एलिझाबेथ**च्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास इतिहासाच्या व्यासंगाचें पुनरुज्जीवन झालेलें पाहण्यांत येतें. **आर्चबिशप पार्कर** ह्यानें, प्राचीन **इंग्लिश** बखरी एकत्र करण्याविषयीं यत्न केला. **सर वाल्टर राली** ह्यानें आपल्या विशाल **पृथ्वीच्या इतिहासाला** आरंभ केला. तो त्यानें, पुढल्या कारकीर्दीत समग्र लिहिला. आणखी क्षुद्र निबंध, कादंबऱ्या, आणि सर्व प्रकारचे अल्पायु ग्रंथ तर अनेक झाले. त्यांखेरीज, **सर फ्रान्सिस बेकन** हा, व ह्यासारखे मोठे मोठे इतर ग्रंथकार झाले. **बेकनानें**, तत्त्वमीमांसा आणि शास्त्र हीं मृतप्राय झालेलीं होतीं, त्यांत नवा जीव घातला. **स्पेन्सर** हा कवि होता, त्यानें **"फेरी कुईन"** नांवाचें काव्य रचलें. **सर फिलिप सिड्नी** ह्यानें **"आर्केडिया"** नांवाचें काव्य रचलें. तो ने-

एलिझाबेथच्या कारकीर्दीतील ग्रंथकार.

दर्लंड्स मध्यें झट्फेन एथें लढाई झाली तींत असाध्य जखम लागून मरण पावला. सर्वांचा जणू कळस करण्यालाच, धान्याचीं कोठारें, छपरें किंवा पालें, आणि वाड्यांचीं आंगणें, अथवा लंडन शहरांत आतां उत्पन्न होऊं लागलेलीं नाटकगृहें, ह्यांतून ज्यांच्या नाटकांचे प्रयोग होत, किंवा ज्यांचीं काव्यें कवनें गात, असले एलिझाबेथच्या कारकीर्दींतील विद्याग्रंथकलापाच्या काळांतले नाटककार व कवि ह्यांच्या झुंडींमध्यें, आमचा कविशिरोमणि,

शेक्स्पीयर,१५६४.

शेक्स्पीयर, उदयास आला. त्याचें जन्म १५६४ त झालें. त्यानें आम्हांकरितां जीं नाटकें रचून ठेवलेलीं आहेत, तीं मनुष्यांच्या स्वभावांचीं इतकीं हुबहू चित्रें आहेत, तीं परमावधीच्या चातुर्यानें इतकीं परिपूर्ण आहेत, त्यांची भाषा इतकी अमोघ (हृदयंगम) आहे, आणि त्यांतील विचार किंवा कल्पना, इतक्या उमद्या (प्रगल्भ) आहेत कीं, तीं रचलीं गेलीं तेव्हांपासून आजवर केवळ इंग्लंडच नव्हे, परंतु सारी दुनिया त्यांच्यायोगें पूर्वींपेक्षां विद्याधनसमृद्ध झाली आहे.

आपण आतां एलिझाबेथच्या कारकीर्दीच्या अखेरी जवळ जवळ येत चाललों. १५९८ त सेसिल, लार्ड बर्ली, वारला, आणि तरुण तरुण पुरुष एलिझाबेथच्या भोंवतीं जमले. त्यांत,

बर्लीचा मृत्यु,१५९८.

(१) सर वाल्टर राली हा एक होता, तो शूर आणि शाहणा होता; (२) बर्लीचा पुत्र, राबर्ट सेसिल, हा चतुर मुतसद्दी होता; आणि (३) राबर्ट डेव्हरो, एसेक्सचा अर्ल, हा बेकैद, हेकेखोर तरुण पुरुष होता. एलिझाबेथ त्याचे लेंकराप्रमाणें लाड करी, आणि त्याला धमकावी. आयर्लंडांत अजून जुने बखेडे चालू होते, आणि क्याथलिकांना शिक्षा करण्याविषयींचे कायदे तेथें अमलांत आणण्या-

करितां, आणि **इंग्लिश प्रेअर-बुक**, म्हणजे प्रार्थना-पुस्तक, आणि उपासनापद्धति, तेथील लोकांवर जुलुमानें लादण्यासाठीं, मूर्खपणानें प्रयत्न केला, त्यामुळें तेथें साऱ्या गोष्टी पूर्वीहून अधिकच बिघडून गेलेल्या होत्या. शिवाय, **पोपा**नें जेव्हां **एलिझाबेथ**ला बहिष्कार घातला, तेव्हां **आयरिश** लोकांना कोणत्या पक्षाकडे वळावें हें कळेना. **स्पानिश** लोक तर त्यांना **इंग्लंडा**शीं वैर करण्याविषयीं चिथवीत होते, आणि **टिरोनचा अर्ल, ह्यूओ' नील,** हा एक शूर **आयरिश** रजवाडा होता, तो, **स्पेन** देशचा राजा, **दुसरा फिलिप,** ह्याच्या कुमकेनें, बंड करून उठला. त्यानें **आर्मा**जवळ **इंग्लिशां**चा पराभव केला, तेव्हां **एलिझाबेथ** राणीनें त्यावर **एसेक्स**ला ३०,००० फौज बरोबर देऊन पाठविलें. परंतु **एसेक्सा**ला पुष्कळ अडचणी येऊन, आणि खुशामतीला वश होऊन, त्यानें **टिरोना**शीं मूर्खपणाचा तह केला, आणि नंतर, मी शाहणपणाची गोष्ट केली अशी राणीची समजूत करण्याच्या आशेनें तो फार त्वरेनें **इंग्लंडा**स माघारा गेला. परंतु राणी त्यावर फार रागावली, आणि तिनें त्याला, त्याच्याच वाड्यांत कैद करून ठेवलें. त्याच्याशीं तिच्या ह्या वागणुकीनें मनांत फार दुःखी होऊन, तो उलट्या काळजाचा तरुण माणूस, आपले दोस्त गोळा करून, बंड उठवीन ह्या आशेनें, **लंडना**स कूच करून गेला. तेथें त्याचा बेत अगदीं फिसकटला, आणि त्याला पकडून, राजद्रोहाचा गुन्हा त्यावर शाबीत होऊन त्याचा १६०१ च्या फेब्रुअरींत शिरच्छेद केला.

टिरोनचा अर्ल ह्यू-ओ' नील ह्याचें बंड, १५९५–१६०२.

एसेक्साचें बंड आणि मृत्यु, १६०१.

दरम्यानच्या वेळांत **लार्ड मौन्टजॉय** ह्याला **आयर्लंडा**स

पाठविलें. तेथें **टिरोन** हा शेवटीं १६०२ त मार्चच्या २४ व्या तारिखेस शरण आला. ह्या दिवसापासून साऱ्या **आयर्लंडा**वर **इंग्लंड** अमल करीत आलें आहे, आणि पुढल्या कारकीर्दींत, शेंकडों **इंग्लिश** आणि **स्कॉच** वसाहत करणाऱ्या लोकांना, त्यांनीं स्वस्थता किंवा बंदोबस्त राखावा ह्या अटीनें, **लीन्स्टर,** आणि **अल्स्टर** ह्या दोहों परगण्यांत जमिनी दिल्या. त्या जमिनी **अल्स्टरचे** आणि **लीन्स्टरचे** **"प्लान्टेशन्स"** (लागवणीचीं थळें किंवा वसाहती) ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत, आणि त्यांच्यायोगें **आयर्लंडच्या** उत्तरेकडील मुलुखाचा दोन-तृतीयांशांएवढा हिस्सा परदेशीयांच्या हातीं गेला. ह्या उलटापालटीनें जरी वरपंकी आबादी झाली, तरी ती उलटापालट अनेक जागीं फार अन्यायानें केली, त्यामुळें हाडवैर उत्पन्न झालें, त्यानें पुढें कांहीं वर्षांनीं मोठा बखेडा उत्पन्न केला.

आयर्लंडावर इंग्लंड १६०२ पासून अमल करूं लागलें.

आणि आतां **राणी एलिझाबेथ** मरणोन्मुख होऊन पडली. ती निःसंशय फुशारखोर, क्षणिकबुद्धि, धरसोड करणारी, आणि वारंवार असत्यवादी होती. परंतु ती गादीवर बसली तेव्हां, **इंग्लंड** दुर्बल होऊन, त्यांत फळ्या झालेल्या होत्या, असें तिच्या प्रत्ययास आलें असें असून, ती त्याला प्रबल, आणि एकदिल करून सोडून गेली. **पार्लमेंटानें** देखील, **आठव्या हेन्रीच्या** कारकीर्दींत गमावलेलें स्वातंत्र्य बहुतेक परत मिळविलें. पुष्कळ बडे लोकांकडे **"मोनॉपोलीझ"** म्हणजे मक्ते किंवा गुत्ते (म्हणजे अमक्यानेंच अमुक जिन्नस, उदाहरणार्थ द्राक्षासव, विकावा, दुसऱ्यानें विकूं नये असे हक्क) असत, आणि त्यांच्या योगें ते लोकांकडून पैसा पिळून काढीत; ते

मक्ते किंवा गुत्ते बंद होतात, आक्टोबर १६०१.

मक्ते किंवा गुत्ते बंद करण्याविषयीं तिच्या शेवटच्या **पार्लमेंटांतील हौस आफ् कामन्स** ह्या सभेनें आग्रह धरला, तेव्हां तिला ती गोष्ट मान्य करावी लागली.

परंतु एका गोष्टीविषयीं, **एलिझाबेथनें** आपला दुराग्रह अंतकाळापर्यंत सोडिला नाहीं. आपल्यामागें गादीवर अमक्यानें बसावें, ही गोष्ट ती ठरवीना. १६०३ त मार्चच्या २३ व्या तारिखेस, संध्याकाळीं तिचा जीव नाहींसा होत चालला असतां, फक्त तिनें आपली मान थोडीशी हालविली, तेवढ्यावरून आपली जागा **स्काट्लंडचा सहावा जेम्स** ह्याला नेमून भरूं देण्याविषयीं ती राजी आहे असा तिच्या प्रधानांनीं तर्क केला. मार्चच्या २४ व्या तारिखेच्या पहांटेस ती प्रतापी राणी मरण पावली.

एलिझाबेथचा मृत्यु, तारीख २४ मार्च १६०३.

**ट्यूडरांच्या** घराण्याची कारकीर्द आतां संपली, आणि त्यांच्या जागीं **स्टूअर्टांचें** घराणें यावयाला लागलें होतें. शंभरांहूनही ज्यास्तीच वर्षांपासून, **इंग्लंड** हें इतर राष्ट्रांमध्यें प्रमुख स्थानाला, वर चढत चढत येत होतें. **सातव्या हेन्रीनें** परदेशीय युद्धांपासून मोकळें राहून, स्वदेशीं बडे लोकांवर बळकट दाब ठेवून, त्या गोष्टीचा पाया घातला. **आठवा हेन्री** परकीयांचा पगडा, म्हणजे **धर्मावर पोपाची** सत्ता, चालूं न देऊन, आपल्या बापाच्या मार्गानेंच त्याच्या पावलांवर पावलें टाकीत गेला. **एड्वर्ड** आणि **मेरी** ह्यांच्या कारकीर्दी बखेड्याच्याच होत्या खऱ्या तरी, त्या कारकीर्दीनीं, विचाराच्या स्वातंत्र्याची आशा करण्यास, आणि धर्मसंबंधी छळणुकेचा तिटकारा करण्यास, माणसांना,

ट्यूडरच्या घराण्याच्या इतिहासाचा गोषवारा.

मार्ग दाखवून, लावून आपलें काम बजाविलें. एलिझाबेथनें, सभोंवतीं धर्मसंबंधाच्या युद्धांचा कहर उसळला होता त्यांपासून आपल्या लोकांचें रक्षण करून, त्यांना बळकट वाढून उफाड्यास येण्याला वेळ दिला. व्यापार भरभराटीस आला, शेतकी सुधरली, सुख आणि कल्याण हीं वृद्धि पावलीं. साहसी नाविकांनीं दूरदूरचे महासागर धुंडाळले, आणि समुद्रांवरून झपाट्यांनीं सफरी केल्या. एथपर्यंत कीं, शेवटीं इंग्लंडचें नांव धारिष्ट आणि साहस, ह्यांकरितां उच्च स्थान पावलें. असें असतां, नवीन कल्पना, विचार, आणि दिवसेंदिवस विस्तीर्ण होत जाणारें ज्ञान, ह्यांनीं माणसांचीं मनें परिपूर्ण होऊन जाऊन, देदीप्यमान विद्याग्रंथकलाप आविर्भूत झाला. त्या विद्याग्रंथकलापावर चढ अथवा तोड, आमच्या ह्या काळांत देखील, कधींच झाली नाहीं. ज्या सरकारच्या अमलाखालीं ही अभिवृद्धि झाली, त्यांत एक गोम होती. तें सरकार, जो राजा किंवा जी राणी राज्य करीत असेल त्याच्या, किंवा तिच्या, गुणावगुणांवर, बहुतकरून सर्वथैव अवलंबून राही. जोंपर्यंत शाहणा आणि समर्थ, राजा किंवा राणी, गादीवर असे तोंपर्यंत सर्व गोष्टी नीट चालत; परंतु एड्वर्ड आणि मेरी ह्यांच्या कारकीर्दीवरून एक गोष्ट साबीत झाली होती, ती ही. राजसत्ताक राज्यपद्धति इतकी खंबीर होऊन गेलेली होती कीं, राजसत्तेचा मूर्खपणानें उपयोग होऊं लागला, म्हणजे राष्ट्रांत घप्पाघोळ उडे. एलिझाबेथच्या मृत्यूनंतर जे राजे झाले त्यांनीं शाहणपणानें राज्य केलें नाहीं, त्यामुळें, पुढें आपल्या पाहण्यांत येईलच कीं, पार्लमेंट आणि लोक ह्यांच्याशीं त्यांचा झगडा उत्पन्न झाला. त्यापासून आपआपसांतील युद्ध, आणि विपत्ति, ह्यांनीं इंग्लंड पुनः एकवेळ विदीर्ण झालें.

# भाग ६.

## अनिर्बंधराजसत्ताक राज्यपद्धतीविरुद्ध झगडा

### स्टयूअर्टच्या घराण्यांतील राजे

इंग्लंडचा **पहिला जेम्स**
( स्काटलंडचा सहावा ),
ज. १५६६, मृ. १६२५,
का. १६०३–१६२५,
बा. डेन्मार्कची आन.

**पहिला चार्लस**,
ज. १६००, शिरच्छे. १६४९,
का. १६२५–१६४९,
बा. फ्रान्सची हेन्रिएट्टा मारिया.

१६४९ पासून १६६० पर्यंत इंग्लंडाला राजा नव्हता.

एलिझाबेथ,
प. इलेक्टर पालाटाइन पांचवा फ्रेडरिक.

प्रिन्स रूपर्ट.

प्रिन्स मॉरिस.

सोफाया,
प. एर्नेस्ट हानोव्हरचा इलेक्टर.

**दुसरा चार्लस**,
ज. १६३०, मृ. १६८५,
का. १६६०–१६८५,

**मेरी**,
प. आरेन्जचा वुइल्यम.

**दुसरा जेम्स**,
ज. १६३३; मृ. १७०१.
का. १६८५–१६८९,

**पहिला जार्ज**,
हानोव्हरच्या घराण्यांतील पहिला राजा.

वा. ब्रगान्झाची काथरिन.
(वारस न होतां मेला.)

(ह्याला पदच्युत केले),
वा. १ आन हाइड्. —— २ मोडीनाची मेरी.

**तिसरा वुइलियम**,
(ज. १६५०, मृ. १७०२)

आणि

**मेरी**
(ज. १६६२, मृ. १६९४)

ह्या दोघांना **राजा** आणि **राणी** १६८९ त केलें
म्हणून जाहीर केलें.
**वुइलियमा**नें १७०२ पर्यंत राज्य केलें.
(हा संतान न होतां वारला.)

**आन**,
ज. १६६५, मृ. १७१४,
का. १७०२–१७१४,
प. डेन्मार्कचा जार्ज.
(संतान न होतां वारली.)

जेम्स
(धि प्रिटेन्डर म्हणजे
तोतया),
मृ. १७६६.

चार्लस एड्वर्ड
(धि यंग प्रिटेन्डर म्हणजे
धाकटा तोतया),
मृ. १७८८.
(संतानहीन.)

# प्रकरण १६.

## प्रिरॉगेटिव्ह (विशेषाधिकार) आणि पार्लमेंट

### पहिला जेम्स, १६०३–१६२५.

**एलिझाबेथ** वारतांच, **कौन्सिलानें स्कॉटलंडचा** राजा, **सहावा जेम्स,** ह्याला येण्याविषयीं डांकोडांक बोलावणें पाठविलें. तो **जेम्स, मेरी स्टयूअर्ट** आणि **डार्न्ले**, ह्या दंपत्याचा पुत्र, आणि **सातव्या हेन्री**ची सर्वांत वडील मुलगी जी **मार्गरेट,** तिचा पणतू, होता. **आठव्या हेन्रीनें** जरी आपल्या मृत्युपत्रांत **मार्गरेट**ला अर्जी गाळलें होतें (३०० वें पृष्ठ पहा), तरी **जेम्स** हा केवळ अगदीं जवळचा वारस होता, एवढेंच नव्हे, परंतु तो साऱ्या राष्ट्राला पसंत होता. असो, ह्याप्रकारें **स्काच** लोकांचें भाकीत (१७१ वें पृष्ठ पहा) शेवटीं पूर्ण किंवा खरें झालें, आणि १६०३ त जूलईच्या २५ व्या तारिखेस जेव्हां **स्कॉटलंडचा सहावा जेम्स** ह्याला, इंग्लंडचा **पहिला जेम्स** ह्या नांवानें **वेस्टमिन्स्टर आर्बी**त राज्याभिषेक झाला, तेव्हां त्या भाकिताप्रमाणें, एक **स्काच** राजा, **स्कोन** एथील पवित्र पाषाणावर पुनः एकवेळ बसला.

**जेम्साच्या** कारकीर्दींत जरी फारशा ध्यानांत ठेवण्याजोग्या गोष्टी घडल्या नाहींत, तरी ती कारकीर्द महत्वाची आहे, कारण **पार्लमेंटाशीं** सतत चाललेल्या त्याच्या कलहांनीं, त्याचा पुत्र **पहिला चार्लस** ह्याच्या दुर्दैवाच्या किंवा अनर्थाच्या कारकीर्दीचा मार्ग तयार केला.

पहिल्या जेम्स राजाचे गुणदोष.

**जेम्स** हा वाईट माणूस नव्हता, आणि त्याला वाईट राजा म्हणण्यापेक्षां गैर मार्गास लावलेला म्हणावें हें बरें.

नित्याच्या गोष्टींत तो पाहिजे तितका धूर्त किंवा शाहणा होता. पाणथळ प्रदेश पाटपळवे काढून कोरडे करून निरुपयोगी पडलेली जमीन फायदा देणारी करणें, पहिला टप्पालचा कारखाना स्थापणें ( परदेशांशीं व्यवहारापुरता मात्र ), आणि रेशमी कापड विणणें आणि रेशिमाचे किडे पाळून त्यांपासून रेशीम उत्पन्न करणें ह्यां सारख्या पुष्कळ उपयोगी शिल्प क्रियांना किंवा कसबांना उत्तेजन देणें, ह्या सर्व गोष्टी त्यानें केल्या त्यांबद्दल आम्ही त्याचे ऋणी आहों. परंतु त्यानें इंग्लिश लोकांना कधींही पुरें ओळखलें नाहीं, आणि आपलें जातीचें शाहणपण सर्वश्रेष्ठ आहे अशी त्याच्या अक्कलेला अगदीं गर्क करून टाकणारी त्याला इतकी घमंडी होती, कीं, तो इंग्लंडास आला त्या वेळेस वयानें छत्तीस वर्षांचा होऊन चुकला होता त्यामुळें, पुढें तो इंग्लिश लोकांना ओळखावयास शिकेल असा संभवच उरला नव्हता. तो स्वभावानें प्रियकर आणि सात्विक होता, आणि त्याच्या कारकीर्दीत झालेल्या धर्म संबंधानें छळणुकी पूर्वींसारख्या क्रूर नव्हत्या, हें पुढें पाहण्यांत येईल. परंतु तो अपरूप किंवा अडाणी, आणि अप्रौढ, असून त्याला गैरशिस्त किंवा अचकटविचकट थट्टामस्करीची, आणि आपली विद्वत्ता बाहेर दाखविण्याची, फार आवड असे. त्याची विद्वत्ता थोर होती. तो फार दुराग्रही होता, आणि त्याला कोणी सल्ला किंवा बुद्धिवाद सांगितला तर बिलकूल सोसत नसे, तथापि त्याला खुशामतीची किंवा मिथ्या प्रशंसेची आवड असून, प्रयत्नाचा किंवा आयासाचा तिटकारा होता, त्यामुळें, त्याच्या प्यारींतले लोक त्याला पाहिजे तसा सहज वळवीत.

तो इंग्लंडची गादी वारशानें आपली असें मानीत होता, आणि "डिव्हाइन राइट" ह्मणजे ईश्वरदत्त हक्क, ह्यानें मी राज्य

करतों असें तो श्रद्धापूर्वक मानीत होता; ह्याचा दुसऱ्या शब्दांनीं अर्थ हा कीं, इहलोकच्या कोणत्याही अधिकाऱ्याला मी जबाबदार नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु, सर्व राष्ट्रांतील प्रजेवर व कायद्यांवर माझा अनिर्बंध अधिकार आहे, असा त्याचा समज होता. **ट्यूडरच्या** वंशांतले सारे राज्याधिकारी, स्वतंत्र किंवा अनिर्बंध होते, आणि **सातव्या हेन्रीची "स्टारचेम्बर"** (तारकांकित न्यायसभा ह्या नांवाचें अपराधी बडे लोकांच्या चौकशीकरितां स्थापलेलें कोडत), आणि **धर्मसं**बंधीं खात्यावर अमल करण्यासाठीं **एलिझाबेथनें** स्थापलेलें **"हाइ कमिशनचें कोर्ट"** (मोठा अधिकार दिलेली न्यायसभा) ह्या दोहों कोडतांनीं राजाला किंवा राणीला मोठी सत्ता दिली. परंतु **आठवा हेन्री** आणि **एलिझाबेथ** ह्यांनीं आपल्या प्रजेला ओळखलेलें होतें, त्यामुळें तीं दोघें लोकप्रिय होतीं. विरुद्धपक्षीं **जेम्सानें** आपल्या प्रजाजनांला कारण नसतां सताविलें. त्यानें **पार्लमेंटावर** अधिकार चालवण्याचा प्रयत्न मांडला, आणि **कामन्स** ह्यांच्या सभेला त्यानें एकवेळ ह्याप्रमाणें सांगितलें, जसा, "**ईश्वर** काय करूं शकेल किंवा काय न करूं शकेल ह्याविषयीं "वाद करणें हा नास्तिकपणा आहे·········तसा, कोणाही प्रजा-"जनानें राजा काय करूं शकेल ह्याविषयीं वाद करणें, किंवा राजा "हें किंवा तें करूं शकणार नाहीं असें म्हणणें, हा केवळ अतिक्रम "आणि परमावधीची अवहेलना होय."

· डिव्हाइनराइट (ईश्वरदत्त हक्क) ह्याचा उहू नियतो.

ह्या वागणुकीच्या प्रकारानें त्या स्वतंत्र **इंग्लिश** लोकांना चिरड आली असेल, हें तत्काल लक्ष्यांत येण्याजोगें आहे. ते जरी आपल्या राजांना चाहत, आणि पूज्य बुद्धीनें मानीत, तरी

**साक्सन** काळापासून ह्या कारकीर्दीपर्यंत, पहिल्यानें **वुइटा-न्जिमोट** (बुधजन मंडल) मध्यें, आणि पुढें **पार्लमेंटांत** त्यांच्या प्रतिनिधींच्या द्वारें, कोणत्याही नव्या कायद्याला, आवडला तर, **होय होय,** किंवा, न आवडला तर, **नाहीं नाहीं,** म्हणण्याची त्यांना संवई झालेली होती. शिवाय, ज्या काळीं **जेम्स** राजा झाला, त्या काळीं, लोक, फार दिवस स्वस्थता असल्यामुळें, तालेवार झालेले होते, आणि त्यांना सर्वलोकप्रिय, आणि खमक्या राजांच्या अमलाची संवई झालेली होती. ते लोक दुबळ्या आणि डामडौली किंवा बढाईखोर राजाला दबकतील असा संभवच नव्हता. खेड्यापाड्यांत सुखवस्तु गृहस्थ, धारेकरी, आणि मजूर हे सुखी होते. शहरांत व्यापार वाढत होता. **लंडन** शहर तर इतकें जलद पसरूं लागलेलें होतें, कीं, **एलिझाबेथनें** नवीन इमारती बांधण्याची मनाई करण्याचा प्रयत्न केलेला होता, आणि **जेम्सानें**, आपल्या कारकीर्दीत खेड्यापाड्यांतील घरंदाज गृहस्थ **लंडनांत** येऊन राहूं लागले होते, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना दोन वेळां, "आपआपल्या घरीं जा, आणि तेथें आपआपले कामधंदे करीत रहा;" अशी ताकीद दिली होती. ह्याप्रकारें मोठमोठाल्या शहरांत लोक राहवयास येऊं लागून त्यांची गर्दी होऊं लागली, आणि छापलेल्या पुस्तकांचा, आणि मुख्यत्वेंकरून **इंग्लिश बायबलाचा**, म्हणजे **इंग्लिश** भाषेंत केलेल्या **बायबलाच्या** भाषांतराचा, प्रसार होऊं लागला, त्यायोगें, ज्या पुष्कळ गोष्टी, पूर्वी मुख्यत्वेंकरून मुतसद्दी आणि धर्माधिकारी ह्यांवर टाकलेल्या असत, त्यांविषयीं लोक स्वतंत्रतेनें विचार करून बोलूं लागले. स्थूल मानानें म्हटलें तर, ह्या काळीं **इंग्लंडांत**, तीन पक्ष झालेले

राष्ट्रांतील लोकांची स्थिति.

होते. ( १ ) पहिला **प्यूरिटन्स** ह्यांचा (धर्माचारांत अत्यंत पवित्रता इच्छिणारे लोक ह्यांचा ) पक्ष. हे आस्थेवाईक, आत्मसंयमी होते, ते सदाचारांत किंवा धर्मपरायणतेंत आयुष्य घालवीत, आणि निरर्थक शपथा घेणें, जुगार खेळणें, दारू पिणें, व इतर दुर्व्यसनें, दुर्दैवानें त्या काळीं दरबारांत नित्य परिपाठांतलीं झालेलीं होतीं, त्यांना ते दोष ठेवीत. त्या लोकांना देवळांतून होणारे धर्मसंबंधी सर्व संस्कार आवडत नसत, आणि बाप्टिझम, म्हणजे धर्मनिवेशार्थक जलसंस्कार, हा करतांना क्रूसाची खूण करणें अथवा पांढरा झगा घालणें, हें अयोग्य आहे असें त्यांना वाटे. **युनिफार्मिटीच्या आक्टा**प्रमाणें ( एकरूपतेच्या कायद्याप्रमाणें ), **प्रेअर–बुकां**त ( प्रार्थना–पुस्तकांत ) सांगितलेल्या उपासनांवांचून अन्यप्रकारच्या उपासनांची मनाई होती. म्हणून **प्यूरिटन्सां**ना त्या उपासनेच्या प्रकारांतील कांहीं भाग पालटावयास पाहिजे होते. राज्यसंबंधी गोष्टींत ते लोक **पार्लमेंटा**ला स्वातंत्र्य असावें ह्या मताला फार खंबीर आश्रय देणारे होते.

प्यूरिटन्स ह्यांचा पक्ष.

( २ ) दुसऱ्या पक्षाला आम्ही आतां **हाइ चर्च पार्टी** ( उच्चधर्मपथपक्ष, ह्यांत रोमन क्याथलिक पंथांतील कांहीं तात्त्विक गोष्टी मानीत असत ) असें म्हणूं. हा पक्ष तत्पक्षीय लोकांच्या संख्येमुळें फारकरून अतिमोठा होता. **धर्मसंबंधी सर्व गोष्टी एलिझाबेथ** जशा सोडून गेलेली होती, तशा, आणि **बिशप्स** लोक सल्ला देतील त्याप्रमाणें, राहव्या असें इच्छिणारे लोक त्या पक्षांत होते, आणि ते राजाच्या सत्तेचा पुरस्कार करणारे होते.

इंग्लिश चर्च पार्टी (इंग्लिश धर्मसंबंधी पक्ष).

क्याथलिक लोक, हा तिसरा पक्ष.

शेवटीं ( ३ ) तिसरा एक पक्ष होता, तो **क्याथ-**

लिक्स ह्यांचा. त्यांना, मास्स, म्हणजे प्रभुभोजनपूर्वक उपासना, आणि पोपाचा इंग्लंडांतील अधिकार, पुनः पूर्ववत् स्थापित व्हावयास पाहिजे होता.

ह्या तिन्ही पक्षांना, एलिझाबेथनें चातुर्यानें युक्ति प्रयुक्ति करून निवांत ठेवलेलें होतें, परंतु जेम्स ते पक्ष समजून घेण्याला, किंवा त्यांच्याशीं रास्त प्रकारें वागण्याला, असमर्थ होता. त्याला प्यूरिटन्स लोक आवडत नसत, कारण स्काट्लंडांतील प्राटेस्टंट्स किंवा प्रेस्बिटीरियन्स लोकांच्या मतांसारखींच फारकरून त्यांचीं मतें होतीं. त्या प्रेस्बिटीरियन्स लोकांना तें नांव पडण्याचें कारण त्यांच्यांत बिशप पदवीचे धर्माधिकारी नसत; प्रेस्बिटर्स किंवा "एल्डर्स" (गुरुजन) म्हणून असत त्यांची त्यांवर धर्मसंबंधानें हुकमत असे. ह्या प्रेस्बिटीरियन्सांनीं स्काट्लंडांत जेम्साला फार त्रास दिलेला होता. त्यानें जेव्हां इंग्लिश प्यूरिटन्सांतून चौघांना, १६०४च्या जान्युअरी महिन्यांत, हाम्टन कोर्ट एथें बिशप्प लोकांबरोबर धर्मविचार करण्यासाठीं सभेस येण्याकरितां आमंत्रण केलें,

हाम्टनकोर्ट एथील धर्मविचाराकरितां बैठक किंवा सभा, माहे जान्युअरी १६०४.

तेव्हां ते प्यूरिटन्स त्या प्रेस्बिटीरियन्सांसारखेच, आपल्या मतांविषयीं दुराग्रही आहेत असें त्याला कळून आलें. आपल्या कोट्यांना ते बधत नाहींत म्हणून तो त्यांवर रागावला, आणि "सरकारानें स्थापलेल्या धर्मास अनुसर- "ण्याला तुम्हांला लावीन, आणि तसें तुम्ही न अनुसराल तर "तुम्हांला छळणूक करून देशांतून घालवून देईन," असें त्यांना त्यानें स्पष्ट सांगितलें. त्या हाम्टन कोर्ट एथील सभेपासून चांगला परिणाम म्हणून फक्त एवढाच झाला कीं, जेम्सानें बायबलाचें पूर्वीचें भाषांतर दुरुस्त करून सुधरून तयार करण्या-

विषयीं हुकूम केला. हें "अधिकृत भाषांतर" १६११ त छापून प्रसिद्ध केलें, आणि तें आमच्या हालींच्या काळापर्यंत वापरांत आहे, आणि त्यांतील सुंदर भाषा, आणि **शेक्स्पीयर**चे ग्रंथ, ह्या दोहोंनीं मिळून, आमची अर्वाचीन **इंग्लिश** भाषा रचणें किंवा बनविणे, आणि ती शुद्ध निर्दोष ठेवणें, ह्या कामीं इतर सर्व ग्रंथांपेक्षां फार मोठा कार्यभाग केला आहे. त्या **हाम्टनकोर्ट** एथील सभेपासून वाईट परिणाम हा झाला कीं, **जेम्सानें** आपली दिलेली धमकी शेवटास नेली. धर्मसंबंधानें फेरफार करण्याविषयीं ज्या **प्यूरिटन्स** लोकांनीं अर्ज केलेला होता, त्यांपैकीं दहा जणांना "**स्टारचेम्बर**"च्या हुकुमानें पकडून कैदेंत टाकलें, आणि तीनशें **प्यूरिटन** धर्मोपदेशकांना त्यांच्या वृत्तींवरून काढून लावलें.

प्यूरिटन्स ह्यांची छळणूक.

आतां आपणांला आपल्या मार्गानें धर्मोपासना करण्याला मोकळीक मिळण्याचा संभव उरला नाहीं असें पाहून, लोक देशत्याग करण्याचा विचार करूं लागले. **प्यूरिटन्स** ह्यांचा एक लहानसा समाज, किंवा समुदाय, आपला **जान राबिन्सन** नांवाचा धर्मोपाध्याय, आणि आपले मुख्य किंवा गुरुजन ह्यांपैकीं **वुइलियम ब्रूस्टर** नांवाचा एक गुरुजन, ह्यांच्या हुकमतीखालीं समुद्र ओलांडून **आम्स्टर्डम** आणि **लेडन** एथें पळून गेला. पुढें बारा वर्षांनीं हाच एकशें वीस वसाहत करूं जाणाऱ्या लोकांचा लहानसा समुदाय (त्या समुदायांतील लोक पुढें "पिल्ग्रिम फादर्स," म्हणजे यात्रेकरू गुरुजन, ह्या नांवानें प्रसिद्ध झाले), **मेफ्लाउअर** नांवाच्या जहाजांत बसून **अटलांटिक** महासागर ओलांडून जाऊन **व्हर्जिनिया** नांवाच्या पूर्वींच वसविलेल्या एका आबादान

प्यूरिटन्स लोक स्वदेशत्याग करून अमेरिकेंत राहवयास जातात, १६२०.

राज्यशाखेच्या कांहींसा उत्तरेस एक प्रदेश होता त्यांत वसाहत करून राहिला. त्या लोकांनीं **बायबल** हेंच आपलें धर्मशास्त्र किंवा कायदा, आणि आपला भाऊपणाचा अखाडा हीच आपली सनद, म्हणून आपल्याबरोबर नेली, आणि त्यांनीं जरी **मासाचूसेट्सच्या** रुक्ष नापीक किनाऱ्यावर फार भयंकर विपत्ति भोगली, तरी त्यांनीं त्यांच्यामागून येणारांला मार्ग तयार करून ठेवला, आणि **न्यू इंग्लंड** (नवें इंग्लंड) ह्या नांवाचीं स्वतंत्र संस्थानें स्थापलीं.

**हाम्टनकोर्ट** एथील सभेनंतर फारकरून लागलेंच, **जेम्सानें** आपलें पहिलें **पार्लमेंट** बोलावलें, आणि, दुर्दैवानें अमक्या माणसांनाच प्रतिनिधि नेमावें म्हणून लोकांना तो हुकूम करूं लागला.

पहिल्याच पार्लमेंटाशीं उत्पन्न झालेले लढे, १६०४–१६१०.

नंतर त्याच **पार्लमेंटाच्या** पुढल्या बैठकींत **कामन्सांनीं**, **प्यूरिटन** धर्मोपदेशकांना धर्मोपदेश करण्याविषयीं पुन: परवानगी द्यावी असा अर्ज केला, परंतु **जेम्सानें** त्यांना त्या गोष्टीची वाटाघाट करूं देण्याला नाकारिलें. तेव्हां त्यांनीं **क्याथलिकांविरुद्ध** पूर्वींपेक्षां सख्त कायदे करून उसनें फेडलें. त्यामुळें **जेम्साला** त्या **क्याथलिक**पंथीं धर्माधिकाऱ्यांपैकीं कांहींना हद्दपार करावें लागलें, आणि **"रेक्युझान्ट्स,"** म्हणजे **इंग्लिश** उपासनेला येण्याला नाहीं म्हणणारे **क्याथलिक्स**, ह्यांपासून पुनः दरमहा २० पौंड प्रमाणें पट्टी वसूल करावयास लागणें भाग आलें.

ह्या पट्टीनें **क्याथलिक्स** लोक इतके बेजार झाले कीं, एका **राबर्ट केट्स्बी** नांवाच्या धर्मपिशा माणसाच्या पुढाइतीखालीं, त्यांपैकीं, सारे मिळून पंधरांहून ज्यास्ती नाहींत इतक्या माणसांच्या एका

ल्हानशा जूटानें, राजा आणि त्याचा वडील मुलगा **हेन्री** हे, थाटानें **पार्लमेंट** उघडून त्याच्या कामाचा उपक्रम करणार होते त्या वेळीं, **पार्लमेंट** दारूनें उडवावें, आणि नंतर त्या राजाच्या लहान मुलांपैकीं एकाला गादीवर बसवून, **क्याथलिक** धर्म पुनः पूर्ववत चालू करावा अशी मसलत केली. ती मसलत कित्येक महिनेपर्यंत चालली होती, तीकरितां **फ्लांडर्स** देशांतून हत्यारें आणलीं, आणि परदेशीय **क्याथलिक**पंथी गृहस्थांना समुद्रावरून येऊन बंडाला मिळण्याकरितां बोलावणीं केलीं. परंतु, शेवटचा समय येतो तोंच त्या मसलतींतल्या लोकांपैकीं, **फ्रान्सिस ट्रेशम** नांवाच्या गृहस्थानें, आपला मेहुणा **लार्ड मॉन्टीगल** ह्याला, **पार्लमेंटां**तून गैरहाजीर राहवें, अशी सूचना करण्याकरितां पत्र लिहिलें. **जेम्सा**नें तें गूढार्थक पत्र पाहिलें, आणि कांहीं तरी अरिष्ट आहे असा तर्क केला. नंतर तपास केला तों, **पार्लमेंटा**च्या सभागृहाखालीं एका तळघरांत, पेटवून उडविण्यास तयार केलेल्या अशा बंदुकीच्या दारूच्या रचलेल्या पिंपांसहवर्तमान, पूर्वी **फ्लांडर्स** देशीं नौकर होता असा एक **गाइ (ऊर्फ ग्विडो) फॉक्स** नांवाचा **यार्कशायरां**तला माणूस सांपडला. ह्या मूर्खपणाच्या मसलतीचा परिणाम असा झाला कीं, त्यांतल्या संगनमती माणसांना ठार मारलें, किंवा पकडून कैदकरून त्यांना देहांतशासन केलें, आणि **क्याथलिक्स** लोक पुष्कळ पिढ्यांपर्यंत पूर्वीहून फारच वाईट स्थितींत पडले.

गनपाउडर प्लाट म्हणजे दारूनें उडविण्याची मसलत, तारिख ५ नोव्हेंबर १६०५.

परंतु **जेम्सा**चें **कामन्सां**शीं जें बिनसलें होतें, तें फक्त धर्मसंबंधी गोष्टींविषयींच नव्हतें. **स्काट्स** लोक दरबारांत एकामागून एक येऊन त्यांची दाटी झाली, त्यामुळें **इंग्लिश** लोकांना त्यांचा

मत्सर वाटूं लागला, आणि जेव्हां तीं दोन्ही राज्यें एकत्र करून "ग्रेटब्रिटन" ह्या नांवानें त्यांचें एक संयुक्त राज्य करण्याचा राजानें पार्लमेंटांत उद्गू काढला, तेव्हां त्याला जबरदस्त अडथळा झाला. पार्लमेंटांत त्या वेळीं सर फ्रान्सिस बेकन नांवाचा एक उदयास येऊं लागलेला बारिस्टर (वकील) होता, त्यानें प्रयास करून त्या अडथळा करणाऱ्या प्रतिपक्षाकडून जी गोष्ट मिळविली ती इतकीच होती कीं, जेम्स गादीवर बसला त्यानंतर जन्म पावलेलेल्या स्काचांनीं इंग्लंडांत राहून आंग्लदेशजांचे अधिकार मिळवून इंग्रज बनलें पाहिजे.

स्काटुंड वइंग्लंड मिळून एक संयुक्त राज्य करण्याचा उद्गू निघतो, १६०४.

ह्या मुद्द्यासंबंधानें पाहतां लोकांच्या म्हणण्याहून जेम्साचें म्हणणें रास्त होतें. परंतु, तो लोकांपासून स्वतंत्र होण्याविषयीं नेहमीं प्रयत्न करीत होता, त्यामुळें कांहीं वांट्यांनीं ते त्याला आड आले. त्यानें पार्लमेंटच्या संमतीवांचून जाहीरनामे लावण्याविषयीं, आणि व्यापाराच्या मालावर जकाती बसविण्याविषयीं आग्रह धरिला. कापडांना रंग देण्याचें कसब सुधारण्याविषयीं मनांत येऊन, त्यानें १६०८ त रंगविलेलें नाहीं असें कापड देशांतून बाहेर पाठविण्याची मनाई केली आहे असा जाहीरनामा लावला, आणि त्याच वेळीं आल्डर्मन कॉकेन नांवाच्या एका गृहस्थाला कापड रंगविण्याचा आणि ओजविण्याचा मक्ता दिला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तो ओजविण्याचा आणि रंगविण्याचा धंदा अगदीं बुडाल्यासारखा झाला, त्यामुळें त्याला त्या कॉकेनला दिलेली सनद परत घ्यावी लागली. नंतर त्याला पैक्याची जरूर लागली म्हणून, न्यायाधीशांकडून, मालावर

जाहीरनामे आणि जकाती बसविणें.

जकात बसविण्याचा आपणाला अधिकार आहे, असा त्यानें अभिप्राय मिळविला, आणि एका वर्षांत जकाती बसवून त्यानें ७०००० पौंड वसूल केले. त्याच्या दरबारचे खर्च फार भारी होते, आणि त्याला **आयर्लंडांत** मोठी फौज ठेवणें भाग होतें. तेथील लोक, **अल्स्टर** एथें **"प्लान्टेशन"** (परदेशीयांची वसाहत) करविलेली होती (३५१ वें पृष्ठ पहा), तीमुळें फार तडफड करीत होते, म्हणून त्याला शेवटीं **कामन्सां**कडे पैका मागणें भाग आलें. त्यांनीं, जाहीरनामे मी लावणार नाहीं, आणि कर जकाती बसविणार नाहीं, असें त्यानें वचन दिल्यावांचून पैका कांहींही देणार नाहीं म्हणून साफ सांगितलें. परंतु **जेम्स** तसलें वचन देईना, म्हणून **सेसिल** हा आतां **लार्ड साल्झबरी** हा किताब पावून मुख्य प्रधान झालेला होता, त्यानें **कामन्सां**शीं **"धि ग्रेट कॉन्ट्र्याक्ट"** (मोठा अटीचा खंड मक्ता किंवा करार) ह्या नांवाचा करार करण्याविषयीं यत्न केला. त्यांत, राजानें अमुक हक्क सोडावे, आणि **कामन्सांनीं** त्याला जन्मभर दरसाल २००००० पौंड देत जावे, हीं मुख्य कलमें होतीं. परंतु त्या करारालाही ते **कामन्स** कबूल होईनात, आणि शेवटीं **जेम्साला** कांहीं देखील पैसा न मिळतां त्यानें १६११ च्या फेब्रुअरींत त्या **पार्लमेंटाला** फांटा दिला. पुढें दोन वर्षांनीं, त्यानें दुसरें **पार्लमेंट** बोलावलें, आणि थोड्या आठवड्यांत त्यानें त्यालाही फांटा दिला,

ग्रेट कॉन्ट्र्याक्ट आणि पार्लमेंटचें विसर्जन, १६१०.

कारण त्यांतील **कामन्सांनीं** पुन. "कर जकाती" सोडून दिल्यावांचून कांहींही पैसा देणार नाहीं, म्हणून सांगितलें. ह्या **पार्लमेंटाला**, **"आडल्ड पार्लमेंट"** (वांझें पार्लमेंट) असें नांव पडलें, कारण त्यानें एकाही कायद्याचा मसूदा पसार केला नाहीं.

दुसरें किंवा आडल्ड पार्लमेंट, १६१४.

"आडल्ड पार्लमेंटा"ला फांटा दिल्यावर सात वर्षेपर्यंत जेम्सानें पार्लमेंटावांचून अमल करण्याविषयीं यत्न केला. १६१२ त लार्ड साल्झबरी वारला, तेव्हां त्यानें राबर्ट कार नांवाच्या एका तरुण स्काटाला मोठमोठ्या सरकारी हुद्यांवर चढविलें, आणि त्याला समर्सेटचा अर्ल हा किताब दिला. परंतु ही मेहेरबानी फार दिवस टिकली नाहीं. समर्सेटानें एसेक्सच्या

मर्जीतल्या लोकांचा अमल, १६१२-१६२१.

अर्लाच्या विवाहसंबंध तोडलेल्या बायकोशीं लग्न केलें. ती सर टामस ओव्हर्बरीचा द्वेष करीत होती, त्याला तिनें विष घातलें, त्या कामीं समर्सेटानें तिला मदत केली असा त्यावर दोषारोप आला. तेव्हां त्या समर्सेटाला राजानें आपल्या मर्जीतून गाळून त्याचा मानभंग केला. त्याच्या मागून जार्ज व्हिल्लियर्स ह्यावर राजाची मर्जी बसली. त्याला पुढें बकिंग्हमचा ड्यूक हा किताब दिला. बकिंग्हम हा तरुण, रूपानें सुंदर, आणि शूर होता, परंतु फार उतावळा आणि दुराग्रही होता. त्याचें जेम्सावर व त्याचा दुसरा मुलगा, राजपुत्र चार्लस, ह्यावर, इतकें भारी वजन बसलेलें होतें कीं, ज्यांना दरबारांत बढती पाहिजे होती, ते त्या बकिंग्हमला लांच देऊन त्याची खुशामत करूं लागले, आणि थोड्या वर्षांत, तो इंग्लंडांत अति धनाढ्य आणि बलाढ्य बडा लोक झाला. राजाचा सर्वांत वडील मुलगा, हेन्री, प्रिन्स आफ् वेल्स, हा जिवंत असता तर, सर्व गोष्टी वेगळ्या प्रकारच्या झाल्या असत्या, कारण तो चणचणीत, हरदमख्याली, आणि शाहणा, तरुण राजबिंडा होता. आणि त्यावर लोकांचें फार प्रेम होतें. परंतु तो १६१२ त वारला, आणि दुबळा, आणि आंतल्या गांठीचा, चार्लस गादीचा वारस झाला.

**जेम्साला** मनापासून स्वस्थतेची आवड होती, आणि त्यानें फारा दिवसांपूर्वीच, **स्पेन** देशाशीं चाललेलें युद्ध संपविलेलें होतें. आतां, **तिसरा फिलिप, स्पेन**चा राजा, ह्याची कन्या, **इन्फान्टा मारिया,** हिच्याशीं **राजपुत्र चार्लस** ह्याचें लग्न करावें अशी **जेम्साला** इच्छा झाली. हें लग्न करणें फार अविचाराचें काम होतें, कारण **इंग्लिश** लोक **स्पानियर्डीं**चा द्वेष करीत असत, आणि त्यांना **क्याथलिक** राजपुत्री नको होती. **एलिझाबेथ राणी**च्या, ही लोकांची नाखुशी, तेव्हांच ध्यानीं येती, आणि तिनें लोकांना न आवडणाऱ्या गोष्टीचा नाद तत्काल सोडला असता, परंतु **जेम्स** सतत बारा वर्षेपर्यंत त्या लग्नाचा घाट जमविण्याचा प्रयत्न करीत होता, त्यामुळें तो लोकांना तितकीं वर्षें सतत चीड येण्याला कारण होत होता. शेवटीं तो सारा घाट फुकट गेला, कारण, जरी "**बेबि** (लेंकरूं) **चार्ली** आणि **स्टीनी**" (असें चार्लसाला आणि बकिंग्हमला जेम्स म्हणत असे), हे दोघे विचित्रप्रकारें प्रवास करून **स्पेन** देशीं गेले, तरी त्या **इन्फान्टा**ला तो **राजपुत्र चार्लस** आवडला नाहीं, आणि त्या **स्पानिश** राजाच्या मनांत त्याला **क्याथलिक** करावें असें होतें, म्हणून तो लग्नाचा बेत १६२३ त मोडला. परंतु **जेम्सा**च्या कारकीर्दीच्या बहुतेक काळापर्यंत त्या लग्नाच्या बेतानें त्याचे प्रजाजन फार अस्वस्थ झालेले होते, आणि त्याच मूर्खपणाच्या खेंकट्यानें, त्या राजाच्या यावत्‌जन्मांतलें एकच खरोखर निर्दयकर्म करण्याला त्याला प्रवृत्त केलें.

स्पेन देशाच्या राजाच्या मुलीशीं विवाहाचा घाट, १६११–१६२३.

**सातव्या हेन्रीचें** निपणत्वंड अशी एक **आराबेल्ला स्ट्यूअर्ट** नांवाची मुलगी होती, तिला गादीवर बसविण्याकरितां एक

गुप्त संगनमत होऊन कट झालेला होता. त्या कटांत **सर वाल्टर राली** हा शूर गृहस्थ सामील होता. म्हणून त्याला १६०३ त गुन्हेगार ठरवून मृत्यूची सजा द्यावी असा ठराव झालेला होता, आणि तो तेव्हांपासून बंदिखान्यांत तेरा वर्षेपर्यंत आपला **जगाचा इतिहास** नांवाचा ग्रंथ लिहीत राहिलेला होता. १६१६ त त्यानें राजाच्या कानावर घालविलें कीं, **दक्षिण अमेरिकेंत गियाना** नांवाचा देश आहे, त्यांत एक सोन्याची खाण आहे, तिचा मी रस्ता शोधून काढीन अशी माझी खातरी आहे. तेव्हां **जेम्स** राजाला नेहमी पैशाची तंगचाई असे तीमुळें, त्यानें त्याला त्या सफरीला जाण्याकरितां कैदेंतून मुक्त केलें. परंतु **स्पानियर्डां**शीं लढाई करतां कामा नये, लढाई करशील तर तुझें डोकें मारलें जाईल अशी राजानें त्याला ताकीद केली. ही राजाज्ञा पालन करणें अगदीं अशक्य होतें, आणि **राली**ची ती मोहीम अतिशय दुर्दैवाची झाली. तो स्वतः **ओरिनोको** नदीच्या मुखाची रखवाली करण्यासाठीं राहिला, आणि इतर जहाजें त्या खाणीचा शोध लावण्यासाठीं त्यानें नदींतून वर पाठविलीं. त्यांना ती खाण सांपडेना, आणि त्यांवर **स्पानियर्डां**नीं हल्ला केल्यामुळें, त्यांनीं **स्पानिशां**च्या एका खेड्याचा नाश केला, आणि **राली**चा मुलगा त्या झटापटींत ठार मारला गेला. तेव्हां रिकाम्या हातीं माघारें येण्यापेक्षां येतां येतां **स्पानिशांच्या** धनराशींचीं भरताडें घेऊन जाणाऱ्या जहाजांपैकीं कांहीं जहाजें पकडावीं अशी त्याला इच्छा झाली. परंतु त्याच्या नावाडी लोकांनीं बंड केलें, त्यामुळें तो भग्नहृदय होत्साता, **इंग्लंडास** माघारा आला, आणि त्याला तेरा वर्षांपूर्वी देहांतशासन करण्याचा ठराव झालेला होता, त्या ठरावा-

रालीवर अनर्थ गुजरून त्याला देहांतशासन होतें, १६१६–१६१८.

अन्वयें त्याचा शिरच्छेद केला. हें कृत्य केवळ **स्पेन** देशच्या राजाला खुश करण्याकरितां केलें हें लोकांनीं ताडलें, आणि तो प्रतापी शोध लावणारा आणि इतिहासकार **राली** ह्याला जिवें मारल्यामुळें त्यांना फार क्रोध आला. **रालीचे** कोणतेही दोष असोत तरी, तो शूर आणि उमदा पुरुष होता.

**रालीच्या** मृत्यूनंतर तीन वर्षांनीं, दुसरें **पार्लमेंट** पाचारावें लागेलच, त्यावांचून गति नाहीं, असें **जेम्साच्या** लक्ष्यांत आलें. त्यानें आपली सर्वांत वडील मुलगी, **एलिझाबेथ,** हिचा १६१३ त **इलेक्टर पालाटाइन, पांचवा फ्रेडरिक,** ह्याच्याशीं विवाह केलेला होता. तो **फ्रेडरिक जर्मनींतील प्राटेस्टंट** राजांपैकीं एक मुख्य राजा होता, आणि **हाइडेलबर्गच्या** आशींपाशींच्या **ऱ्हाइन** नदीच्या कांठच्या मुलुखावर त्याचा अमल होता.

जर्मनींत तीस वर्षांचें युद्ध सुरू होतें, १६१९.

पुढें थोड्या वर्षांनीं **बोहीमियन्स** लोकांनीं, **जर्मनीचा** सम्राट् **(बादशाहा) फर्डिनांड** ह्याच्या विरुद्ध बंड करून, **फ्रेडरिकाला** निवडून आपला राजा केलें. परंतु **स्पेन** देशाचा राजा, इतर **क्याथलिक** राजांसह, **प्राटेस्टंट्सांविरुद्ध जर्मनीच्या** बादशाहाला मिळाला, आणि तें दारुण **तीस वर्षांचें युद्ध** सुरू झालें. त्या युद्धाला आरंभ होऊन फार दिवस झाले नाहींत तों, **फ्रेडरिकानें बोहीमियाच** केवळ नव्हे, परंतु आपला **पालाटिनेट** ( ह्या नांवाचें राज्य ) सुद्धां गमावला, आणि तो आणि त्याची बायको ह्या उभयतांना पळून जावें लागलें. तीं **जेम्साकडे** साहाय्य मागण्याकरितां आलीं, परंतु तें त्याला **पार्लमेंटावांचून** देतां येईना.

परंतु आतां झाडाझडती देण्याचा विचार करण्यासारखा प्रसंग येऊन ठेपला. गेल्या सात वर्षांत राजा बेनेव्होलेन्सिझ ( परोपकार

बुद्धीनें देणग्या ) ह्या नांवाची पट्टी किंवा कर, जुलुमानें कर्जें घेणें, जबर दंड, आणि असलेच इतर बेकायदा इलाज, ह्यांनीं पैसा उकळीत होता. त्यानें बडे लोकांच्या पदव्या अमर्याद द्रव्याच्या रकमा घेऊन विकत दिल्या. **डच** शहरांनीं **इंग्लिश** सरकारचीं कर्जें देणें होतीं, तीं निमेंनिम घेऊन साऱ्या कर्जाच्या भरपाया देण्याला परवानगी दिली, आणि "बारोनेट" नांवाचा बडे लोकांचा एक नवा दर्जा किंवा पदवी उत्पन्न करून कोणीही माणसानें १०० पौंड देऊन ती विकत घ्यावी असा ठराव केला. शिवाय त्यानें **बकिंग्हम** आणि त्याचे दोस्त ह्यांना सर्व प्रकारचे मक्ते दिले होते त्यामुळें लोकांवर फार जुलूम झाला. न्यायाचीं कोडतें निर्लज्जपणें लांचखाऊ झालीं. राजानें नेमलेल्या न्यायाधीशांना वेतनें फार कमी मिळत, त्यामुळें ते, अर्जदार किंवा फिर्यादी ह्यांकडून त्यांच्या खटल्यांचा निकाल किंवा निवाडा होण्यापूर्वीच, देणग्या किंवा बक्षिसें घेत.

बेकायदा पैसा उकळण्याचा इलाज.

आतां नव्या **पार्लमेंटा**करितां ज्या लोकांची निवडणूक झाली त्यांमध्यें, हा राजाचा राज्यकारभाराचा जुलुमी प्रकार बंद करण्याचा समय आला, असें मनांत आलेले पुष्कळ गृहस्थ होते. त्यांतील मुख्य, **जान पिम** नांवाचा, पहिल्यानें **कान** गांवचा, आणि पुढें **टाव्हिस्टॉक** गांवचा, प्रतिनिधि, आणि **जान हाम्प्डन** नांवाचा, **बकिंग्हमशायरां**तला एक **स्कायर** ( नाइटच्या खालच्या पदवीचा गृहस्थ ), हे होते. ते उभयतां सन्मार्गी, किंवा नेकीचे, निग्रही, आणि शूर पुरुष होते. त्यांनीं ह्या काळापासून मरणकालापर्यंत **इंग्लंडच्या** स्वातंत्र्याकरितां झगडत राहवें असा योगच

तिसरें पार्लमेंट, १६२१–१६२२.

होता. त्यांच्या बरोबर दुसरेही कित्येक गृहस्थ होते, ते येणेंप्रमाणें. (१) **सर जान एलियट,** अरमाराचा दुयम अधिपति, हा स्वभावानें जलाल, आणि स्पष्टवक्ता होता; ( २ ) **कोक,** आणि ( ३ ) **सेल्डन,** हे दोघे विख्यात वकील ( धर्मशास्त्रज्ञ ) होते; आणि (४) **वेन्टवर्थ,** हा **बकिंग्हम**चा द्वेष करी, ह्यामुळें कांहीं कालपर्यंत मात्र त्या स्वदेशभक्तांच्या पक्षाला मिळालेला होता. पुढल्या चाळीस वर्षांत जो झगडा चालला त्यांत, ह्या सर्व पुरुषांकडून मोठी कामगिरी व्हावी असा योग होता.

त्या नव्या **पार्लमेंटा**नें युद्धाच्या तयारीकरितां म्हणून लहानशी रकम राजाला दिली, आणि नंतर, बेकायदा दंड व मक्ते, आणि न्यायाधीशांचा लांचखाऊपणा, ह्या गोष्टींविषयीं त्यानें तकरार मांडली. मक्ते तर **जेम्साला** बंद करणें भागच आलें, आणि **कामन्सांनीं,**

बेकनवर दोषारोप होतो, १६२१.

**सर फ्रान्सिस बेकन** ( ह्याला **लार्ड व्हेरयुलम** असा किताब दिलेला होता ) ह्यावर लांचखाऊपणा आणि भ्रष्ट आचरण (गैरवागणूक) ह्यांचा दोषारोप केला. **बेकन** हा पूर्वीं तीन वर्षेंपर्यंत **लार्ड चान्सेलर** (पंडितराव) झालेला होता, आणि त्यानें आपला **नोव्हम ऑर्ग्यानम** (नवीन हत्यार किंवा साधन) नांवाचा विख्यात ग्रंथ नुकताच छापून प्रसिद्ध केलेला होता, आणि त्या काळच्या ग्रंथकारांत तो पहिलें पद किंवा स्थान पावलेला होता. दुर्दैवानें तो जितका शाहणा होता, तितका नेकीचा गृहस्थ नव्हता. जेव्हां **हौस-आफ्-लार्ड्स**पुढें ( लार्डांच्या सभेपुढें ) त्याची चौकशी झाली, तेव्हां लांच घेतला ही गोष्ट त्यानें नाकबूल तर केली नाहींच, परंतु मी पडलेल्या रिवाजाला फक्त अनुसरलों असें तो म्हणाला. त्याला दोषी किंवा अपराधी ठरविलें, त्याकडून सरकारी कामें काढलीं,

आणि त्याला जबर दंड केला. परंतु राजानें त्याला क्षमा केली, आणि त्याला दरसाल १२०० पौंड पेनशन (बैठें वेतन) मिळून तो सुखवस्तु राहवयास गेला, आणि विद्यापरायण झाला.

दरम्यानच्या वेळांत राजा अर्धवट मनानें युद्धाकरितां तयारी करीत होता. **फर्डिनांड बादशाहा**शीं मात्र युद्ध करावें, आणि त्या **बादशाहा**चा दोस्त, **स्पेन** देशाचा राजा, ह्याच्याशीं तर सख्य राखावें, अशी गोष्ट करतां येईल हा त्यानें धरलेला नाद अद्यापि सोडला नव्हता. हा मूर्खपणाच होता, कारण **स्पेन** देशाचा राजा, आपला दोस्त **बादशाहा** ह्याच्याशीं लढणार नाहीं, हें त्याच्या मनांत भरेना. **पिम** आणि **कोक** ह्यांनीं एक अर्ज तयार केला, तो **कामन्सां**नीं राजाकडे पाठविला, आणि **स्पेन**शीं सख्य असलेलें तोडून, **चार्लसा**चा विवाह **प्राटेस्टंट**धर्मी मुलीशींच आपणास करणें योग्य आहे, असें त्याला बेधडक सांगून पाठविलें. तेव्हां राजाला अतिशय क्रोध येऊन, **कामन्सां**नीं तो बुद्धिवाद सांगितला, हा त्यांचा केवळ उद्धटपणा आहे असें त्यानें लेखलें. त्यांची वेळ आली तेव्हां त्यांनीं, आम्हाला भाषणस्वातंत्र्याचा हक्क आहे, असें निश्चयपूर्वक लेखानें त्याला कळविलें, तेव्हां **जेम्सा**नें रागानें तो लेख **कामन्सां**च्या सभेच्या रोजनिशी-वहींतून फाडून टाकला, आणि **पिम, कोक, सेल्डन,** आणि इतर प्रमुख सभासद, ह्यांना तुरुंगांत टाकून **पार्लमेंटा**ला फांटा दिला. ह्या प्रकारें तिसऱ्या **पार्लमेंटा**चा शेवट झाला. त्यापैकीं **कामन्सां**नीं निःसंशय कांहीं लाभ साधले होते. त्यांनीं मक्ते गुत्ते बंद करविले होते, न्यायाच्या कोडतांची सुधारणा केलेली होती, आणि प्रधान वगैरे सरकारी कामदारांवर दोषारोप करण्याचा आपला पूर्वीचा अधिकार, आणि राज्य

तिसऱ्या पार्लमेंटाचें विसर्जन, १६२२.

प्रकरणीं गोष्टींत आपला अभिप्राय देण्याचा पूर्वीचा हक्क, हे पुनः जिवंत केले होते. परंतु राजा आणि **पार्लमेंट** ह्या उभयतांच्या दरम्यान पडलेली फूट रुंदावत चालली होती. ह्याच काळाच्या सुमारास वर्तमानाचे ताव पहिल्यानेंच छापूं लागले, आणि १६२२ त मेच्या २३ व्या तारिखेस, पहिलें सप्ताहिक वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध होऊं लागलें.

पहिलें सप्ताहिक वर्तमानपत्र, १६२२.

पुढल्या वर्षी, म्हणजे १६२३ त, **स्पेन** देशाच्या राजाच्या मुलीशीं **चार्लसाचा** विवाह करण्याचा बेत होता, तो फिसकटला, आणि **चार्लस** व **बकिंग्हम** हे दोघे **स्पेन** देशाहून माघारे येऊन, त्या देशाशीं युद्ध करण्याविषयीं फार उत्सुक झाले होते. त्याला लागणारें द्रव्य मिळणें किती कठीण होतें, हें राजा जाणत होता, त्यामुळें तो तें युद्ध करण्याविषयीं फारच नाराजी होता. परंतु **बकिंग्हमानें** तर त्याला टुमणी लाविली. तेव्हां १६२४ त द्रव्य पुरविण्याकरितां त्यानें आपलें चौथें आणि शेवटचें **पार्लमेंट** पाचारिलें.

चौथें पार्लमेंट, १६२४.

आतां, **स्पेन** देशाच्या राजाच्या कन्येशीं विवाह होण्याचें अरिष्ट सर्व टळलें म्हणून, आणि **पालाटिनेट** (जेम्साचा जांवई फ्रेडरिक ह्याचा जर्मनींतील मुलूख) जिंकून परत घेण्याकरितां **फ्रान्स** देशाशीं दोस्ती जोडावी, आणि त्या देशाच्या राजाची कन्या **हेन्रिएट्टा** नांवाची **क्याथलिकच** होती, तिच्याशीं राजपुत्र **चार्लस** ह्याचा विवाह करावा, असा **जेम्सानें** उहू काढला होता म्हणून विशेषेंकरून, **कामन्सांना** युद्ध नको होतें. तेव्हां त्यांनीं **स्पेन** देशाविरुद्ध **डच** लोकांना कुमक करणें, आणि **इंग्लिश** बंदरांचा बचाव करणें, ह्या दोन गोष्टींपुरतें मात्र द्रव्य देण्याविषयीं संमति

दिली, आणि आम्ही हिंवाळ्यांत पुनः जमूं तेव्हां आणखी द्रव्य लागेल तर देऊं असें त्या समयीं वचन देऊन, त्यांनीं आपलें काम तकूब केलें. दरम्यानच्या वेळांत **चार्लस** आणि **राजपुत्री हेन्रिएट्टा** ह्यांच्या लग्नाविषयीं तहनामा होऊन त्यावर सह्या झाल्या; आणि आतां आपल्या पुत्राचा **क्याथलिक** स्त्रीशीं विवाह करण्याविषयीं वचनबद्ध झाल्यामुळें, **पार्लमेंटाच्या** तोंडास तोंड देण्याला **जेम्साला** भीति वाटूं लागली. म्हणून थोडेंसें द्रव्य त्यापाशीं होतें तितक्यानेंच, त्यानें वसंतकाळांत, **कौंट मान्स्फील्ड** नांवाचा एक **जर्मन** सरदार होता त्याच्या हुकमतीखालीं १२००० फौज **जर्मनी** देशांतील **पालाटिनेट** प्रांतीं पाठविली. त्या स्वारीची नीट व्यवस्था ठेवलेली नव्हती, तींत अन्नपाण्याची तूट पडली, आणि फौजेमध्यें रोग उत्पन्न झाला, त्यानें तीपैकीं ९००० शिपायांचा संहार झाला. तो यत्न सर्वथैव निष्फल झाला, त्यामुळें **जेम्साची** अतिशय निराशा होऊन त्याला दुखणें आलें, आणि तो १६२५ त मार्चच्या २७ व्या तारिखेस हींवतापानें मरण पावला. त्यानें पुष्कळ ग्रंथ लिहिले, त्यांमध्यें तमाखूच्या विरुद्ध एक ग्रंथ होता, दुसरा एक चेटकिणीविषयीं होता, आणखी एक "राजांचा ईश्वरदत्त अधिकार" ह्या विषयावर होता. परंतु राजा ह्या नात्यानें त्यानें आपल्या प्रजाजनांकरितां परमावधीचें संकट तयार करून ठेवलें.

हालंड देशीं केलेली अनर्थकारक मोहीम किंवा स्वारी, १६२५.

जेम्साचा मृत्यु, तारीख २७ मार्च, १६२५.

# प्रकरण १७.

## राजा आणि लोक

### पहिला चार्लस, १६२५–१६४९.

**चार्लस** गादीवर बसला, तेव्हां फारच थोड्या लोकांखेरीज, बाकी सारे लोक आशाभरित होते. तो आपल्या बापाहून फार वेगळ्या प्रकारचा पुरुष होता. जरी तो वयानें फक्त पंचवीस वर्षांचा होता, तरी तो डौलदार आणि प्रौढ होता. त्याचे केंस काळे, कपाळ उंच, आणि मुद्रा गंभीर आणि उदास असे. तो खोल मनाचा होता, तथापि रीतिभातीनें कृपाळू होता, आणि जसे **जेम्साला** रागाचे आणि लोकांवर झाल जाण्याचे किंवा दुर्भाषण करण्याचे उमाळे येऊन तो फडाफडा बोले त्यानें त्याचे मंत्री त्रासले होते, तसे उमाळे येऊन तो **चार्लस** त्याला कधीं वश होत नसे. शिवाय **स्पेन** देशाशीं युद्ध करावें अशी त्याची इच्छा होती, तीमुळें तो लोकांना प्रिय झालेला होता. परंतु इतरांहून फार खोल पाहणारे असे जे थोडे लोक होते, त्यांना त्या नव्या राजाच्या स्वभावलक्षणांत फार मोठीं संकटें उद्भवण्याचीं चिन्हें दिसून आलीं. आपल्या विशेषाधिकाराविषयीं आपल्या बापासारखीच त्याची अढळ समजूत होती, परंतु **जेम्सासारखा** मनाचा मोकळेपणा आणि सुस्वभाव त्याच्यांत नव्हता. उलट पक्षीं, जरी त्याची रीतभात कृपाळूपणाची होती, तरी, तो दुराग्रही आणि कपटी होता. तो धार्मिक असून, आपल्या मुलांबाळांविषयीं वत्सल पिता होता. परंतु मनीं धरलेली गोष्ट साधण्याकरितां दुसऱ्याला ठकविणें, आणि आपलीं वचनें मोडणें, हें पातक आहे असें त्याला वाटत नव्हतें. एक विचारी

चार्लसाचे गुणदोष.

दरबारी पुरुष एकवेळां म्हणाला, "देवाची प्रार्थना करा कीं, "राजाला कोणीं सन्मार्गाला लावलें म्हणजे तरी त्यानें सन्मार्गांत "राहवें; कारण जर तो असन्मार्गांत गेला तर आजपर्यंत स्वेच्छा- "चारी असा जो कोणी राजा होऊन गेला असेल, त्याहून तो "परमावधीचा स्वेच्छाचारी निपजेल." हें गंभीर किंवा विनोदरहित आणि सत्य वाक्य होतें; आणि राजाच्या इच्छेविरुद्ध, आपली इच्छा, कामन्सांची सभा, ह्या पूर्वीच, कशी दर्शवूं लागली होती ह्या गोष्टीचें स्मरण केलें म्हणजे, चार्लसाची कारकीर्द ही एक दीर्घ काळपर्यंत चालणारी कलागत होती, ह्यांत आपणांला आश्चर्य वाटणार नाहीं. त्या कलागतींत, प्रत्येक पक्ष, तो भयंकर शेवट होई तों, दिवसानुदिवस अधिकाधिक रागास चढून अधिकाधिक नीतिहीन होत गेला.

चार्लसाचें पहिलें पार्लमेंट, तारीख १८ जून १६२५.

तो झगडा फार लवकर सुरू झाला. कारण जेव्हां, १६२५ त जूनच्या १८ व्या तारिखेस, चार्लसाचें पहिलेंच पार्लमेंट भरलें, तेव्हां हालंडांतील अनर्थांनीं लोक कष्टी झालेले होते, आणि बकिंग्हमचें राजाजवळ अमर्याद वजन बसलेलें होतें, त्या बकिंग्हमावर त्यांचा अविश्वास झालेला होता. शिवाय राणीचें इंग्लंडांत खुद्द निसबतीचें क्याथलिकपंथी देऊळ (भजनमंदिर), व त्याच पंथाचे धर्मोपाध्याय होते, त्या गोष्टीनें तर लोकांना चिरड आली होती. ह्यास्तव, जरी स्पेन देशाशीं युद्ध चालविण्याकरितां चार्लसानें ३००,०००, पौंड मागितले, तरी लोकप्रतिनिधि कामन्स ह्यांनीं फक्त १४०,००० पौंड दिले. शिवाय, बीअर (सातूंची दारू), आणि द्राक्षांची दारू, ह्यांच्या दर मोठ्या पिपावर (म्हणजे मापी दर २५२ ग्यालनांवर)

आणि दुसऱ्या कित्येक पदार्थांवर दर वजनी पौंडीं "टन्नेज आणि पौन्डेज" ह्या नांवाचा, एक नियत कर, जन्मभर राजाला लावून देण्याची जरी वहिवाट होती तरी, कामन्सांनीं तो कर एक वर्षपर्यंतच राजाला लावून दिला. चार्लसाला ह्या दोन्ही गोष्टींनीं फार राग आला. त्या समयीं लंडनांत एका सांतीच्या महामारक रोगानें कहर उसळला होता, म्हणून चार्लसानें पार्लमेंट थोडी मुदतपर्यंत तकूब करून, त्याला आक्सफर्ड एथें पुन: जमण्याला आज्ञा केली. तें पार्लमेंट पुन: जमण्याच्या पूर्वी, दुर्दैवानें अशी गोष्ट घडली कीं, चार्लसानें फ्रान्सच्या राजाला सात जहाजें उसनीं दिलेलीं होतीं, तीं जहाजें, फ्रान्सच्या पश्चिम कांठावर ला रोशेल नांवाचें ह्यूगेनोस, म्हणजे फ्रेंच प्राटेस्टंट्स लोक, ह्यांच्या वस्तीचें ठिकाण होतें, त्याला वेढा घालण्याच्या कामांत उपयोगास लावलीं. तेव्हां कामन्सांनीं, क्याथलिक्सांना प्राटेस्टंट्सांविरुद्ध मदत दिल्याबद्दल राजाला दोष दिला, आणि बकिंग्हमावर आमचा बिलकूल विश्वास नाहीं असें उघडपणें राजाला सांगितलें. परंतु चार्लस आपल्या कृपेंतल्या प्रधानाविषयीं त्यांना वाटाघाट करूं देईना, आणि त्यानें त्या पार्लमेंटाचें विसर्जन केलें.

टन्नेज आणि पौन्डेज ह्या नांवाचा कर.

पार्लमेंटचें विसर्जन, १६२५.

आतां चार्लस आणि बकिंग्हम ह्या उभयतांना, आपणांजवळ माणसें नाहींत, किंवा द्रव्यही नाहीं, ह्या गोष्टीचा विचार न करतां स्पेन देशाशीं युद्ध चालवून लोकप्रीति संपादन करण्याची आशा उत्पन्न झाली. तेव्हां व्यापाऱ्यांचीं जहाजें वेठीस धरून एक अरमार जमा केलें, आणि त्या दिवसांत निरंतरची चाकरीस ठेवलेली